नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

Website : www.dainikmahasagar.in
Epaper : www.epaper.dainikmahasagar.in

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

e-mail : nagpurpost@gmail.com • mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५४ * अंक २२९ * * नागपूर * | मंगळवार, दिनांक २६ नोव्हेंबर २०२४ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

## अग्रग्रलेख खरीखरी..

## मनसे, वंचित, छत्रपती आणि कडू

गेले महिनाभर सुरू असलेल्या गदारोळ आता थांबलेला आहे. परंतु महाराष्ट्रातील अनेक प्रमुख पक्षांना वंचित करून त्या पक्षांचे कडू करण्यासाठी आपल्या महाराष्ट्राने जो निर्णय दिला आहे. त्यामुळे आमच्या पोटात कालवाकालव सुरू आहे. आता एकेकाचा समाचार घेऊया. त्यामध्ये पहिला क्रमांक मनसेचा आहे. अत्यंत आक्रमक शैलीत जनतेच्या मनात घर करून बसलेले राज साहेब ठाकरे आणि शिवसेनेतून अडीच वर्षांपूर्वी बाहेर पडलेल्या आपल्या शिंदे साहेबांनी उद्धव साहेबांना बाहेर काढले. आता जे पडले. त्यात राज साहेबांच्या पक्षातील सर्वच्या सर्व आमदारेच्छुक उमेदवार अक्षरशः रडले, असे म्हणतात. महाराष्ट्राचे राजकारण आपण म्हणू तसेच चालेल. अशी खूणगाठ मनात बांधून राज साहेबांनी भारतीय जनता पक्षा सोबतचे प्रेमबंधन तोडून यावेळी स्वतःचे अनेक खंदे उमेदवार उभे केले. त्यात राज साहेबांचे सुपुत्रही उभे होतेच. राज साहेबांनी आपल्या प्रचारी भाषणात राज्यातील सर्व पक्ष कसे नालायक आहेत, हे वारंवार सांगितले. आपण एकेकाळी तेरा आमदार निवडून आणले होते. नाशिकची महानगरपालिका ताब्यात घेतली होती. त्या गोड आठवणींच्या स्वप्न रंजनात आता आपण महाराष्ट्र जिंकून टाकू, असा त्यांचा होरा होता. महाराष्ट्राच्या बथ्थड जनतेला आकाशात झेपावणाऱ्या राज साहेबांच्या या उत्तुंग कल्पना विलासाला प्रतिसाद द्यावासा वाटला नाही. हे त्यांचे आणि महाराष्ट्राचे दुर्दैवच म्हणावे लागेल. आमदार निवडून आले नाहीत. तरी राज साहेब दमदार होते, दमदार आहेत आणि दमदार राहतील. त्यांच्या वक्तृत्वाबद्दल आमच्या मनात नितांत आधार आहे. आचार्य अत्रे किंवा अटल बिहारी वाजपेयी हे जसे शब्दांचे जादूगार होते. तसेच राज साहेबही आहेत. याबद्दलही आमच्या मनात शंका नाही. आता नाही तर नाही. पुढील काळात नक्कीच त्यांचा डंका वाजेल. एवढे या महाराष्ट्राने समजून घ्यावे. इतकीच इच्छा आहे. पुढचा पक्ष क्रमांक दोन आहे वंचित बहुजन आघाडी. या आघाडीचे नायक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नातू बाळासाहेब उर्फ प्रकाश आंबेडकर साहेब, हे नातू साहेब ना तू, ना मी अशा अविभार्वात महाराष्ट्रातील आपल्या अनेक अनुयायांना निवडणुकीच्या बंधनात अडकवितात. लोकसभेत त्यांना 12 जागा हव्या होत्या. पण त्यावेळी जो वारा चालला. त्यात त्यांच्या स्वतःसकट सगळेच भावी खासदार गुप्त दाराने लुप्त झाले. त्यापूर्वी राहुल गांधीच्या मुंबईच्या सांगता सभेत बाळासाहेबानी हो नाही, हो नाही करत करत आपली उपस्थिती दर्शवली व तिथे भाषणही केले होते. आपण चार दोन जागेसाठी तडजोड करणार नाही. पडलो तरी चालेल पण आघाडी सोबत लढणार नाही. हा बाणा त्यांनी विधानसभेतही दाखवला. यावेळी त्यांचे शिलेदार उभे राहिले नसते. तर काँग्रेसला काही जागा मिळाल्या असत्या आणि निदान विरोधी पक्ष नेते पदही मिळाले असते. पण या वंचित मुळे तेही वंचितच राहिले. आता तिसरा क्रमांक छत्रपतींच्या गादींचे वारस आणि आपले कडू साहेब यांचा आहे. यांनी सुद्धा या विधानसभेच्या निवडणुकीत आपला ठसा उमटवण्यासाठी सर्व काही केले. गुवाहाटीला हजेरी लावल्यानंतर त्यांना मंत्रिपद मिळाले होते. पण मुंबईहून सुरत मार्गे गुवाहाटीला गेल्यानंतरही, मंत्रीपदाची कामना करत करत त्यांचे तोंड शेवटपर्यंत गोड करण्यात आलेच नाही. छत्रपती घराण्याचे वंचित संभाजी राजे सुद्धा आपला प्रभाव दाखवू शकले नाहीत. या तिघांशिवाय मराठा हृदयसम्राट मनोज जरांगे पाटील यांनी सुद्धा आपले शब्दबाण असे काही फेकले होते की, आता महाराष्ट्रातील बडेबडे नेते घायाळ होतील असे जनतेला वाटत होते. पण शेवटी जरांगे साहेबही जराजर्जर झाले की काय? असे वाटायला लागले. महाराष्ट्राच्या राजकारणाची आजची दशा आणि दिशा वर्षानुवर्षे राजकारणामध्ये काळ्याचे पांढरे झालेल्या अनेकांना समजू शकलेली नाही. याशिवाय पालघर जिल्ह्यातील वेगळी आघाडी, तर इतर जिल्ह्यातील जिल्हा पुरस्कृत आघाड्या तयार झाल्या होत्या. पण मोठ्या आघाडीच्या युतीसमोर या लहान आघाड्या कुठल्या कुठे अंतर्धान पावल्या. हे समजलेच नाही. भारतीय जनता पक्षाच्या दावणीला बांधलेला युवा स्वाभिमान जिंकला. बाकी यावेळी युतीच्या झंझावातात ज्यांना आपण बडे बडे पक्ष म्हणतो. ते बडे बडे पक्षही भुईसपाट झाले. त्यामुळे बिचाऱ्या या पक्षांना युतीच्या वावटळीमुळे आपापल्या घरात लपून बसावे लागले. आता महाराष्ट्रात महायुतीचा रणगाडा जोरात धावेल आणि त्यांच्या बड्या बड्या योजना आणि त्यांचा निधी जनतेला पावेल. ही अपेक्षा व्यक्त करून, आम्ही सर्वच पक्षांना अगदी मनापासून नमस्कार करतो!

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे अडीच - अडीच वर्ष मुख्यमंत्री?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २४ :
महाराष्ट्रात भाजपला आजपर्यंतचा सर्वात मोठा विजय मिळवून देणारे देवेंद्र फडणवीस तिसऱ्यांदा मुख्यमंत्री होणार आहेत. पहिली अडीच वर्षे फडणवीस मुख्यमंत्री तर पुढील अडीच वर्षे शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असतील. मुख्यमंत्रीपद सोडल्यानंतर फडणवीस यांना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष केले जाणार असल्याची माहिती आहे.




सूत्रानुसार भाजप आणि आरएसएसने मिळून फडणवीस यांची भूमिका निश्चित केली आहे. त्यांना अडीच वर्षांसाठी मुख्यमंत्री करण्यासाठी भाजप आणि शिवसेनेमध्ये करार झाला आहे. त्याचवेळी फडणवीस यांना भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष करण्यासाठी पक्ष हायकमांड आणि आरएसएसची तयारी सुरु झाली आहे. आरएसएसचे सरसंघचालक मोहन भागवत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्री करण्यासाठी सहमती दर्शवल्याचे विश्वस्त सूत्रांचे म्हणणे आहे.

अडीच वर्षे पूर्ण होण्याआधीच फडणवीस यांना भाजपचे अध्यक्ष बनवल्यास त्यांच्या जागी पक्षाचे सरचिटणीस विनोद तावडे किंवा माजी प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांना मुख्यमंत्री केले जाऊ शकते. अडीच वर्षापूर्वी एकनाथ शिंदे मुख्यमंत्री होणार नाहीत, हे निश्चित मानले जात आहे.

महाराष्ट्र विधानसभेचा कार्यकाळ २६ नोव्हेंबरला संपत आहे. त्यापूर्वी सरकार स्थापन करणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास राष्ट्रपती राजवट लागू करावी लागेल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, एक मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांचा फॉर्म्युला ठरला आहे.

दरम्यान, सोमवारी सायंकाळी फडणवीस दिल्लीसाठी रवाना झालेत. कोणत्याही क्षणी मुख्यमंत्री पदाची घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. सूत्रानुसार, नव्या सरकारचा शपथविधी मंगळवारी होईल. त्यात भाजपच्या १०, तर शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रत्येकी ५ आमदार मंत्रीपदाची शपथ घेतील, अशी माहिती आहे.

पहिल्या अडीच वर्षात शिंदे आणि अजित पवार उपमुख्यमंत्री असतील. दुसरीकडे, मुंबई येथील राजभवनात या शपथविधी सोहळ्याची लगबग सुरू झाली आहे.

## नाना पटोलेंचा पक्षश्रेष्ठींकडे राजीनामा?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
महाराष्ट विधानसभा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले. महाविकास आघाडीचा सुपडासाफ झाला आहे. आघाडीला केवळ ४६ जागांवर समाधान मानावे लागेल. राज्यात फक्त १६ जागांवर काँग्रेसचे उमेदवार निवडून आले आहेत. यामुळे काँग्रेसवर मोठी नामुष्की ओढावली आहे.



विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेसचा दारुण पराभव झाल्यानतंर आता नाना पटोलेंनी काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याचे समोर आले आहे. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या दारूण पराभवानंतर आता नाना पटोले हे दिल्लीला रवाना झाले होते. त्यांनी २४ नोव्हेंबरला काँग्रेसच्या हायकमांडची भेट घेतल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. या भेटीत नाना पटोले यांनी काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याचे सांगितले जात आहे. मात्र, अद्याप नाना पटोले यांचा राजीनामा काँग्रेसच्या हायकमांडने स्वीकारलेला नाही. त्यामुळे नाना पटोले हे वेट अँड वॉचच्या भूमिकेत आहेत.

राज्यातील विधानसभा निवडणुकीत काँग्रेसला मोठ्या पराभवाचा सामना करावा लागला होता. या निवडणुकीत अनेक दिग्गज नेत्यांना पराभव झाला. या निवडणुकीत पृथ्वीराज चव्हाण, यशोमती ठाकूर, बाळासाहेब थोरात, माणिकराव ठाकरे हे नेते पराभूत झाले होते.

दुसरे म्हणजे लाखाच्या फरकाने विजयाचा दावा करणारे नाना पटोले यांना भाजपा उमेदवाराने मोठा घाम फोडला. पटोले केवळ २०८ मतांनी निवडून आले. याचेही शल्य त्यांना बोचते आहे.

काँग्रेस पक्षाच्या पराभवाची नैतिक जबाबदारी स्वीकारत नाना पटोले यांनी प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याचे बोलले जात आहे. दरम्यान याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

## एमआयएमने सांगितला नवा फॉर्म्युला

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
भाजपला सत्तेत येण्यापासून रोखायचं असल्यास आम्ही सुचवत असलेल्या फॉर्म्युलावर काम करा, आमचा पक्ष नक्कीच साथ देईल, असे सांगत एमआयएमचे वरिष्ठ नेते सय्यद असीम वकार यांनी सत्ता स्थापनेचा फॉर्म्युला सुचवला आहे.

सय्यद असीम वकार यांनी आकडेवारी मांडत सांगितले, एकनाथ शिंदे यांच्याकडे ५७ आमदार आहेत. तर अजित पवारांकडे ४१ आमदार आहेत. दोघांकडे मिळून ९८ आमदार होतात. महाविकास आघाडीत ५० आमदार आहेत. या सगळ्यांची गोळाबेरीज केल्यास ती १४८ च्या घरात जाते. या संख्याबळाच्या आधारे सत्ता स्थापन करता येऊ शकते.

हा फॉर्म्युला प्रत्यक्षात आणण्यासाठी शरद पवारांना अजित पवारांशी संवाद साधावा लागेल. तसेच राहुल गांधी व उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आपल्यासोबत घ्यावे लागेल. असे जर झाले तर भाजपची सगळी समीकरणे बिघडू शकतात, असेही ते म्हणाले.

## विरोधी पक्षनेतेपदावर मविआचा संयुक्त दावा?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. २४ :
विधानसभा निवडणुकीत कोणत्याही विरोधी पक्षाला विरोधी पक्षनेतेपदासाठी आवश्यक असणाऱ्या जागा मिळाल्या नाहीत. नियमांनुसार, विधानसभेच्या किमान १०% जागा जिंकणाऱ्या पक्षाला विरोधीपक्ष नेतेपद दिले जाते.

एखाद्या पक्षाला यापेक्षा जास्त जागा मिळाल्या असतील त्या पक्षाकडे हे पद जाते. यावेळी असे काहीच घडले नाही. त्यामुळे महाविकास आघाडी संयुक्तपणे विरोधी पक्ष नेता पदावर दावा करू शकते. या संदर्भात राज्यपालांना पत्र लिहून निवडणूकपूर्व युतीचा युक्तिवाद केला जाणार आहे.

## ठाकरे गटाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी आदित्य ठाकरे यांची सर्वानुमते निवड

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. २४ :
उद्धव ठाकरे यांनी भास्कर जाधव यांच्यावर मोठी जबाबदारी दिली आहे. भास्कर जाधव यांची उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या गटनेते पदी निवड करण्यात आली आहे. सुनिल प्रभू यांची पुन्हा एकदा प्रतोदपद नियुक्ती करण्यात आली आहे. तर आदित्य ठाकरे यांची विधिमंडळ पक्ष नेतेपदी निवड करण्यात आली.



आदित्य ठाकरे यांची आता विधानपरिषद आणि विधानसभा दोन्ही सभागृहाचे नेते म्हणून त्यांची निवड झाली आहे. तसेच राज्यात सरकार स्थापन झाल्यानंतर विधानसभा अध्यक्षांकडे विरोधी पक्ष नेतेपद आम्हाला मिळावे, अशी रितसर मागणी करणार असल्याचे भास्कर जाधव यांनी सांगितले.




## भारताने कांगारूला २९५ धावांनी लोळवले

■ वृत्तसंस्था, पर्थ, दि. २५ :
बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीच्या पहिल्या कसोटीत भारताने ऑस्ट्रेलियाचा 295 धावांनी पराभव केला आहे. 5 सामन्यांच्या कसोटी मालिकेत संघाने 1-0 अशी आघाडी घेतली आहे. दुसरा सामना 6 डिसेंबरपासून ॲडलेडमध्ये खेळवला जाईल.

पर्थमधील ऑप्टस स्टेडियमवर सोमवारी झालेल्या सामन्याच्या चौथ्या दिवशी 534 धावांचे आव्हान पेलणाऱ्या कांगारूंचा संघ दुसऱ्या डावात 238 धावांत सर्वबाद झाला. तत्पूर्वी, भारताने दुसरा डाव 6 बाद 487 धावांवर घोषित केला होता. टीम इंडियाने पहिल्या डावात 150 धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव 104 धावांवर आटोपला.

पर्थच्या ऑप्टस स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाचा हा पहिलाच पराभव आहे. याआधी संघाने 4 सामने खेळले होते आणि ते सर्व जिंकले होते. ऑस्ट्रेलियात भारताचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा कसोटी विजय आहे. यापूर्वीचा सर्वात मोठा विजय 222 धावांचा होता, जेव्हा संघाने 1977 मध्ये मेलबर्नमध्ये पराभूत केले होते. ऑस्ट्रेलियाच्या दुसऱ्या डावात बुमराह आणि मोहम्मद सिराजने ३-३ बळी घेतले.




## पिपाणी चिन्हाने घेतलेल्या मतांचा लाभ झाला!

मुंबई प्रतिनिधी
लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाला पिपाणी या निवडणूक चिन्हाचा फटका बसला आहे. शरद पवार गटाला ज्या मतदारसंघात पिपाणीने दणका दिला त्यात पुणे जिल्ह्यातील आंबेगाव विधानसभा मतदारसंघाचा समावेश आहे. आंबेगावमधील अटीतटीच्या लढतीत अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार दिलीप वळसे पाटील निवडून आले आहेत. वळसे पाटील यांनी सोमवारी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींशी बोलताना आपल्याला पिपाणी या चिन्हाने घेतलेल्या मतांचा लाभ झाल्याची कबुली दिली.

# महापालिका मुख्यालयासमोर बेकायदा वाहनांचे पार्किंग

भिवंडी, दि. २५ : प्रतिनिधी



भिवंडी महापालिका मुख्यालयासमोर बेकायदा पार्किंग केले जात आहे. कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या या नवीन हायटेक इमारतीच्या कंपाउंडच्या बाहेर फुटपाथलगत शाळेच्या बसेस आणि खासगी वाहने मुख्य गेटसमोर उभी असतात. त्यांना हटवून त्यांच्यावर कारवाई करण्याऐवजी महापालिका प्रशासन उदासीन राहिले आहे.शहरातील अतिक्रमणे हटवणाऱ्या मनपाला समोरची अतिक्रमणे काढता येत नसल्याची चर्चा शहरात आहे.भिवंडी महापालिकेने मुख्य प्रशासकीय सहा मजली नवीन इमारत कोट्यवधी रुपये खर्च करून १९ मे २०१३ रोजी राष्ट्रवादीचे (शरद) अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले.तसेच महापालिका सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, महानगरपालिकेची आर्थिक स्थिती ठीक नसताना या इमारतीच्या सुरक्षेवर महापालिका दरमहा लाखो रुपये खर्च करते. असे असताना या इमारतीच्या सभोवताली भंगार गाड्या आणि मोठ्या वाहनांची पार्किंग केली जाते. त्यामुळे रस्ते लहान होऊन वाहनांना अडथळे निर्माण होत आहेत.याप्रकरणी मनपाचे अतिक्रमण विभाग देखील दुर्लक्ष करते.त्यामुळे पालिकेची सुरक्षा धोक्यात आली आहे.या बेकायदा पार्किंगमुळे इमारतीची सुरक्षा धोक्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या प्रकरणी फोरम फॉर जस्टीसचे सचिव कैलास कर्णकार यांनी महानगरपालिका आयुक्त अजय वैद्य यांना लेखी पत्र देऊन महानगरपालिका प्रशासकीय इमारती लगत नेहमी उभी असलेल्या जुन्या - नव्या वाहनांना प्रतिबंध करावा तसेच सुरक्षा रक्षकांमार्फत नियमित इमारतीभोवती राउंड मारून हि वाहने हटविण्याची कारवाई करावी,अशी मागणी केली आहे.

# 6 डिसेंबरपूर्वी बाबासाहेबांचा पूर्णाकृती पुतळा अभिवादनासाठी खुला करा

## कायद्याने वागा लोकचळवळीची मागणी

उल्हासनगर दि. २५ : प्रतिनिधी

निवडणुकीच्या धामधुमीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचं पर्यवेक्षण, तांत्रिक परीक्षण, तपासणी राहून जायला नको. ते काम तातडीने व्हावं. पुतळ्याच्या योग्यतेची, कामाच्या मजबुतीची, सक्षमतेची खात्री करावी, आवश्यकता भासल्यास उपाययोजना व्हाव्यात, पण कोणत्याही परिस्थितीत ६ डिसेंबर रोजी उल्हासनगरातील बाबासाहेबांचा पूर्णाकृती पुतळा नागरिकांना अभिवादनासाठी खुला असावा, यासाठी पावलं उचलावीत, अशी मागणी कायद्याने वागा लोकचळवळीने उल्हासनगरातील सुभाष टेकडी येथील पुतळ्याबाबत मनपा आयुक्त विकास ढाकणे यांच्याकडे केली आहे.

उल्हासनगर महानगर पालिकेकडून मूलभूत सुविधा निधीतून उभारण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याबाबत अक्षम्य दिरंगाई झालेली आहे. या कामाचा अंदाजित खर्च १ कोटी रुपये इतका ठरवण्यात आलेला होता. अंतिमतः ८५ लाखांच्या खर्चाची निश्चिती झालेली असली तरी, सदरच्या कामात २५-३० लाखांइतकाही खर्च न झाल्याचं व भ्रष्टाचार झाल्याचं प्रथमदर्शनीच दिसून येत आहे. त्याची चौकशी व्हावी, अशी मागणीही कायद्याने वागा लोकचळवळीचे प्रणेते राज असरोंडकर यांनी आयुक्तांना दिलेल्या लेखी निवेदनात केली आहे.

सुभाष टेकडी येथील सदर ठिकाणी अनेक वर्षांपासून अर्धपुतळा होता. त्या अर्धपुतळ्याच्या प्रेरणेनेच आजवर स्थानिक नागरिकांची वाटचाल झाली. तिथून हाकेच्या अंतरावर तक्षशिला विद्यालयाच्या प्रांगणात पूर्णाकृती पुतळा असताना, नव्या पूर्णाकृती पुतळ्याची काहीही गरज नव्हती. पण विचारांपेक्षा स्वार्थी राजकारण सरस ठरलं. पूर्णाकृती पुतळ्याचं काम हाती घेण्याच्या काही दिवस आधीच अर्धपुतळ्याच्या चबुतऱ्याचं नूतनीकरण झालेलं होतं. ते वाया गेलं. पूर्णाकृती पुतळ्याचं काम मंजूर झाल्यानंतरही सदरचं काम रखडून राहिलेलं होतं. इतक्या वर्षात यंदा पहिल्यांदाच १४ एप्रिल रोजी सुभाष टेकडी चौकात आंबेडकर जयंती साजरी झाली नाही, कारण पुतळा जागेवर नव्हता, ही बाब असरोंडकर यांनी आयुक्तांच्या निदर्शनास आणली आहे.

विधानसभा निवडणुकीची घोषणा होताच रातोरात अंधारात चोरीलबाडीने पुतळा आणून चबुतऱ्यावर बसवण्यात आला. या सर्व कामाचं जे अभियांत्रिकी मूल्यमापन, नियमन, नियंत्रण व्हायला हवं होतं, ते करण्यात आलेलं नाही. मालवणमधील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या बाबतीत घडलेली दुर्घटना डोळ्यासमोर असतानाही डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याबाबत अक्षम्य तितकाच संतापजनक बेजबाबदारपणा कंत्राटदार व मनपा प्रशासनाकडून करण्यात आला आहे . हा पुतळा उद्या कोसळला तर कोण जबाबदारी घेणार आहे ? असा सवालही असरोंडकर यांनी केला आहे.

# उल्हासनगर, अंबरनाथ विधानसभा निवडणुकीत कुमार आयलानी व डॉ. बालाजी किणीकर यांचा विजय

उल्हासनगर दि. २५ : प्रतिनिधी





उल्हासनगर व अंबरनाथ विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाचे कुमार आयलानी व शिवसेनेचे डॉ बालाजी किणीकर यांचा दणदणीत विजय झाला असुन आयलानी यानी ओमी कलानी चा दारुण पराभव केला असुन किणीकर यांनी शिवसेनेचे ( उबाटा ) राजेश वानखडे यांचा पराभव केल्याने या दोन्ही मतदार संघात महायुतीचा विजय झाला आहे.ही निवडणुक ई व्ही एम सेट करुन जिंकल्याचा आरोप होत आहे.

उल्हासनगर विधानसभा (१४१) मतदार संघात चांगलीच चुरस निर्माण झाली होती. भाजपा कडुन कुमार आयलानी हे उमेदवार होते . तर त्यांच्या समोर राष्ट्रवादी कडुन पप्पु कलानी यांचा मुलगा ओमी कलानी हा उभा होता. या दोन्ही उमेदवारासमोर मनसे व वंचित बहुजन आघाडीचे देखील आव्हान होते. दरम्यान कुमार आयलानी यांनी प्रचारात आघाडी घेतली होती. तर पप्पु कलानी यांनी मुलाला निवडुन आणण्यासाठी दारोदार जोरात प्रचार केला. परंतु कलानी यांना आत्मविश्वास नडला आहे. दरम्यान कलानी यांच्या नावावर गुंडगिरीचा शिक्का असुन कलानी आला तर गुंडगिरी वाढणार आहे, असा प्रचार भाजपा कडुन करण्यात आला होता. त्यातच पप्पु कलानीचे समर्थक कमलेश निकम यांनी विरोधकांवर केलेले वायफळ टिकास्त्र, तसेच अपप्रचार हे कलानी यांना भारी पडले आहे.तर मतदानाच्या दिवशी दुपारी ३ वाजता पप्पु कलानी यांनी आपल्या समर्थकासह कुमार आयलानी यांच्या कार्यालयावर जावुन धतिंगबाजी केली. म्हणुन कलानी यांची गुंडगिरी समोर आली असल्याने भाजपाच्या कार्यकर्त्यानी मतदानाचा टक्का अधिक वाढवन्यासाठी जोरदार काम केले. त्यामुळेच ओमी कलानी यांचा दारुन पराभव झाला आहे. महायुतीचे उमेदवार कुमार आयलानी यांना ८२ हजार २३१ इतके मताधिक्य मिळाले असुन महाविकास आघाडीचे उमेदवार ओमी कलानी यांना ५१ हजार ४७७ इतके मते मिळाली आहेत. तर ३० हजार ७५४ इतक्या मतानी ओमी कलानी यांचा दारुण पराभव झाला आहे.या मतदार संघात मनसेचे भगवान भालेराव यांना ४९५० इतकी मते मिळाली असुन वंचित बहुजन आघाडीचे संजय गुप्ता यांना ७४५३ ऐवढे मते मिळाली आहेत. या दोन्ही उमेदवारानी ओमी कलानी यांचेच मते घेतल्याची चर्चा सुरु आहे. मात्र कलानी यांना गुंडगिरीचा चेहरा नडला असल्याने त्यांच्या मुलाला दारुण पराभवाला सामोरे जावे लागले आहे.

अंबरनाथ विधानसभा निवडणुकीत शिवसेनेचे डॉ . बालाजी किणीकर व शिवसेनेचे ( उबाटा ) राजेश वानखडे यांच्यात लढत होती. वानखडे यांच्या नावाची जोरात चर्चा होती. तर किणीकर हे चिंतेत होते. मात्र अंबरनाथ करानी किणीकरांवर चौथ्यांदा विश्वास दाखवुन निवडुन दिले आहे. किणीकर यांना १ लाख ११ हजार ३६८ मते मिळाली असुन वानखडे यांना ५९ हजार ९९३ इतके मते मिळाली आहेत. तेव्हा ५१ हजार ३७५ इतक्या मतानी वानखडे यांचा पराभव केला आहे. दरम्यान या उल्हासनगर व अंबरनाथ या दोन्ही मतदार संघात महायुतीचे उमेदवार निवडुन आल्याने कार्यकर्त्यानी एकच जल्लोष केला आहे.

# भिवंडीत भंगाराच्या गोदामाला भीषण आग आगीत भंगारासह आजूबाजूची अनेक घरे जळून खाक, कुटुंबे रस्त्यावर

भिवंडी, दि. २५ : प्रतिनिधी



शहरातील नागाव परिसरातील फातमा नगर येथील एका भंगाराच्या गोदामाला शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली असून या आगीत मोठ्या प्रमाणात भंगारासह आजूबाजूची घरेही जळून खाक झाली आहेत.तर या आगीत सुदैवाने कोणत्याही प्रकारची जीवितहानी नसल्याची प्राथमिक माहिती सूत्रांनी दिली आहे.मिळालेल्या माहितीनुसार,नागाव येथील अनमोल हॉटेलच्या पाठीमागे मरीहम मस्जिदीजवळील मोठ्या प्रमाणात भंगार साठवलेल्या गोदामाला शुक्रवारी सायंकाळी ४ वाजताच्या सुमारास अचानकपणे आग लागली.त्यानंतर या आगीने रौद्ररूप धारण करण्यास सुरुवात केली. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होऊन एकच गोंधळ उडून नागरिकांनी आग विझवण्यासाठी प्रयत्न सुरू केले होते.मात्र सदर आग पसरत गेल्याने आगीवर नियंत्रण मिळवणे अशक्य होते. त्यातच पाहता पाहता या भंगार गोदामाच्या सभोवतालची अनेक घरे या आगीच्या भक्षस्थानी सापडल्याने त्या घरांचीही राख रांगोळी झाली आहे.त्यामुळे अनेक कुटुंबे रस्त्यावर आली आहेत.तर या आगीचे लोट आकाशात मोठ्या प्रमाणात पसरले होते.या आगीची माहिती अग्निशमन दलाला मिळताच अग्निशमन दलाकडून प्रथम दोन गाड्या घटनास्थळी पाचारण करण्यात आल्या होत्या.परंतु आगीचे ठिकाण दाटीवाटीत असल्याने अग्निशमन गाड्यांना सदर ठिकाणी पोहचण्यास अडचण निर्माण झाली होती.त्यातच आगीची तीव्रता वाढत गेल्याने अग्निशमन दलाची आणखी एक गाडी अशा तीन गाड्या आणि दोन टँकर आगीच्या ठिकाणी पाचारण करण्यात येवून अग्निशमन दलाच्या जवानांनी आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले असता तब्बल ३ - ४ तासांनी आग आटोक्यात आणण्यात अग्निशमन दलाला यश आले आहे.या आगीचे कारण अस्पष्ट असून शुक्रवारी सुट्टीचा दिवस असल्याने सदर गोदामात कामगार नसल्याने आगीत फक्त वित्तहानी झाली असून कुठल्याही प्रकारची जीवितहानी नसल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

# 'दिलजीत दोसांझ'चा म्युझिक कॉन्सर्ट रद्द करण्यात यावा - चंद्रकांत पाटील

पुणे, दि. २५ : प्रतिनिधी

पुण्यातील कोथरूड येथील काकडे फार्म परिसरात आज दिलजीत दोसांझ यांचा म्युझिक कॉन्सर्ट कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाला जवळपास ५० हजाराहून अधिक नागरिक येण्याची शक्यता आहे.तसेच दिलजीत दोसांझ यांच्या आजवरच्या कार्यक्रमाची एकूणच पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावर स्थानिक नागरिकांनी या कार्यक्रमाला विरोध दर्शवला होता.पण आता थेट कोथरूडचे भाजपचे जेष्ठ नेते आमदार मंत्री चंद्रकांत पाटील यांनी हा रद्द करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. या कार्यक्रमाबाबत चंद्रकांत पाटील यांनी एका निवेदनाद्वारे भूमिका मांडत म्हणाले की,पुण्यात कोथरूडमधील काकडे फार्म येथे होणाऱ्या दिलजीत दोसांझ च्या म्युझिक कॉन्सर्टला माझा स्थानिक आमदार म्हणून तसेच पण एक नागरिक म्हणून माझा विरोध आहे.फक्त दारू विक्रीसाठी विरोध नाही, तर या कार्यक्रमामुळे ट्रॅफिक जाम आणि कर्कश आवाजाला सुद्धा माझा विरोध आहे.त्यामुळे हा कार्यक्रम रद्द करण्यात यावा,अशा सुचना मी पोलीस आयुक्त, उत्पादन शुल्क विभाग आणि जिल्हाधिकारी यांना दिल्याचे या निवेदनात म्हटले आहे.तसेच असे कार्यक्रम समाजाला लागलेली किड आहे.त्यामुळे कोथरूडमध्ये हा कार्यक्रम झाला तर भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोठा मोर्चा काढण्यात येईल आणि या मोर्चाचे नेतृत्व मी स्वतः करेन,असे देखील या निवेदनात म्हटले आहे. तसेच दिलजीत दोसांझ यांच्या म्युझिक कॉन्सर्ट चा कार्यक्रम काही तासांवर आला असून आता प्रशासन काय भूमिका घेते हे पाहणे जरुरीचे ठरणार आहे.

# भिवंडी ग्रामीण, पश्चिममध्ये विद्यमान आमदारांची हॅट्रिक

भिवंडी, दि. २५ : प्रतिनिधी



भिवंडी पश्चिम विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडी मधील पक्षांमधील सुदोपसूदी मुळे पुन्हा एकदा भाजपाचे महेश चौगुले यांच्या गळ्यात हॅट्रिक विजयाची माळ घातली आहे. या मतदारसंघात भाजपाचे महेश चौगुले यांनी समाजवादी पार्टीचे रियाज आजमी यांचा ३१२१५ मतांनी पराभव केला आहे.महेश चौघुले यांना ६९९७० मते मिळाली असून सपाचे रियाज आजमी यांना ३८७५५ मते मिळाली आहेत.या खालोखाल कॉंग्रेस बंडखोर अपक्ष उमेदवार विलास आर.पाटील यांना ३१४४९ तर कॉंग्रेसचे अधिकृत उमेदवार दयानंद चोरघे यांना २१९१३ मते मिळाली आहेत. तर एमआयएम पक्षाचे वारीस पठाण यांना १५७६० मतांवर समाधान मानावे लागले आहे.या मतदारसंघात महाविकास आघाडी मध्ये सुरुवातीपासून बिघाडी झाली होती. त्याचा फटका महाविकास आघाडीला बसला.या मतदारसंघात मतविभाजनाचा फायदा महेश चौघुले यांना झाला.या मतदारसंघात पहिल्या फेरीपासूनच महेश चौघुले यांनी आघाडी घेतली होती तर दुसऱ्या क्रमांकासाठी समाजवादीचे रियाज आजमी व अपक्ष विलास पाटील यांच्यात चढाओढ सुरू होती.भिवंडी शहराच्या विकासाची चर्चा करीत असताना सुरवातीला महेश चौघुले यांना मोठा विरोध नागरिकांमध्ये होता तर पक्षांतर्गत कुरघोडीचे राजकारण त्यांच्या विरोधात सुरू होते.असे असताना निवडणूक प्रचारात मुख्य मुद्दा राहिलेला बटेंगे तो कटेंगे या नीतीचा वापर करीत एका विशिष्ट धर्म समुदायाची मतांमध्ये विभाजन करण्यात महेश चौगुले यशस्वी झाले आहेत.त्यांच्या विजयानंतर समर्थक, कार्यकर्ते यांनी मोठा जल्लोष साजरा केला असून मतमोजणी केंद्र ते छत्रपती शिवाजी महाराज चौक अशी विजयी मिरवणूक काढली. मी माझे दहा वर्षात केलेल्या विकास कामांना सर्वधर्मीय मतदार नागरिकांनी दिलेली ही पोच पावती असून,यापुढे अजून भव्य दिव्य असा विकास करून शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचा माझा प्रयत्न असणार आहे.माझा विजय हा जनतेचा विजय आहे अशी प्रतिक्रिया विजया नंतर महेश चौघुले यांनी दिली आहे. दरम्यान भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघात समाजवादी पक्षाचे आ. रईस शेख विजयी झाले आहेत. रईस शेख यांना एकूण १ लाख १९ हजार ४५४ मते मिळाली असून त्यांचे प्रतिस्पर्धी शिंदे सेनेचे उमेदवार संतोष शेट्टी यांना एकूण ६७ हजार ६७० मते मिळाली आहेत. रईस शेख हे ५१ हजार ७८४ मतांनी विजयी झाले आहेत. पूर्व विधानसभा मतदारसंघांमध्ये केलेले विकास कामे डोळयासमोर ठेवून येथील जनतेने मला दुसऱ्यांदा निवडून दिले आहे.येथील जनतेला शहराचा विकास हवा असून आता नागरिकांनी जातीपातीचे राजकारण दूर सारून विकास कामांच्या मुद्द्याला महत्त्व दिले असून हिंदू मुस्लिम व इतर सर्व समाज बांधवांनी मला भरघोस मतांनी विजयी केले असल्याने या सर्वांचा मी आभारी राहीन. राज्यात महाविकास आघाडीला बहुमत मिळाले नसले तरी भिवंडीतील जनतेने मला प्रचंड बहुमताने विजयी केले आहे,त्यामुळे येथील जनतेचा मी सदैव ऋणी राहून भिवंडी शहराचा जास्तीत जास्त विकास करण्यासाठी प्रयत्न करीन अशी प्रतिक्रिया विजयी उमेदवार आ.रईस शेख यांनी दिली आहे. तर भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदार संघातून शिवसेना शिंदेसेनेचे शांताराम मोरे विजयी झाले आहेत.शांताराम मोरे यांना एकूण १२७२०५ मते मिळाली असून त्यांचे प्रतिस्पर्धी उद्धव सेनेचे महादेव घाटाळ यांना एकूण ६९२४३ मते मिळाली.शांताराम मोरे हे ५७९६२ मतांनी विजयी झाले आहेत. या विजयाने शांताराम मोरे यांनी विजयाची हेट्रिक साधली आहे. मोरे यांच्या विजयानंतर मोरे समर्थकांनी मतमोजणी केंद्राबाहेर फटाके फोडत व गुलाल उधळत एकच जल्लोष साजरा केला.राज्य शासनाच्या माध्यमातून केलेल्या विकास कामांमुळे ग्रामीण जनतेने माझ्या बाजूने कौल दिल्याने मी विजयाची हॅट्रिक साधू शकलो,येणाऱ्या काळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली भिवंडी ग्रामीण मतदार संघाचा जास्तीत जास्त विकास करणार असून सर्व मतदारांनी माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाला कोठेही तडा जाऊ देणार नाही अशी प्रतिक्रिया विजयी उमेदवार आ.शांताराम मोरे यांनी दिली आहे.

# हिवाळ्यात कारले खाणे फायदेशीर, हृदयरोग कमी होण्यास मदत

## चवीला कडू असलेले कारले आरोग्यासाठी उपयुक्त-आहारतज्ञांचा सल्ला

वाडा, दि. २५ : प्रतिनिधी



कारले म्हटल्यावर अनेकांच्या चेहऱ्यावर अठ्या येतात आणि तोंड वाकडे केले जाते. मात्र, कारले कडू जरी असले तरी, आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त असते. मधुमेहसारख्या आजारावर तर कारल्यासारख्या कडू भाज्या उत्तम उपाय ठरू शकतात. हिरव्या भाज्या विविध कारणांसाठी उपयुक्त असतात. चवीने कडू असली तरीही भाजी खाण्याची लहानपणापासून सवय असल्यास ती नकोशी होत नाही. तसेच हा कडूपणा कमी करण्याच्या अनेक पद्धती आहेत. त्याही भाजी करणाऱ्या महिलांनी माहीत करून घेणे आवश्यक आहे, सल्ला आहारतज्ञ देत आहेत.

हृदयरोगासाठी कारले अतिशय उपयुक्त असते. यामुळे हृदय मजबूत होऊन हृदयरोग पुण्यापासून बचाव होतो. कारल्याने रोगप्रतीकारक क्षमता वाढते. कारल्याच्या रसाने त्वचारोगावर नियंत्रण राहते आणि हृदयरोग होत नाही. याशिवाय काविळ आणि हिपेटायटिस यासारख्या आजारांसाठी ही अतिशय उपयुक्त असते. रोज एक ग्लास कारल्याचा रस प्यायल्यावर शरीरातील पचनक्रिया सुरळीत होते. कारल्याने भूक लागण्यास मदत होते आ णि वजन कमी होण्यासही उपयोग होतो.

कारल्याचे अँटी इम्पलेमेंटरी गुणधर्म जळजळ कमी होण्यास मदत करते. विशेषतः हिवाळ्यात सांधेदुखी, हातपाय दुखी , संधीवात समस्या दूर होतात. सामान्य हंगामी अस्वच्छता कमी करते. त्वचेचे आरोग्य वाढवते कारल्यामध्ये असलेले अँटीमाइकोबियल गुणधर्म आणि अँटीऑक्सीडेंटस स्वच्छ आणि निरोगी त्वचा राखण्यास मदत करतात. विशेष म्हणजे कारल्याचे उत्पादन वर्षभर घेतले जाते. त्यामुळे सदर कारले कधीही उपलब्ध होतात. मात्र हिवाळयात कारले अतिशय चविष्ट असतात. त्यामुळे कारल्याचे सेवन करावे, असा सल्ला आहारतज्ञ देतात.

कारले शरीरातील साखरेवर नियंत्रण ठेवते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णासाठी कारले अतिशय उपयुक्त ठरते. सकाळी उपाशीपोटी कारल्याचा रस पिणे हा मधुमेहावर रामबाण उपाय ठरू शकतो. हिरव्या भाज्या या डोळयांच्या आरोग्यासाठी चांगले असतात. त्याचप्रमाणे कारल्याचा रस पिल्याने डोळे निरोगी राहतात. सध्या आपण दिवसातील सर्वाधिक काल कॉम्प्युटर स्किन समोर असतो. त्यामुळे डोळयांच्या समस्या उद्भवण्याची शक्यता असते. मात्र, कारले खाल्याने डोळयांचे आजार होत नाहीत, असे तज्ञांचे मत आहे.

> कारले ही कमी किमतीत उपलब्ध होणारी भाजी आहे. तसेच कारले वर्षभर उपलब्ध होते कारले खाण्याचे अनेक फायदे आहेत. आठवड्यातून किमान एकदा तरी कारल्याची भाजी खावी.
>
> **- डॉ. जयेश पाटील, आहारतज्ञ**

# सुरक्षा ठेव देखील वाचवू शकले नाहीत भिवंडीत नोटा द्वारे 21 उमेदवार पराभूत

भिवंडी, दि. २५ : प्रतिनिधी

भिवंडीतील तीन विधानसभा मतदारसंघांच्या निवडणूकीचे धक्कादायक निकाल समोर आले आहे. एकूण ३२ उमेदवारांपैकी २१ उमेदवारांना नोटा पेक्षा कमी मते मिळाली आणि त्यांची अनामत रक्कम जप्त झाली.या निकालामुळे स्थानिक राजकारणात खळबळ तर निर्माण होत आहेच, पण लोकांच्या बदललेल्या मानसिकतेवर आणि राजकीय पक्षांच्या रणनीतीवरही प्रश्न उपस्थित होत आहे.भिवंडी पश्चिम विधानसभा मतदारसंघात भाजपचे महेश चौघुले यांनी ३१,२९३ मतांनी विजय मिळवून विजयाची हॅटट्रिक पूर्ण केली.या मतदारसंघात १०७२ मतदारांनी नोटा केले. त्यापेक्षा कमी मिळालेल्या १४ उमेदवारांपैकी ९ उमेदवारांना आपले डिपॉझिट गमवावे लागले.त्यांना नोटा पेक्षा देखील कमी मते मिळाल्याने त्यांचा लाजिरवाणा पराभव झाला.भिवंडी पूर्व विधानसभा मतदारसंघात समाजवादी पक्षाचे आमदार रईस शेख यांनी त्यांचे प्रतिस्पर्धी संतोष शेट्टी यांना कडवी झुंज दिली आणि त्यांचा ५१,७८४ मतांनी पराभव करत दुसऱ्यांदा विजय मिळवला.येथे ७३८ मतदारांनी नोटाला पसंती दिली. या मतदारसंघात एकूण ११ उमेदवारांपैकी ८ उमेदवारांना नोटा पेक्षा देखील कमी मते मिळाल्याने ते त्यांची अनामत रक्कम वाचवू शकले नाहीत.भिवंडी ग्रामीण विधानसभा मतदारसंघात शिवसेनेचे (शिंदे गट) शांताराम मोरे यांनी त्यांच्या प्रतिस्पर्ध्याचा ५७,९६२ मतांनी पराभव करत तिसऱ्यांदा विजय मिळवला.येथे २५७१ मतदारांनी नोटा केले.या मतदारसंघात एकूण ७ उमेदवारांपैकी ३ उमेदवार असे होते त्यांना नोटा पेक्षा कमी मते मिळाल्याने ते डिपॉझिट वाचवू शकले नाहीत.तर भिवंडीतील तीन मतदारसंघात नोटा मुळे पराभूत झालेल्या अन्य एका उमेदवारासह एकूण २१ उमेदवारांमध्ये काही नामवंत पक्षाच्या उमेदवारांचा समावेश आहे.या उमेदवारांच्या पराभवामुळे पुढील मनपा निवडणुकीच्या राजकारणात परिणाम होणार आहे.मतदार आता केवळ औपचारिक उमेदवारांना स्वीकारण्यास तयार नसल्याचे या निकालावरून दिसून येते. हे निकाल राजकीय पक्षांना इशारा देणारे ठरतील,असे राजकीय विश्लेषकांचे मत आहे. आता केवळ निवडणूक समीकरणच नव्हे, तर उमेदवारांची प्रतिमा आणि सार्वजनिक समस्यांकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन याला महत्त्व प्राप्त होणार आहे.

# खोटारडा म्हणत मिटकरींची रोहित पवारांवर टीका





■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २५ :

रोहित पवार यांच्या कर्जत-जामखेड मतदारसंघात जय, पार्थदादा पैकी कुणी एक जरी फिरला असता तरी याचा करेक्ट कार्यक्रम वाजला असता. रोहित पवारांनी बारामतीमध्ये अजित पवारांचे पाय पकडून माझ्या मतदारसंघात येऊ नका असे म्हटले, असे म्हणत राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमोल मिटकरी यांनी रोहित पवारांवर टीकास्त्र डागले आहे.

दरम्यान अजित पवार आणि रोहित पवार यांची स्व.यशवंतराव चव्हाणांच्या समाधीसमोर भेट झाली. यावेळी अजित पवार रोहित पवारांना म्हणाले की, 'बेट्या थोडक्यात वाचलास, माझी सभा झाली असती तर...', यावर बोलताना रोहित पवार म्हणाले की अजित पवार हे मोठे नेते आहेत. त्यांच्या सभेमुळे काहीतरी खालीवर झाले असते किंवा उलटही झाले असते. पण ते बारामतीमध्ये अडकून पडले, असा टोला रोहित पवारांनी लगावला. यावरुन अमोल मिटकरी यांनी रोहित पवारांवर जोरदार हल्लाबोल केला आहे.

### नेमके मिटकरींचे ट्विट काय?

अमोल मिटकरी यांनी ट्विटमध्ये म्हटलंय की, स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या समाधीसमोर नतमस्तक झाल्यावर हा किती खोटा बोलतोय.बारामतीमध्ये पाय धरून काका माझ्या मतदारसंघात येऊ नका ही विनंती करुन ,आज मस्तीत बोलतोय.जय,पार्थदादा पैकी कुणी एक जरी कर्जत जामखेड मध्ये फिरला असता तरी याचा करेक्ट कार्यक्रम वाजला असता.

# शहरात प्लास्टिक बाटल्यांचा नाल्यांत खच
## रस्त्यांवर जागोजागी कचऱ्याचे ढीग

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २५ :

प्लास्टिकच्या पिशव्यांतून भरून रस्त्यावर फेकलेले शिळे अन्न, ड्रेनेजच्या जवळ, रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत, पडक्या विहिरी आणि ओसाड जागेत सर्रास टाकण्यात येणारा कचरा, नाल्यामध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांचा साचलेला खच, असे चित्र शहरात दिसत आहे. शहर व शहरालगतच्या वाढीव हद्द भागातील गटारी साफ करणारे नियमित येत नसल्याने गटारी तुंबल्या आहेत. तर शहरात ठिकठिकाणी प्लास्टिक कचरा पडल्याचे दिसून येत आहे. मनपाने शहरातील साफ सफाईकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. गटारांमध्ये मातीबरोबरच प्लास्टिकच्या बाटल्या, खाद्यपदार्थांची वेष्टनेही निघत आहेत. प्लास्टिकमुळे गटारी तुंबल्याचे चित्र आहे. प्लास्टिक विरोधात मोहिमा घेतल्या जातात. या अनुषंगाने प्लास्टिकच्या वापरावर बंदी आणि कुठेही कचरा टाकण्यावर बंदी घालण्यात आली होती. लोकांनाही सुका आणि ओला कचरा वेगळा करून देण्याचे सांगितले जात आहे. मात्र, या नाल्यांमध्ये मोठ्या प्रमाणात प्लास्टिक सापडत असल्याने नागरिकांनी प्लास्टिक कचरा नाल्यात आणि गटारांमध्ये फेकल्याचे स्पष्ट झाले आहे. यामुळे पाण्याचा योग्य प्रकारे निचरा होण्यास अडथळा निर्माण होतो. या नाल्यांमध्ये अशा प्रकारचा कचरा पडू नये, यासाठी प्रशासनाला अधिक काळजी घेणे गरजेचे झाले आहे. पाणी जाण्याच्या ठिकाणी जाळी बसवून हा प्लास्टिकचा कचरा रोखला जाऊ शकतो. त्यामुळे प्रशासनाने तशा उपाययोजना राबवाव्यात, अशी मागणी नागरिक करत आहेत.



### प्लास्टिक पिशव्या गुरांच्या पोटात

रस्त्याच्या कडेला पडलेल्या कचऱ्यामध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांचे प्रमाण सर्वांत जास्त दिसून येते. या पिशव्या वाऱ्यामुळे उडून इतरत्र जातात. त्यामुळे रस्त्याने जाणाऱ्या वाहनचालकांसह परिसरातील नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. प्लास्टिकच्या पिशव्यांमध्ये टाकण्यात येणारे खाद्यपदार्थ मोकाट जनावरांना खाणे शक्य होत नाही. अनेकवेळा तो त्यांच्या पोटात जातो. गेल्या सहा महिन्यात अनेक गुरांच्या पोटातून प्लास्टिकच्या पिशव्या शस्त्रक्रिया करुन काढण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालयाच्या सूत्रांनी दिली.

### मोकाट कुत्री, डुकरे विखुरतात कचरा

अनेक नागरिक घरात प्लास्टिक पिशव्यांमध्ये कचरा, शिळे अन्न, खाद्यपदार्थ साठवल्यानंतर ती पिशवी घराबाहेर पडताना सोबत घेतात व रस्त्याने जाताना दुचाकीवरूनच कचराकुंडीच्या दिशेने फेकतात. बऱ्याच वेळा कचऱ्याची पिशवी कचराकुंडी ऐवजी बाजूलाच पडते. त्यामुळे कचराकुंडीच्या बाहेर पडलेल्या कचऱ्यात सर्वांत जास्त प्लास्टिक पिशव्या दिसत आहेत. या पिशव्यांमध्ये अन्नाचा शोध घेण्यासाठी मोकाट कुत्री, जनावरे मोठ्याप्रमाणावर येतात.त्यामुळे हा प्लास्टिकचा कचरा जर दोन ते तीन दिवस रस्त्यावर पडल्यास त्याची दुर्गंधी सुटत आहे. शहराच्या प्रत्येक भागात स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी संबंधित प्रभागातील स्वच्छता निरीक्षकांची आहे. आपल्या भागात गटारी, नाल्याची नियमित स्वच्छता न झाल्यास किवा शहरात कुठे गटारी तुंबल्या किंवा रस्त्यावर कचऱ्याचे ढीग दिसल्यास नागरिकांनी महापालिकेच्या संबंधित झोन कार्यालयात तक्रार करावी. त्याची तातडीने दखल घेतली जाईल.

# कुमारवयीनांना दारूमुळे गंभीर आजार

**प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आशिष देशपांडे यांनी साधला संवाद**



■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. २५ :

आपल्याकडे साधारणत: मद्यप्राशन अर्थात दारु पिण्याचे सरासरी वय १८ वर्षाचे होते. परंतु आज काळानुरुप बदललेली परिस्थिती पाहता ते १२ ते १५ वर्षांवर आले आहे. कुमारावस्थेतील मुलेही दारुच्या आहारी जाऊन व्यसनाधीन होत आहेत. कमी अर्थात कुमारवयात वयात दारु पिण्याचे जडलेले हे व्यसन पाहता त्यापासून मानवास जडणाऱ्या व्याधींचा धोकाही वाढला आहे. आजच्या स्थितीत १०० पैकी ३ ते ८ टक्के लोकांना कमी वयात दारू पिण्यामुळे गंभीर आजार जडत आहेत, अशी माहिती अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस (ए.ए.) संस्थेचे माजी विश्वस्त तथा मुंबई येथील प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ. आशिष देशपांडे यांनी येथे दिली. अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस (ए.ए.) म्हणजेच अनामिक मद्यपी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी काम करणारी संस्था आहे. या संस्थेच्या अकोला फेलोशिप समूहाचा वर्धापन दिन सोहळा अल्काथॉन रविवारी येथील नेहरु चौकातील जीवन प्राधिकरणाच्या जीवन तरंग हॉल येथे झाला. या कार्यक्रमात संस्थेच्या सदस्यांना मार्गदर्शन करण्यासाठी डॉ. आशिष देशपांडे येथे आले होते. त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधला. मानसोपचार तज्ञ डॉ. देशपांडे यांनी सांगितले की, दारु पिण्याचे जडलेले व्यसन मानवी आयुष्याची राखरांगोळी करते,हे समाजाने जाणून घेतले पाहिजे. दारु सेवनामुळे २०० प्रकारचे वेगवेगळे आजार ज़डतात. आज एक तृतीयांश आत्महत्या या दारुच्या प्रभावामुळे तर दोन तृतीयांश आत्महत्या या कौटुंबिक हिंसाचार वादातून घडतात. टक्के लोकांच्या नोकऱ्या या दारुच्या व्यसनांमुळे नोकरीच्या ठिकाणी गैरहजर राहण्यामुळे गेल्याचे एका पाहणीत आढळून आले आहे.

अल्कोहोलिक्स ॲनॉनिमस (ए.ए.) संस्थेतर्फे मद्यपींची दारु

# जिल्ह्यातील ३ लाखांहून अधिक निराधारांना अनुदानाची प्रतीक्षा



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २५ :

अमरावती केंद्र सरकारच्या चार निराधार योजनेचे पैसे मागील आठ महिन्यांपासून खात्यावर जमा न केल्याने ज्येष्ठ नागरिकांवर उधार-उसनवार घेण्याची वेळ आली आहे. त्यामुळे सध्यातरी जिल्ह्यातील लाभार्थी वृद्ध निराधार झाले आहेत. तसेच राज्य शासनाच्या संजय गांधी आणि श्रावणबाळ निवृत्ती वेतन योजनेचेही दोन ते तीन महिन्यांचे अनुदानही रखडले आहे. जिल्ह्यात केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनेचे ३ लाख ६७ हजार ७४३ लाभार्थी आहेत. या सर्व लाभार्थ्यांना आता आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. जिल्ह्यातील वृद्ध, निराधार, दिव्यांग, ज्येष्ठ नागरिकांना शासनाच्या निराधार योजनेतून दरमहा १ हजार ५०० रुपये मदत दिली जाते. मात्र, एप्रिल ते नोव्हेंबर १५ या काळात निराधारांच्या खात्यात मानधनाची रक्कम जमा झाली नसल्याचे काही लाभार्थी ज्येष्ठांनी सांगितले. राज्य शासनाकडून सुरू असलेल्या योजनेमध्ये ६० टक्के वाटा हा केंद्राकडून दिला जातो. असे असले तरीही सध्या या योजनांचे अनेक लाभार्थी प्रत्यक्षात लाभापासून वंचित आहेत. सध्या लाडकी बहीण योजनेकडे शासनाने विशेष लक्ष दिले. मात्र, दुसरीकडे संजय गांधी निराधार, श्रावणबाळ, दिव्यांग, विधवा अशा दारिद्र्य रेषेखालील अनेक लाभार्थी अनुदानापासून वंचित आहेत. सण-उत्सवाच्या काळात लाभार्थ्यांच्या पदरी निराशाच आली आहे. अनेक लाभार्थी शासनाच्या मानधनावर अवलंबून असल्याने त्यांची मात्र आर्थिकदृष्ट्या दमछाक होत आहे. योजनानिहाय लाभार्थी संख्या : श्रावणबाळ राज्य सेवा निवृत्ती वेतन योजना -२११५४४, संजय गांधी निराधार अनुदान योजना -९११५३, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतन योजना ५९८६९, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना -३२६४, इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन योजना ४५९, राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना -१४५४ अशी एकूण ३ लाख ६७ हजार ७४३ लाभार्थी संख्या आहे.

### केवळ ७०० रुपये दिले

इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्ती वेतनातील अनुदान अजूनही देण्यात आले नाही. यातील राज्य शासनाचे ४० टक्के अनुदान प्राप्त झाले असल्याचे बँकेकडून सांगण्यात आले आहे. सातशे रुपये रक्कम बँकेत जमा केले आहेत. -रूपेशपाटील, लाभार्थी, निराधार योजना.

### ३ महिन्यांचे पैसे आले नाही

मागील तीन महिन्यांपासून अनुदान मिळाले नाही. लाडकी बहीण योजनेची गर्दी बँकेत होती. त्यामुळे आधीच चकरा माराव्या लागल्या. बँकेत रांगेत उभे राहावे लागले.

बँक व्यवस्थापकाला विचारणा केली असता खात्यात पैसे जमा झाले नसल्याचे सांगण्यात येत आहे.

# ओजसचे बहारदार तबला वादन ; भाग्येश मराठे यांचे सुमधूर गायन

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २५ :

भारतातील सर्वात तरुण तबला वादक म्हणून प्रख्यात ओजस अढिया यांच्या बहारदार तबला वादनाने श्रोते भावविभोर झाले. तबला, डग्याची सरगम, कधी हळूवार, तर कधी तालबद्ध ठेक्यांनी रसिकांच्या मनाला साद घातली. तबलाही तालबद्ध, सुरेल




तसाच अलवार होत श्रोत्यांशी संवाद साधतो. अखंड नर्तन करतो, याची सुखद प्रचिती देत सुप्रसिद्ध वादक मृदंगराजन यांचे शिष्योत्तम युवा कलाकार ओजस अढिया यांनी संगीत समारोहाचा दुसरा दिवस शनिवार संस्मरणीय केला. तीन दिवसीय अंबादेवी संगीत सेवा समारोह कीर्तन सभागृहात सुरू असून, पहिल्या सत्रात ओजस अढिया यांचे स्वागत विश्वस्त ॲड. राजेंद्र पांडे यांनी केले. हार्मोनियम वादक सिद्धेश बिचोलकर यांचे स्वागत विश्वस्त विलास मराठे यांनी केले. ओजस यांनी भरगच्च कीर्तन सभागृहात बहारदार त्रितालाने प्रारंभ करून तबला वादनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. तबला हे अभिजात हिंदुस्थानी संगीतात वापरले जाणारे लोकप्रिय तालवाद्य आहे.

स्वर ज्ञान, तालांचे वजन, बोलांचे वजन, तालांचे विभाग, लयीचे प्रकार यातील विविधता असली तरच तबलावादक श्रोत्यांची दाद घेतो. तबला हा कार्यक्रमात केवळ साथसंगत करण्यासाठीच नव्हे, तर स्वतंत्र आणि प्रगल्भ वादन श्रोत्यांना कर्णतृप्तीचा सुखद अनुभव देते. ओजस यांनी कायदा, रेला, तोडा, लय, ताल, रियाजातून विलक्षण तांत्रिक योग्यता आणि विपुल ज्ञानाची जोड देत स्वतःची वादन शैली विकसित केली आहे. केवळ श्रवणीय असा हा कार्यक्रम अविस्मरणीय झाल्याचे संगीततज्ज्ञ अनिता कुळकर्णी म्हणाल्या. कार्यक्रमाची गोडी वाढवणारी मधुर हार्मोनियम संगत पुरस्कार प्राप्त सिद्धेश बिचोलकर यांनी केली.

# कानाची सहनशीलता ७० डेसिबलची ; प्रत्यक्षात आवाज ११० डेसिबलपर्यंत

## डीजेच्या कर्णकर्कश आवाजामुळे नागरिक त्रस्त



■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. २५ :

डीजेच्या कर्कश आवाजामुळे उद्भवणाऱ्या समस्या लक्षात घेता, काही अटी व शर्ती घालून डीजेची परवानगी दिली जाते. यामध्ये डेसिबलपर्यंत डीजेचा आवाज ठेवण्यास परवानगी आहे. परंतु, शहरात विधानसभा निवडणूक प्रचार, सभा, सांस्कृतिक कार्यक्रम यासह विजयी उमेदवार यांच्या जल्लोषाची मिरवणूक, रॅली यामध्ये डीजेचा आवाज हा डेसिबलपर्यंत गेला आहे. परंतु, प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केल्याचे दिसून येत नाही. डीजेच्या मोठ्या आवाजामुळे श्रवणशक्तीवर परिणाम होऊन कमी ऐकू येणे तसेच कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. हृदयावर कर्णकर्कश डीजेचा विपरीत परिणाम होऊन हृदयविकार, चिडचिडेपणा, मानसिक विकार, शारीरिक विकार होण्याची दाट शक्यता आहे. जास्त डेसिबल आवाज असणाऱ्या डीजेमुळे लहान बालके, गरोदर महिला, ज्येष्ठ नागरिक, हृदयविकार असणाऱ्यांना मोठा त्रास होतो. कानाचा पडदा कायमचा निकामी झाल्याच्या घटनाही ताज्या आहेत.

दवाखाना, शाळा, आदी ठिकाणी डीजे वाजवण्यास प्रामुख्याने बंदी असली, तरी त्या ठिकाणी बिनधास्तपणे डीजे वाजवला जातो. अनेक वेळा विविध कार्यक्रमांमध्ये परवानगी न घेताही डीजे वाजवला जातो. शहरासह ग्रामीण भागात काही राजकीय पुढाऱ्यांकडून निवडणूक प्रचार सभा, विविध सांस्कृतिक कार्यक्रम तसेच विधानसभा निवडणुकीत वाजणारे डीजे यामुळे ध्वनीप्रदूषणाची समस्या मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली आहे. परंतु, या डीजेच्या आवाजाकडे प्रशासनाचे मात्र दुर्लक्ष होते. दरम्यान मनुष्याच्या कानाला डेसिबलपर्यंतचा आवाज सहन होतो. त्यापुढील आवाज सातत्याने ऐकला तर त्याचा आरोग्यावर दुष्परिणाम होण्याची शक्यता असते.

### किती डेसिबलपर्यंत डीजेला परवानगी

डीजेसाठी औद्योगिक परिसरात ७५ डेसिबल, व्यावसायिक परिसरात ६५, रहिवासी परिसरात ५५, शांत परिसरात ५० डेसिबलपर्यंत परवानगी देण्यात आली आहे. परंतु, या नियमांचे पालन होत नाही.

### ९० डेसिबलचा आवाज सतत ऐकल्यास बहिरेपणा

मनुष्य सर्वसाधारणपणे ४५ डेसिबल आवाज आरामात ऐकतो. ७० ते ८० डेसिबल आवाज सहन करू शकतो. ८० ते ९० डेसिबलचा आवाज सतत ऐकला तर बहिरेपणा येऊ शकते. डीजेच्या मोठ्या आवाजामुळे कायमचा बहिरेपणा येऊ शकतो. कानाच्या नसा कमजोर होतात. हृदयाचे ठोके वाढतात.

कानात शिट्टीसारखा आवाज येतो. - डॉ. मंगेश मेंढे, ईएनटीप्रमुख.


## कार्यालय, नगर परिषद कन्हान-पिपरी
तह. पारशिवनी, जिल्हा - नागपूर

Ph: 07102-299904 Email: kanhanpiprinagarparishad@gmail.com

जा.क्र.नपकपि/स्व/मुअ/२२२८ /२०२४ दिनांक :२६/११/२०२४

**जाहीर सूचना**

स्वच्छ सर्वेक्षण २०२४

ODF+ व ODF++ स्वयंघोषित करणेबाबत.

कन्हान-पिपरी शहरातील सर्व नागरिकांना सूचित करण्यात येते कि नगर परिषद कन्हान द्वारे ODF+ व ODF++ घोषित करणे करिता शासनाने नेमून दिलेल्या सर्व निकषांची अंमलबजावणी होत असल्याने नगर परिषद कन्हान-पिपरी शहर हे ODF+ तसेच ODF++ म्हणून स्वयंघोषित करण्यात येत आहे.

तरी ODF+ व ODF++ याबाबतीत नागरिकांच्या काही हरकती किंवा आक्षेप असल्यास सूचना प्रसिद्धी दिनांकापासून पुढील ०५ दिवसापर्यंत लेखी स्वरूपात पुराव्यासह सादर करावे. मुदत संपल्यानंतर येणाऱ्या हरकती किंवा आक्षेप विचारात घेतल्या जाणार नाही

मुख्याधिकारी
नगर परिषद कन्हान - पिपरी



## NAGPUR MUNICIPAL CORPORATION
**Tender Notice**

Commissioner NMC invites Offline Tenders for the following works in two envelopes system. These tenders can be Submitted by the Registered Contractors of NMC. The terms and conditions of tenders are available at the Office of Executive Engineer Zone 10 Office, NMC. The sale and purchase of tenders can be done through offline.

| Name of the work | BOQ Cost |
|---|---|
| Providing & Laying Sewer Line at Yogendra Nagar In Pra. No. 11 | 829816/- |
| Providing & Laying Sewer Line at Various Places in Goa Colony In Pra. No. 09 | 829595/- |
| Fixing Kota & Various Civil Work at Sant Ravidas Samaj Bhawan Near Bhim Chowk In Pra. No. 01 | 837555/- |

**Note:** **(1)** EMD 9000/-, Cost of Blank Tender Form (Rs.) 590/-, Time Limit 4 months, Class of Contractor I to VII. **(2)** Eligibility Criteria and Mode of Submission shall be as stated in tender document. **(3)** Tenderer shall have to submit Cost of Blank Tender Form each Rs. 590/- at the Office of Executive Engineer Zone 10 and should be submit the copy of these in Technical Bid Document Envelope. **(4)** Tender Sale Start & Submission End Date : 25.11.2024. (Sales end upto at 5.00 p.m ). Tender Opening Date: 10.12.2024 at 5.00 p.m.

**Advt No : 696/PR, Dt : 25/11/2024**

**Sub-Divisional Engineer Zone 10, N.M.C., Nagpur**


# शिक्षकाने मित्रालाच ५ लाखांना फसवले

## जीवे मारण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी, उमरखेड

दि. २५ : तालुक्यातील वसंतनगर पोफाळी येथील राजेश व्यवहारे या व्यक्तीची जिल्हा परिषद बोथा येथे सेवेत असलेल्या एका शिक्षकाने शेअर मार्केटमधून तुला नफा मिळवून देतो, असे सांगत पाच लाख रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणाची तक्रार उमरखेड पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. पोलिस सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, वसंतनगर पोफाळी येथील राजेश व्यवहारे सध्या पुणे जिल्ह्यातील मोरवाडी येथे राहतात. त्यांच्यासोबत मैत्रीचे नाते असल्याने उमरखेड येथील मोहन नगरातील रहिवासी शिक्षक विजय उत्तम ब्याळे यांनी राजेश व्यवहारे यांना शेअर मार्केटमध्ये गुंतवणूक केल्याने फार नफा मिळतो, असे सांगितले. मी तुला अधिकचा नफा मिळवून देतो म्हणत पाच लाख रुपयांची फसवणूक केली. काही दिवसानंतर शिक्षकास पैशाची मागणी केली. परंतु, त्यांनी उडवाउडवीचे उत्तरे देत पाच लाखांतून दोन लाख रुपये परत केले. नंतर उर्वरित व्यवहारे यांनी शिक्षक ब्याळे यांना पैशाच्या मागणीसाठी संपर्क केला, तेव्हा त्यांचे नातेवाईक नंदेश्वर चिंचोलकर यांनी व्यवहारे यांना फोनवरून पुन्हा पैशासाठी मागणी केल्यास तुला जीवे मारण्यात येईल, अशी धमकी देत अश्लील भाषेत शिवीगाळ केली. याबाबतची तक्रार नोव्हेंबर रोजी उमरखेड पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. त्यामुळे फसवणूक करणारे शिक्षक विजय उत्तम ब्याळे व नातेवाईक नंदेश्वर चिंचोलकर यांच्याविरुद्ध उमरखेड पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.


## कार्यालय नगरपंचायत बेसा पिपळा
ता.जि.नागपुर

E-mail-npbesapipla@gmail.com

जावक क्र. न.पं.बे.पि./स्व.वि/३६००/२०२४ दिनांक : २५/११/२०२४

**जाहीर सूचना**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 अंतर्गत घेण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षण करिता नगर परिषद/ पंचायत स्तरावर मदत करण्यासाठी एकत्रित वेतनावर तात्पुरत्या स्वरुपात केवळ 11 महिन्यासाठी शहर समन्वयक (City Coordinator) यांची कंत्राटी नियुक्ती करावयाची आहे खालील नमूद केलेल्या कंत्राटी पदभारतीसाठी दि. 26/11/2024 ते दि. 02/12/2024 सायंकाळी 6:15 वाजेपर्यंत नगर पंचायत बेसा -पिपळा जेथे विहित नमुन्यात अर्ज आवश्यक कागदपत्रासह सीलबंद लिफाफ्यात स्वीकारण्यात येत आहे. अर्जाचा नमुना नगर पंचायत बेसा-पिपळा कार्यालयात पहावयास मिळेल.

तरी इच्छुक व पात्र उमेदवारांनी आवश्यक त्या शैक्षणिक, अनुभव प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रासह अर्ज विहित मुदतीत सादर करावा. अर्जदाराच्या कोणत्याही अटी किवां शर्ती मान्य करता येणार नाही.

| पदनाम | पदांची संख्या | शैक्षणिक अहर्ता | वयोमर्यादा | अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक (city co-ordinator | १. | मान्यता प्राप्त : १.बी.ई / बी.टेक (कोणतीही शाखा) | कमाल वयोमर्यादा ३५ वर्षे शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल. | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) स्थानिक कार्यालयाशी निगडीत कामाचा सहा महिन्याचा अनुभव आवश्यक आहे. (सध्या स्थितीत न.प कार्यरत असलेले शहर समन्वयक अर्ज ग्राह्य धरले जाणार नाही.) | ४५०००/- (प्रति माह) |

टीप:- वेळापत्रक तसेच अटी व शर्ती न.प.कार्यलयात पहावयास मिळेल .

मुख्याधिकारी
नगर पंचायत बेसा - पिपला

# संविधान! भारताचा राष्ट्रीय ग्रंथ!!

भारताच्या घटनेत काय नाही, हे पाहण्यापूर्वी काय आहे हे पाहिले पाहिजे. आम्हाला लोकशाहीप्रधान प्रजासत्ताक राज्य निर्माण करावयाचे होते. जाती, वंश, लिंग, धर्म वगैरेचा विचार न करता प्रत्येक व्यक्तिला राजकारणात समान हक्क्? द्यावयाचे होते. ते या घटनेत नाहीत असे कोण म्हणते? प्रत्येक व्यक्ति राजकिय हक्काच्या बाबतीत समान आहे व तिला आपले संरक्षण केले जाण्याचा हक्क आहे असे जे म्हटले आहे त्याला घटनेत कोठेही बाधा आली नाही. प्रत्येक वयात झालेल्या स्त्री-पुरुषात मताचा हक्क आहे. समान संधी, समान नोकऱ्या, समान पगार मिळण्याची तरतूद घटनेत केली आहे. कोणतीही घटना (संविधान) परिणामक्षम होण्याकरता पुरेसा लवचिकपणा असावा लागतो राज्यावर संकटे आली म्हणजे सारी सत्ता मध्यवर्ती सत्तेला आपल्या हातात घेता आली पाहिजे. त्याशिवाय देशाचे रक्षण होत नाही. एखादा प्रांत बंडखोर झाला आणि त्याला तशी स्वायतता असली तर एका राज्यात दोन राज्ये निर्माण होऊ शकतील. ती देशविच्छेदनाची एक योजनाच होईल, ते या घटनेत टाळले आहे. त्याचप्रमाणे घटनेत काही इष्ट अपरिहार्य दुरुस्त्या कराव्या असे वाटले तर ते ही करण्याची व्यवस्था घटनेत आहे. अर्थात ही दुरुस्ती करणे तितके सोपे ठेवले नाही.

--------------

1950 साली अमलात आलेले भारतीय संविधान मुख्यत्वे 1935 च्या भारत सरकार कायदा 1935 वर आधारित आहे. 1935 सालच्या या कायद्यान्वये भारताच्या अंतर्गत स्वशासनाचा पाया घातला गेला होता. ब्रिटिश पंतप्रधान क्लेमंट ॲटली यांच्या शिष्टमंडळाच्या स्वतंत्र भारताच्या संविधानाची निर्मिती करण्यासाठी एका मसुदा समितीच्या स्थापनेविषयीच्या कल्पनेस भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या नेत्यांनी सहमती दर्शविली होती. 1946 च्या उन्हाळ्यात या समितीची स्थापना झाली व तिची पहिली बैठक 9 डिसेंबर 1946 रोजी सच्चिदानंद सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली येथील संविधान सभागृह मध्ये पार पडली, जे आज सेंट्रल हॉल या नावाने परिचित आहे.

पहिल्या बैठकीला 9 महिलांसह एकूण 207 सदस्य उपस्थित होते. 15 ऑगस्ट 1947 रोजी भारतास स्वातंत्र्य मिळाल्यावर अल्पकाळ या समितीने भारताचे प्रतिनिधी रूपात काम केले होते. 29 ऑगस्ट 1947 रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठकांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा 26 नोव्हेंबर 1949 रोजी स्वीकारला गेला. यामुळे 26 नोव्हेंबर हा दिवस भारतीय संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली भारतीय राज्य घटनेत 395 कलमे व 8 परिशिष्ट्ये आहेत. आजच्या घडीला भारतीय घटनेत 448 कलमे, 25 भाग, 12 परिशिष्ट्ये, 5 पुरवण्या आहेत. भारतीय घटनेत वेळी प्रसंगी दुरुस्तीची तरतूद असल्यामुळे आतापर्यंत 98 वेळा दुरुस्ती करण्यात आली आहे. म्हणून काही कलमे वाढली आहेत याची नोंद घ्यावी.

ही घटना लिहिण्यासाठी दोन वर्षे अकरा महिने आणि सतरा दिवस लागले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर घटना मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यांना सहा लोक सहकारी दिले होते. परंतु, सहाही सदस्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना घटना लिहिण्यासाठी कसल्याही प्रकारे मदत केली नाही. त्यामुळे घटना लिहिण्याचे कार्य एकट्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना करावे लागले आणि त्यानंतरच भारतीय घटना दि. 26 नोव्हेंबर 1949 ला घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांना सुपूर्द केली. ही भारतीय राज्य घटना दि. 26 जानेवारी 1950 रोजी या देशात अंमलात आली तेव्हापासुन देशात प्रजासत्ताक राज्य सुरु झाले.






प्रविण बागडे
नागपूर.
9923620919

या भारतीय घटनेची विशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

■ भारतीय राज्य घटना (संविधान) म्हणजे ज्या ग्रंथात देश कसा चालवावा या विषयी कायदे-कानुन आणि प्रत्येक घटकाचे अधिकार कर्तव्य इत्यादी गोष्टी ज्यामध्ये नमुद केले आहे त्याला (संविधान) भारतीय राज्य घटना म्हणतात. हा एक सामाजिक सिध्दान्त आहे.

भारतीय घटनेने प्रत्येकाला जीवन जगण्याचे स्वातंत्र्य दिले आहे. कोणतीही जात,लिंग, रुढी, परंपरा कोणत्याही व्यक्तीला त्याच्या जीवीत स्वातंत्र्याच्या आड येऊ शकणार नाही. जर तसा प्रयत्न केला तर ती व्यक्ती किती मोठी असली किंवा मोठ्या पदावर असेल तरी त्या अन्याय अत्याचार करणार्या व्यक्तीला भारतीय घटनेने दोषी ठरविले आहे आणि त्याला शिक्षा करण्याची तरतूद आहे.

■ भारतीय राज्य घटना कधी ताठर आहे तर कधी लवचिक आहे. वेळी प्रसंगी घटनेत नवीन कायदे समाविष्ट करण्याची तरतूद आहे

■ देशात कधी आराजकता माजली तर आणीबाणी पुकारण्याची तरतूद घटनेत केलेली आहे. कारण अराजकतेमुळे देशाची वित्तहानी, प्राणहानी होते, जाळपोळ-दंगली घडतात. हे टाळण्यासाठी बंडखोर, चिथावणी घातक ठरणारी आंदोलने बंद करण्याची तरतूद घटनेत आहे.

■ भारतीय राज्य घटनेमुळे हजारो वर्षाची धर्मावर आधारलेली विषम व अमानवी समाज व्यवस्था नष्ट केली व समता, स्वातंत्र्य बंधुता व न्याय या मानवतावादी तत्त्वावर आधारित समाजव्यवस्था या भारतात स्थापन झाली आहे. एवढी समाज बदलाची ताकद घटनेत आहे.

■ भारतीय घटनेत स्त्री-पुरुष जातपात असा भेद न ठेवता सर्व व्यक्ती समाज आहेत हे भारतीय समाजाला भारतीय घटनेने शिकविले आहे. तसे कायदे व तरतूदी घटनेत समाविष्ट केल्या आहेत. आज भारतीय समाजाला व देशाला जगात आदर्श राज्य घटनेमुळे मान-सन्मान प्राप्त झाला आहे. हा देश अमानवी वर्ण व्यवस्था जातीभेदामुळे जगात आपला देश बदनाम झाला होता.

■ भारतीय राज्य घटना मानवी मुल्य जपणारी असल्याने आज जगाला मार्गदर्शन करीत आहे. या भारतीय घटनेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सारे जग कौतुक करीत आहे. जगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना बौध्दिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व मानवता या क्षेत्रात अग्रगण्य स्थान दिले आहे.

■ भारतीय घटनेमुळे डॉ. बाबासाहेबांचे जातीयतेविरुध्दचे कार्य आधुनिक मानवाला विषमतावादी विचारांना समतावादी विचाराकडे नेणारा प्रबोधनाचा मार्ग बनले आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगाचे गुरु बनले आहेत. युग बदलणारा, समाज बदलणारा, जग बदलाची ताकद असणारा महामानव म्हणून त्यांना जगाने पूज्यनीय मानले आहे.

■ भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी हा देश अनेक छोट्या छोट्या राज्यात संस्थानांमध्ये विखूरलेला होता. या देशात अनेक जाती-जमाती होत्या, अनेक धर्म पंथांमध्ये हा देश विभागला होता. आपआपसात मतभेद होते. राज्य सिमावाद होता.

या वातावरणात देशात एकता आणि अखंडता, बंधुता निर्माण करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्य घटनेच्या माध्यमातून केलेले महान कार्य आहे. भारतात 29 घटक राज्ये, 7 केंद्रशासित प्रदेश आहेत. तसेच विविध जाती धमार्चे लोक रहात आहेत. या सर्वांमध्ये एकता निर्माण झाली ती केवळ भारतीय राज्य घटनेमुळे

■ कलम 14 नुसार भारतातील सर्व व्यक्तीस समानतेचे संरक्षण देण्यात आले आहे. जातपात किंवा वर्ग, वर्ण असा भेदभाव केला जाणार नाही.

■ कलम 16 प्रमाणे सार्वजनिक सेवा योजनांमध्ये समान संधी देण्यात आली आहे. कोणताही भेदभाव केला जाणार नाही.

मुलभुत हक्काच्या बाबतीतही घटनेत व्यवस्था आहे मात्र राष्ट्र संकटात सापडले मगर कोणाही व्यक्तिला केवळ स्वातंत्र्य दिले आहे व तो त्याचा दुरुपयोग करीत आहे असत वाटले तर ते स्वातंत्रय अबाधित राहणार नाही व्यक्तीला समानतेचे, धार्मिक आचार-विचार प्रचाराचे, शिक्षणच मिळण्याचे वगैरे हक्क दिले आहे. त्याचप्रमाणे व्यक्तीला पुरेशी जीवनाची साधने उपलब्ध व्हावती, संपत्तीची वाटणी समान व्हावी, सारख्या कामाकरता सारखा पगार मिळावा, लहान मुलांच्या व प्रौढांच्या प्रमाणे नागवणूक होऊ नये. प्रत्येकाला काम मिळण्याचा हक्क प्राप्त व्हावा, 14 वर्षापर्यंत प्रत्येकाला मोफत व सक्तीचे शिक्षण मिळावे, रोजगार धंद्याचे वातावरण चांगले असावे, रजेचा काळ त्याला चांगला उपभोगता यावा. त्याला सामाजिक व सांस्कृतिक संधी मिळाली. वगैरे बाबत सरकारने प्रयत्न करण्याचे ठरविले आहे.

ही घटना सावधगिरी बाळगण्याच्या दृष्टिने जितकी सुदृढ करता येईल तितकी केली आहे. सध्याचा काळ सुरक्षितेचा नसल्यामुळे त्याला अनुसरुन ही घटना केली असल्यास ते दोषास्पद नाही. अशाप्रकारे तयार केलेल्या घटनेचे आपण स्वागत केले पाहिजे.

या घटनेत दोष असलेच तर ते फाजील सावधगिरी बाळगण्याचे दोष आहेत, ते अपरिहार्य ही आहेत. त्यामुळे आपली वाढ, विकास किंवा प्रगती होण्यास कोणतीही अडचण येणार नाही. राजकारणात आपल्याला समता मिळाली आहे, पण सामाजिक व आर्थिक जीवनात राजकारणात दरडोई एकमत आणि एका मताचे एक मूल्य हे तत्व करीत आहो पण सामाजिक, आर्थिक जीवनात आपल्या विशिष्ट सामाजिक समाजरचनेमुळे, व्यक्ती मूल्याचे हे तत्वपूर्वी प्रमाणेच नाकारले जाणार आहे.

भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे 25 नोव्हेंबर 1949 रोजी संविधान देशाला अर्पण करण्याच्या एक दिवस आधीचे संविधान सभेतील आपल्या शेवटल्या भाषणात ते म्हणाले, ह्मी या ठिकाणी घटनेच्या गुणवर्णनात शिरत नाही घटना कितीही चांगली व निर्दोष असली तरी ती जर अमलात आणणारे नालायक व निरुपयोगी असेल तर तीच घटना वाईट ठरेल. त्याचप्रमाणे घटना कितीही वाईट असली तरी ती राबवणारे चांगले असतील तर ती चांगली ठरेल.

राज्यघटनेच्या स्वरुपावर तीची अंमलबजावणी अवलंबून असते. कायदेमंडळ, मंत्रीमंडळ, व न्यायधीश अशा सारखी राज्याची प्रमुख अंगे पुरविण्याचे काम राज्यघटना करीत असते. या राज्याच्या अंगाची अंमलबजावणी या घटकांवर अवलंबून असते ते घटक म्हणजे जनता व देशातील राजकिय पक्षोपक्ष हे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या भाषणात स्वतंत्र्य भारताच्या स्वात्रंत्र्याच्या संरक्षणाविषयी लोकशाहीप्रधान राज्यघटनेच्या सुरक्षिततेविषयी आणि लोकशाहीच्या जोडीला स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व जीवनमुल्यांवर आधारित सामाजिक लोकशाहीला अत्यंत महत्वाचे स्थान देण्याविषयी जे बहुमुल्य विचार व्यक्त केले, ते मार्गदर्शन आहेत.

संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही. परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मयार्दा असल्या पाहिजेत. आयरीश देशभक्त डॅनियल ओकॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करुशकत नाही, कोणतीही स्त्री स्वतःच्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करुशकत नाही आणि कोणताही देश स्वतःच्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही.

इतर देशांच्या तुलनेत भारताला सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे, कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही, इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते.

धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अधःपतन आणि अंतिमतः हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो. आपल्या राष्ट्रातील श्रेष्ठ नेते व कायदेपंडीत यांनी उभारलेली घटनेची ही भव्य इमारत भारताच्याच काय, पण जगाच्या कौतूकाचा विषय झाल्याशिवाय राहणार नाही, हेही तेवढेच खरे. संविधान गौरव दिनाच्या सर्वांना शुभेच्छा !

●●●●●●●

# मानवी जीवन आणि उत्क्रांतीवाद

**उत्तरार्ध**

अगासीझ यांनी डार्विनप्रणीत उत्क्रांतीवादाच्या विरोधात जे बीज पेरले, त्याला १९२५ साली दृश्य स्वरूपात फळ आले. टेनेसीमधील पुराणमतवादी लोकांच्या दबावाखाली राज्याच्या विधिमंडळाने एक कायदा अंमलात आणण्याचा ठराव मान्य केला. या कायद्याच्या मसुद्यावर दि.२१ मार्च १९२५ या दिवशी राज्यपालांची सही झाली. त्यामुळे त्या दिवसापासून टेनेसी या राज्यात डार्विनप्रणीत उत्क्रांतीवाद शिकवणे, हा गुन्हा मानण्यात येऊ लागला.

हा कायदा म्हणजे शिक्षण घेण्याच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर घाला आहे, म्हणून त्याला उदारमतवादी घटकांनी विरोधही केला होता. त्यातल्याच कुणाच्या तरी सुपीक डोक्यात आपल्या गावाचे नाव अमर करायची कल्पना आली. आपण जर या कायद्यालाच आव्हान दिले तर विज्ञानाच्या इतिहासात आपल्या गावाचे नाव कायमस्वरूपी अमर होईल, ह्या कल्पनेने प्रभावीत झालेल्या डेटन गावच्या काही तरुणांनी त्यांचाच मित्र असलेल्या जॉन थॉमस स्कोप्स त्या शिक्षकाविरुद्ध पोलिस ठाण्यात तक्रार केली.

स्कोप्सला वर्गात उत्क्रांतीचा धडा शिकवत असताना पोलिसांनी अटक केली. हा खटला खूपच गाजला. डेटन, टेनेसी या गावाला खरोखरच प्रसिद्धी मिळाली आणि जेव्हा जेव्हा उत्क्रांतीवादाबद्दल बोलले जाते, तेव्हा तेव्हा स्कोप्स ट्रायलचा उल्लेख अपरिहार्यच असतो. या खटल्यात भर न्यायालयात वकिलांच्या शाब्दिक चकमकी झडल्याच, पण शारीरिक मारामाऱ्याही घडल्या.

आरोपी दूरच, त्याच्या आधी कोर्टाची बेअदबी केल्याबद्दल आरोपीच्या वकिलालाच दंड ठोठावला गेला. गर्दी अमाप होती. तिच्यासाठी मांडव घातले गेले. वृत्तपत्रांनी या खटल्याला मंकी ट्रायल म्हणायला सुरुवात केली. कोर्टाने अखेरीस स्कोप्सला शंभर डॉलर एवढा दंड केला. पुढे सर्वोच्च न्यायालयाने तो रद्द ठरवला. कायदा मात्र तसाच राहिला.

या खटल्याचा एक परिणाम म्हणजे इतरही अनेक राज्यांनी असेच कायदे केले. इ.स.१९६५मध्ये सुझान एपर्सन या शिक्षिकेने अर्कान्सास राज्यातील मंकी लॉ रद्द व्हावा, यासाठी न्यायालयात धाव घेतली.

अर्कान्सास राज्यात या कायद्याला रॉटनबरी एक्ट असे म्हटले जात होते. खटला दाखल करणाऱ्या एपर्सन या शिक्षिकेच्या आडनावाची फोड एप पर्सन अशी करून, ती हा कायदा रद्द करण्यासाठी धडपडणारच, असं सनातनी विचारांची मंडळी वृत्तपत्रांकडे पत्र पाठवत होती, तर सुधारणावादी हा रॉटन एक्ट बेरी करा अशा तऱ्हेचे उत्तर देऊन तसे मोर्चे काढू लागले.

कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी
(थोर शास्त्रज्ञ व संशोधकांच्या प्रेरक चरित्रांचे गाढे अभ्यासक.)
पोटेगावरोड, गडचिरोली. 9423714883.

केनेडी यांच्या खुनाची चौकशी करणाऱ्या आयोगाचे अध्यक्ष अर्ल वॉरेन यांच्या न्यायालयात हा खटला चालला. त्यांनी हा कायदा अवैध ठरवला आणि अर्कान्सास राज्यात डार्विनप्रणीत उत्क्रांतीवाद शिकवायला पुन्हा सुरुवात झाली.

सन १९८२ साली पुन्हा एकदा डार्विनवाद न्यायालयात आला. खरंतर या वर्षी डार्विनच्या मृत्यूस शंभर वर्षे होत होती. या खटल्यामध्ये सनातनी मंडळींनी स्टीफन जे.गुल्ड या शास्त्रज्ञाची साक्ष काढली होती आणि तिथंच ते फसले. स्टीफन जे. गुल्ड हे प्राणिशास्त्रज्ञ आहेत, लिम्नॉलॉजी म्हणजे शंखशिंपल्यातील प्राणी हा त्यांचा खास अभ्यासाचा विषय.

हा अभ्यास करताना एक गोष्ट त्यांच्या लक्षात आली. प्राण्यांची उत्क्रांती ही साधी सरळ अशा प्रकारे झालेली नाही, तर काही वेळा अल्पावधीत परिस्थितीनुरूप प्राणी बदलतात तर काही वेळा दीर्घकाळ त्यांच्यात कोणताही बदल होत नाही. यामुळे आज जरी माणूस हा डार्विनवादानुसार उत्क्रांतीचं शिखर मानला जात असला तरी तो उद्या बदलणारच नाही, याची खात्री देता येत नाही. (लाख दोन लाख किंवा पाच लक्ष वर्षे हा भूशास्त्रीयदृष्ट्या अत्यल्प काळ आहे, हे इथं लक्षात ठेवायला हवं.) कारण माणूस पृथ्वीच्या इतिहासात नुकताच अवतरला आहे. त्यांच्या या सिद्धांताबद्दल मतभेद आहेत, ते असणारच आणि असायलाही हवेत.

माध्यमांनी ही बातमी सनसनाटी वाटावी म्हणून डार्विनचा उत्क्रांतीवाद मोडीत काढणारा शास्त्रज्ञ अशी प्रसिद्धी गुल्ड ह्यांना दिली. न्यायालयात त्यांची तपासणी चालू असताना गुल्ड म्हणाले, उत्क्रांती झाली नाही, असं मी कधीच म्हणालो नाही. उलट हाताशी कुठलीही साधने नसताना उत्क्रांती हा विचार मांडणे हे प्रज्ञावंताचेच काम आहे, पण आता गुणसूत्रे आणि जनुकांतील बदल पाहता येतात, त्यामुळे उत्क्रांती झाली पण ती प्रक्रिया डार्विन यांना वाटत होती तितकी साधी, सरळ आणि सोपी नव्हती, असं मी म्हणतो.

गुल्डच्या या सिद्धांताच्या स्पष्टीकरणामुळे खटला भरणाऱ्या धर्ममार्तंडांच्या तोंडचे पाणी पळाले. यानंतर त्यांनी उत्क्रांतीला प्रायोगिक आधार नाही, असा मुद्दा उपस्थित केला आणि उत्क्रांती शिकवायची तर बुक ऑफ जेनेसिसमधला विश्वनिर्मितीचा सिद्धांतही शिकवला जायला हवा, असा मुद्दा मांडला.

न्यायालयाने हे मुद्दे फेटाळून लावले. तसेच उत्क्रांती ही वैज्ञानिक बाब आहे तर क्रिएशनिझम म्हणजे बायबलप्रणीत विश्वनिर्मिती ही धार्मिक बाब आहे, तेव्हा दोघांना एकाच पारड्यात टाकणे योग्य नाही, असा निकाल दिला. असे असले तरी अजूनही हा वाद मधून मधून डोकं वर काढतोच, पण आता त्याच्याकडे फारसे गांभीर्याने बघितलं जात नाही, हे विशेष!

●●●●●●●

# काय झाडी, काय डोंगर... ओसाड झाले



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सांगोला मतदारसंघात मोठा धक्का बसला आहे. शिवसेनेतील बंडखोरीत एकनाथ शिंदे यांना साथ देणाऱ्या विद्यमान आमदार शहाजी बापू पाटील यांचा पराभव झाला. शेकापचे बाबासाहेब देशमुख यांनी त्यांचा पराभव केला.

माझ्यासोबत आलेल्या ५० आमदारांपैकी एकजरी पडला तर, मी गावाकडे शेती जाऊन शेती करेन, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात सांगितले होते. पण गुवाहाटीला जाणाऱ्या आमदारांपैकी शहाजी बापू पाटील यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे.

सांगोला हा मतदारसंघ पूर्वीपासून शेकापचा बालेकिल्ला होता. गणपतराव देशमुख या मतदारसंघातून ११ वेळा विधानसभेवर निवडून गेले होते. खुद्द शहाजीबापुंनी देशमुखांविरोधात ६ वेळा निवडणूक लढविली होती. पण तेव्हा त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता.

२०१९ ला गणपतराव देशमुख यांचे वय झाल्याने निवडणूक न लढविण्याचा निर्णय घेतला होता. त्यामुळे शहाजीबापू पाटील यांना संधी चालून आली होती.

२०१९ च्या निवडणुकीत शहाजी पाटलांचा विजय झाला होता. यंदाच्या निवडणुकीत बाबासाहेब देशमुख यांनी १ लाख १६ हजार २८० मते घेत शहाजी बापू पाटील यांचा २५ हजार ३८४ मतांनी पराभव केला. बाबासाहेब देशमुख यांनी पुन्हा एकदा सांगोला मतदारसंघ खेचून आणत मतदारसंघात शेकापचेच वर्चस्व असल्याचे सिद्ध केले आहे.

शहाजी बापू पाटील गेल्यावेळी आमदार झाले असले तरी, राज्यात त्यांचे फारसे नाव नव्हते. शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर ही टीम गुवाहाटीला गेली आणि एकाने शहाजी बापू यांना फोन केला. त्यावेळी, काय ती झाडी... काय ते डोंगर... असे वर्णन केलेल्या शहाजी बापूंची ऑडिओ क्लिप व्हायरल झाली आणि ते प्रसिद्धीच्या झोतात आहे. आता शहाजी बापूच्या पराभवानंतर ती झाडी आणि डोंगर ओसाड झाले आहे.

●●●●●●●

# मुंबई कोणाची?

विधानसभा निवडणूक निकालात महायुतीला प्रचंड बहुमत मिळाले. राज्यातील सर्व विभागात महायुतीचे वर्चस्व दिसले. परंतु मुंबई कोणत्या शिवसेनेची? मुंबई कोणत्या पक्षाची याचा निकाल या निकालाने दिला.

मुंबई विभागात विधानसभेच्या एकूण 36 जागा आहे. त्यापैकी काही ठिकाणी शिवसेना (शिंदे) विरुद्ध शिवसेना (ठाकरे) तर काही ठिकाणी भाजप विरुद्ध ठाकरे सेना लढत झाली.

मुंबईतील ३६ जागांपैकी १९ जागांवर भाजपने उमेदवार उभे केले होते. त्यात त्यांचे १५ उमेदवार विजयी झाले. उद्धव ठाकरे यांनी २२ जागा लढवल्या होत्या. त्यात १० जागांवर त्यांचे उमेदवार विजयी झाले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे १४ मधून ६ उमेदवार जिंकले. काँग्रेसला तीन, अजित पवार राष्ट्रवादीला एक आणि समाजवादी पक्षाला एक जागा मिळाली. राज ठाकरे यांच्या मनसेला एकही जागा मिळाली नाही.

कुलाबा-राहूल नार्वेकर
बोरीवली-संजय उपाध्याय
दहीसर- मनिषा चौधरी
कांदिवली-अतुल भातखळकर
मलबार हिल-मंगलप्रभात लोढा
वडाळा-कालीदास कोळंबकर
सायन कोळीवाडा -तमिळ सेल्वन
चारकोप-योगेश सागर
गोरेगांव-विद्या ठाकूर
मुलुंड-मिहिर कोटेचा
घाटकोपर पश्चिम-राम कदम
घाटकोपर पूर्व-पराग शहा
विलेपार्ले-पराग अळवणी
वांद्रे पश्चिम-आशिष शेलार

असे भाजपाचे आमदार निवडून आले आहेत.

गेली कित्येक वर्ष मुंबई महानगर पालिकेवर शिवसेनेचे राज्य आहे. आता शिवसेनेचे दोन तुकडे झाले. त्यातच, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेला राज्यात आणि मुंबईत मोजक्या जागा जिकता आल्या. भाजपाने मुंबईत प्रचंड मुसंडी मारली असून, आता मुंबई भाजपाची असे म्हणता येईल.

●●●●●

# वारंवार बारबेक्यू मटण खात असाल तर सावधान





बारबेक्यू किंवा तळलेले मटण जर तुम्हाला खूप आवडत असेल तर थोडं थांबा. कारण जास्त प्रमाणात बारबेक्यू मटणचे सेवन केल्याने कर्करोगाचा धोका नक्कीच वाढू शकतो असं म्हणतात.

नॉनवेज म्हटलं की मासे, चिकन, अंडी असतातच पण काहींना मटण खायला खूप आवडतं. मांसाहारामध्ये मटण खाणारे खवय्येही खूप आहेत. पण जर तुम्ही अतिप्रमाणात मटण खात असाल तर त्याच्या परिणाम नक्कीच तुमच्या शरिरावर होऊ शकतो आणि तेही थेट कर्करोगाच्या स्वरुपात.

**ग्रील्ड मटण खाणे आरोग्यासाठी नुकसानकारक**

मटणामध्ये ग्रील्ड मटण खाणे आरोग्यासाठी नुकसानकारक मानले जाते. कारण उच्च तापमानात ग्रील केलेल्या मांसाबद्दल तुमचे प्रेम तुम्हाला कर्करोगाकडे ढकलू शकते आणि तुम्हाला कळणारही नाही.

असं म्हटलं जातं की उच्च तापमानात मांस शिजवल्याने अनेक समस्यांना सामना करावा लागू शकतो. त्यामध्येच येत ग्रील्ड मटण खाणे. हे मटण आरोग्यासाठी किती हानिकारक आहे?

तज्ज्ञांच्या मते, उच्च तापमानात मांस शिजवल्याने शरीरात विविध रासायनिक प्रतिक्रिया आणि बदल होतात. त्या रासायनिक प्रक्रियांमुळे शरिरात कर्करोग पसरण्याचा धोका असतो. Maillard रिएक्शन ही अमिनो ॲसिड आणि साखर यांच्यातील रासायनिक प्रतिक्रिया आहे, ज्यामुळे मांसाला रंग आणि चव मिळते. Maillard रिएक्शनसाठी उच्च तापमानात अन्न शिजविणे आवश्यक आहे, जे मांस अधिक स्वादिष्ट बनवते, परंतु याचमुळे कर्करोग होण्याचे प्रमाणही वाढते?

**ग्रील्ड मटण धोकादायक कसे?**

उच्च तापमानात मांस शिजवणे, विशेषतः मोठ्या फ्लेमवर शेकणे किंवा भाजणे, यामुळे HCAs म्हणजे हेटरोसायक्लिक अमाइन आणि PAHs म्हणजे पॉलीसायक्लिक सुगंधी हायड्रोकार्बन्स सारखी रसायने तयार होतात, जी शरिरासाठी अत्यंत हानिकारक असतात. याच रसायनांमुळे मांस शिजत असताना ते रसाळ दिसतात आणि त्यातून धूरही निघू लागतो, ज्यामुळे मांसाचे कार्सिनोजेनिक गुणधर्म वाढू शकतात. त्यामुळे ग्रील्ड मटण धोकादायक मानले गेले आहे.

मांस कमी उष्णतावर शिजवणे आणि शिजवण्यापूर्वी मॅरीनेट करणे कधीही उत्तम. उच्च आचेवर मांस शिजवल्याने कर्करोगाचा धोका वाढू शकतो. मांसाचे तुकडे थायम किंवा रोझमेरीने मॅरीनेट केले पाहिजेत. कारण या औषधी वनस्पतींमध्ये असलेले गुणधर्म उष्णतेच्या संपर्कात असताना मांसातील कार्सिनोजेनिक गुणधर्मांना रोखू शकतात. त्यामुळे कदाचित कर्करोगाचा धोका हा टळू शकतो.

## हिंदू एकतेचा विजय...

**वाचक लिहितात**

बटेंगे तो कटेंगे आणि एक है तो सेफ है या घोषणांचा परिणाम म्हणजे जनतेने जागृत होऊन केलेले मतदान आणि मतदानात वाढलेली टक्केवारी! त्याचाच परिणाम म्हणजे आज राज्यात हिंदुत्वनिष्ठ सरकार स्थापन होत आहे. केवळ निवडणुकीतील स्टंट म्हणून या घोषणांकडे बघता येणार नाही, तर त्यामुळे जिहादरूपी भयानकतेची जाणीव जनतेमध्ये निर्माण झाली आहे.

आज राज्यात वक्फ बोर्ड, लव्ह जिहाद, भूमी जिहाद यांचे संकट आहे. या विरोधात हिंदुत्वनिष्ठ संघटना, आध्यात्मिक संस्था आणि सामाजिक संस्थांनी केलेल्या जागृतीचा परिणाम म्हणजे निवडणुकीत मिळालेला निकाल! हा विजय म्हणजे हिंदूंच्या एकतेचा विजय असे निश्चितच म्हणता येईल.

आता येणाऱ्या सरकारकडून जनतेच्या अपेक्षा वाढल्या आहेत. मंदिरे सरकारीकरणातून मुक्त करून ती भक्तांच्या स्वाधीन करावीत, लव्ह जिहादविरोधात लवकरात लवकर कायदा बनवावा, तसेच धर्मांध प्रवृत्तींना आळा घालावा, अशा अपेक्षा जनतेने व्यक्त केल्या आहेत. निवडणुकीदरम्यान दिलेली एक है तो सेफ है ही घोषणा प्रत्यक्षात सुरक्षित वातावरण निर्माण करून सार्थक करावी.

■ सौ. प्रिया बागडदेव
छिंदवाडा.

## अशोकायन

**सच्चाई छुप नही सकती?**

दोन्ही पक्ष करती
एकमेकांच्या खोड्या
अंगलट आले की
जाहीर सभेतुन म्हणती
जनता शिकवेल यांना धडा ..

इलेक्शन मधुन आता
जनतेने शिकविला धडा
आत्मचिंतन करुन
आता तरी वर्तनात –
बदल कराल का गड्या?

सौ सुनारकी एक लोहारकी
हा असतो जनतेचा मंत्र
जनतेशी प्रामाणिक रहाल तरच
सत्ता मिळेल हेच जनतंत्र ..!



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# एसआयएलएफचा १८वा स्थापना दिवस उत्साहात साजरा



■ महासागर प्रतिनिधी,
नवी दिल्ली, दि. २५ : ससाकावा-इंडिया लेप्रसी फाउंडेशनने (एस-आयएलएफ) नुकताच नवी दिल्ली येथील विश्व युवा केंद्रात वा स्थापना दिवस साजरा केला. कुष्ठरोगामुळे बाधित लोकांना आणि त्यांच्या कुटुंबियांना सक्षम करण्यासाठी, त्यांच्या समावेशाला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच भेदभाव व कलंकाशी लढा देण्यासाठी सुमारे दोन दशकांच्या प्रयत्नांना समर्पित हा कार्यक्रम होता. या कार्यक्रमाला खासदार बैजयंत पांडा आणि डब्ल्यूएचओ कुष्ठरोग निर्मूलनाचे सदिच्छा दूत योहेई ससाकावा हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय सीआयआयचे महासंचालक चंद्रजित बॅनर्जी, एस-आयएलएफचे अध्यक्ष तरुण दास, असोसिएशन ऑफ पीपल अफेक्टेड बाय लेप्रसी (एपीएएल)च्या अध्यक्षा माया रणवरे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना तरुण दास यांनी कलंकमुक्त समाज निर्माण करण्यासाठी सातत्यपूर्ण भागीदारीचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले, गेल्या वर्षांतील आमचा प्रवास लवचिकता आणि सहकार्याचे प्रतीक आहे. व्यक्ती, समुदाय आणि संस्थांच्या पाठिंब्याने जीवनात परिवर्तन आणि उपेक्षितांचे सक्षमीकरण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

कुष्ठरोग निर्मूलनासाठी जागतिक अधिवक्ता योहेई ससाकावा यांनी या उद्दिष्टाचा पुनरुच्चार केला, ते म्हणाले, मला एस-आयएलएफच्या कुष्ठरोग संपवण्याच्या आणि भेदभावाविरुद्ध लढण्याच्या प्रयत्नांमध्ये उभे राहण्याचा अभिमान वाटतो.

# महाराष्ट्राचा कौल विकासालाच.. मसाला किंग डॉ धनंजय दातार

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : महाराष्ट्र विधानसभा २०२४ निवडणुकीत राज्यातील जनतेने महायुतीला हून अधिक जागा देत निर्विवाद बहुमत दिले आहे. हा निकाल महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी हितकारी आणि उत्साहवर्धक ठरेल, असे एक उद्योजक या नात्याने वाटते. कारण कोणत्याही राज्याची आर्थिक-औद्योगिक प्रगती ही शासकीय धोरणांच्या स्थिरतेवर अवलंबून असते आणि धोरणे स्थिर राहण्यासाठी तेथील राजवट मजबूत असावी लागते. अशा शब्दांत अदील ग्रुप ऑफ सुपर स्टोअर्स, दुबई, युएई चे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मसालाकिंग डॉ धनंजय दातार यांनी नव्या सरकारला शुभेच्छा दिल्या. पुढे ते म्हणाले,



केंद्रात व महाराष्ट्रात पुढील पाच वर्षे एकाच आघाडीचे, एकविचाराने चालणारे आणि विकासाभिमुख सरकार काम करणार असल्याने आगामी काळात अस्थिर सरकार, तडजोडीचे सरकार किंवा राष्ट्रपती राजवट अशा आव्हानांचा मुकाबला करावा लागणार नाही

# जंगल कॅम्प्स इंडिया लिमिटडेला बीएसई एसएमई एक्स्चेंजकडून तत्वत मंजुरी

## रु.३० कोटी उभारण्याची योजना

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५: जंगल कॅम्प्स इंडिया लिमिटेड (जेसीआयएल) ने १९ नोव्हेंबर २०२४ रोजी बीएसई एसएमई एक्स्चेंजकडून त्यांच्या आयपीओसाठी तत्त्वतः मंजुरी मिळवली आहे. कंपनीने जुलै २०२४ मध्ये बीएसई एसएमईकडे ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केले होते. आता, अद्ययावत माहितीसह रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (आरएचपी) दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे आणि लवकरच कंपनी या प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध होईल. दिल्ली येथील मुख्यालय असलेल्या कंपनीने या ऑफरद्वारे सुमारे ३० कोटी रुपये उभारण्याचे नियोजन केले आहे. यामध्ये प्रत्येकी १० रुपये दर्शनी मूल्य असलेल्या ४०,८६,४०० इक्विटी शेअर्सचा नवीन समावेश असेल. हे शेअर्स बुक-बिल्डिंग प्रक्रियेद्वारे विक्रीसाठी असतील. खंबट्टा सिक्युरिटीज लिमिटेड हे या इश्यूसाठी एकमेव बुक रनिंग लीड मॅनेजर आहेत. स्कायलाईन फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड हे रजिस्ट्रार आहेत. जेसीआयएल ही एक संवर्धनावर लक्ष केंद्रित करणारी हॉस्पिटॅलिटी कंपनी आहे. मध्यप्रदेशातील पेंच व्याघ्रप्रकल्प, कान्हा व्याघ्रप्रकल्प, पेंच व्याघ्रप्रकल्पातील रुखड बफर झोन, महाराष्ट्रातील ताडोबा व्याघ्रपकल्प आणि मध्य भारतातील घनदाट जंगलांमधील पुरस्कारप्राप्त प्रॉपर्टींच्या माध्यमातून ही कंपनी पर्यटकांना वन्यपर्यटनाचा खास अनुभव प्रदान करते. सध्या कंपनी आणि तिच्या सहयोगी कंपन्यांकडे एकूण ८७ निवास व्यवस्था आहेत. यामध्ये व्हिला, कॉटेज, डिलक्स रूम्स, सफारी तंबू आणि विविध इन्फ्रास्ट्रक्चर सुविधा यांचा समावेश आहे. आयपीओ मधून मिळणाऱ्या एकूण निधीपैकी ७ कोटी रुपये मध्य प्रदेशातील संजय दुबरी राष्ट्रीय उद्यानात नवीन प्रकल्प उभारण्यासाठी वापरण्याचा कंपनीचा मानस आहे. तसेच, ३.५ कोटी रुपये मध्य प्रदेशातील पेंच राष्ट्रीय उद्यानातील पेंच जंगल कॅम्प या विद्यमान रिसॉर्टच्या नूतनीकरणासाठी वापरले जातील. याशिवाय, कंपनी ११.५ कोटी रुपये तिच्या सहयोगी कंपनी मधुवन हॉस्पिटॅलिटी प्रायव्हेट लिमिटेडमध्ये गुंतवणार आहे. हे भांडवल उत्तर प्रदेशातील मथुरा येथे ४-स्टार हॉटेल उभारण्यासाठी वापरण्यात येईल. उर्वरित निधी सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरण्यात येईल. जेसीआयएलने चार अतिरिक्त हॉस्पिटॅलिटी प्रकल्पांसाठी लीजहोल्ड हक्क संपादन केले आहेत. या प्रकल्पांतर्गत १७० निवास व्यवस्थेसह इतर संबंधित पायाभूत सुविधा प्रस्तावित आहेत. हे प्रकल्प सुरू झाल्यानंतर, कंपनीकडे एकूण ७ प्रकल्प असतील. यामध्ये ४ बुटीक वन्यजीव रिसॉर्ट्स, १ हेरिटेज हॉटेल, रेस्टॉरंटसह असलेले १ हायवे मोटेल आणि १ हायवे रेस्टॉरंट यांचा समावेश असेल. जंगल कॅम्प्स इंडिया लिमिटेडची स्थापना २००२ मध्ये श्री. गजेंद्रसिंह राठौर यांच्या संकल्पनेतून झाली. भारतात अतुलनीय हॉस्पिटॅलिटी व वन्यसफरींचा अनुभव देण्याच्या त्यांच्या अखंड प्रयत्नांमुळे या कंपनीची वाढ होण्यास चालना मिळाली. दुर्गम ठिकाणी रिसॉर्ट्स चालविणे ही जंगल कॅम्प्स इंडियाची खासीयत आहे. या माध्यमातून भारतीय उपखंडातील वन्यपर्यटन आणि हॉस्पिटॅलिटीमधील सर्वोत्तम अनुभव देण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे. कंपनीच्या रिसॉर्ट्सना आंतरराष्ट्रीय प्रवास पोर्टल्स आणि राज्य सरकारांकडून अनेक पुरस्कार मिळाले आहेत. यामध्ये मध्यप्रदेश टुरिझमचा सर्वोत्कृष्ट पर्यावरणपूरक हॉटेल (२०१८), ट्रिप ॲडव्हायझर ट्रॅव्हलर्स चॉइस (२०२३) आणि ट्रिप ॲडव्हायझर बेस्ट वाइल्डलाईफ रिसॉर्ट इन इंडिया (२०१९) या पुरस्कारांचा समावेश आहे जंगल कॅम्प्स इंडिया लिमिटेडने आर्थिक वर्ष २०२४ मध्ये १८.१० कोटी रुपयांचे एकूण उत्पन्न नोंदवले आणि ३.५९ कोटी रुपयांचा नफा (करोत्तर नफा) कमावला. आर्थिक वर्ष २०२३ मध्ये कंपनीचे एकूण उत्पन्न ११.२४ कोटी रुपये आणि नफा (करोत्तर) ४५ लाख रुपये होता. कंपनीने उत्पन्नात ६१.०३% वाढ नोंदवली असून, नफ्यात जवळपास आठपट वाढ झाली आहे.

# इकार्टच्या सप्लाय चेन उत्पन्नात गेल्या वर्षांत पटीने वाढ, भारताच्या लॉजिस्टिक्स क्षेत्रात क्रांती

बेंगळुरू नोव्हेंबर : इकार्ट ही भारतातील पीएल सप्लाय चेन कंपन्यांपैकी एक असून आपल्या प्रगत तंत्रज्ञान आणि उत्कृष्ट कार्यक्षमतेसह लॉजिस्टिक्स क्षेत्राला रूपांतरित करत आहे. इकार्टने आपल्या ऑपरेशन्समध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ केली असून, सप्लाय चेनचे मुद्रीकरण करण्याच्या प्रयत्नांमुळे गेल्या तीन वर्षांत पट वाढ झाली आहे. इकार्टच्या लॉजिस्टिक्स क्षमतेचा वापर करून ब्रँड्स आणि किरकोळ विक्रेत्यांना ग्राहकांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी सक्षम केलं आहे. दररोज दशलक्ष शिपमेंट्सची क्षमता असलेल्या इकार्टचे लास्ट माइल डिलिव्हरी नेटवर्क भारतातील टक्के भागापर्यंत पोहोचलं आहे. + दशलक्ष क्यूबिक फूटची गोदामक्षमतेच्या आधारावर




आणि , पेक्षा ट्रकच्या मदतीने हे काम चालतं. या क्षमतांमुळे इ-कॉमर्स ब्रँड्ससाठी दोन दिवसाच्या डिलिव्हरीत % वाढ आणि झोनल कव्हरेजमध्ये % विस्तार साध्य झाला आहे. अलीकडील सणावाराच्या मोसमात, इकार्टने स्नॅपडील, रोपोसो, नापतोल, लिबास, सासफ्रास आणि होम सेंटर यासारख्या मोठ्या ब्रँड्ससाठी प्रमुख लॉजिस्टिक्स भागीदार म्हणून कार्य केले. त्यामुळे मागणी वाढलेली असताना देखील ग्राहकांना आनंददायी अनुभव मिळाला. गेल्या काही वर्षांत, इकार्टने केलेल्या मुद्रीकरणाच्या प्रयत्नांमुळे त्याच्या ग्राहकांमध्ये पटीने वाढ झाली आहे (रिटेल आणि डी सी ब्रँड्स), तसंच त्यांच्या उद्योगामुळे टक्के वार्षिक वाढ होत आहे. इकार्टने ई-कॉमर्सेवांच्या बाहेर पाऊल टाकत वित्तीय संस्थांसाठी व्यापक दस्तऐवज डिलिव्हरी सर्व्हिस सुरू केली आहे. यामध्ये बँका आणि बिगर-बँकिंग संस्थांसाठी सुरक्षित आणि असुरक्षित दस्तऐवजांची डिलिव्हरी केली जाते. या सेवेमुळे केवळ इकार्टच्या क्षमतांचा विस्तार तर होतोच, पण त्याचबरोबर विविध क्षेत्रांमध्ये विश्वसनीय दस्तऐवज वाहतुकीच्या माध्यमातून एकात्मिक आणि मजबूत लॉजिस्टिक्स नेटवर्क तयार होतं. इकार्टचे मुख्य बिझनेस ऑफिसर मणी भूषण म्हणाले,आमची यशोगाथा ही केवळ आकडेवारीपुरती मर्यादित नसून ती ब्रँड्स आणि ग्राहकांसाठी निर्माण होणाऱ्या मूल्यांबद्दल सुद्धा आहे. इकार्टच्या क्षमतांमुळे भारतातील लॉजिस्टिक्स उद्योगाच्या अपार क्षमतेचं प्रतिबिंब दिसतं. या क्षेत्राच्या प्रगतीत हातभार लावण्याचा आम्हाला अभिमान आहे. आम्ही या उद्योगासाठी प्रगत तंत्रज्ञान आणि सप्लाय चेनच्या क्षेत्रात कार्यक्षमेत वाढ आणि मोठ्या प्रमाणात विस्तार यात नवनवीन कल्पनांचा विकास करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत. इकार्टमध्ये, एकूणच सप्लाय चेनचं क्षेत्र समजून घेण्यावर आम्ही भर देतो आणि उत्कृष्टतेचा ध्यास सातत्याने धरतो. ज्या ब्रँड्ससाठी आम्ही काम करतो त्यांच्यासाठी आणि एकूणच भारतातील लॉजिस्टिक्स क्षेत्रासाठी वेगळेपण आणण्यात याच गोष्टींचा वाटा आहे. ज्या ब्रँड्सना सप्लाय चेन क्षेत्रात वेगळी मूल्यं प्रस्थापित करून अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचायचं आहे आणि कार्यक्षमतेमुळे नफा वाढवायचा आहे, एंड-टू-एंड सोल्युशन्स साठी एकाच पार्टनरबरोबर काम करायचं आहे त्यांच्यासाठी इकार्ट हा विश्वासार्ह पर्याय आहे. इकार्टच्या एंड-टू-एंड सेवांमध्ये, लास्ट माइल डिलिव्हरीज, अंशतः ट्रक लोड आणि पूर्ण ट्रक लोड हालचाली, तसेच वस्तूंचे नूतनीकरण यामुळे एकूण भागीदारांपैकी % जणांनी एकाच वेळी एकाहून अधिक उपाय स्वीकारण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे सप्लाय चेनच्या धोरणात सुधारणा झाली आहे.

# कोटक म्युच्यूअल फंडातर्फे कोटक ट्रान्सपोर्टेशन अँड लॉजिस्टिक फंडाचा शुभारंभ

## देशाच्या परिवर्तनाच्या प्रवासात सहभागी होण्याची सुवर्णसंधी

मुंबई, २५ नोव्हेंबर, २०२४: कोटक महिंद्रा सेट मॅनेजमेंट कंपनी लिमिटेड (केएमएएमसी/ कोटक म्युच्युअल फंड) ने कोटक ट्रान्सपोर्टेशन अँड लॉजिस्टिक फंड हा नवीन फंड गुंतवणूकीसाठी आणत असल्याची घोषणा आज केली. हा फंड परिवहन आणि मालवाहतूक ( लॉजिस्टिक) या क्षेत्राशी संबंधित असून तो मुदतमुक्त श्रेणीतील आहे. हा फंड येत्या २५ नोव्हेंबर २०२४ रोजी गुंतवणूकीसाठी खुला होणार असून आणि ९ डिसेंबर २०२४ ला बंद होणार आहे. परिवहन आणि मालवाहतूक क्षेत्र आणि तत्सम कामकाजामध्ये कार्यरत कंपन्यांचे समभाग आणि समभागाशी संबंधित साधनांमध्ये प्रामुख्याने हा फंड गुंतवणूक करणार असून दीर्घकालीन भांडवली वाढ निर्माण करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. वस्तू आणि प्रवाशांची ने-आणकरणाऱ्या वाहतूक आणि मालवाहतूक क्षेत्रातील कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्यावर हा फंड आपले लक्ष केंद्रित करतो. विविध क्षेत्रांत वाहतूक पायाभूत सुविधा, मालवाहतूक सेवा आणि कार्यक्षम आणि शाश्वत वाहतुकीसाठी नाविन्यपूर्ण पर्याय, तसेच वाहतूक आणि मालवाहतूक सेवा यांना समर्थन देणाऱ्या आर्थिक कंपन्या यांचा समावेश आहे. कोटक ट्रान्सपोर्टेशन अँड लॉजिस्टिक फंड गुंतवणूकदारांना भारतातील वाढत्या वाहतूक आणि मालवाहतूक संकल्पनेत गुंतवणूकीची संधी प्रदान करत आहे. भारताच्या वाढत्या आकांक्षा, वाहतूक आणि मालवाहतूक अर्थप्रणालीची अधिकाधिक भरारी आणि या क्षेत्रातील मोठ्या वाढीच्या संधी आदींमुळे या संकल्पनेला गती मिळालेली आहे. हा फंड गुंतवणूकीसाठी तळ ते शिखर या पध्दतीचा अवलंब करणार आहे. लार्ज, मिड आणि स्मॉल-कॅपकंपन्यांतील गुंतवणूकीसह विविध बाजार भांडवलांमध्ये गुंतवणूकीची लवचिकता या फंडात राहणार आहे. वाहतूक आणि मालवाहतूक संकल्पनेतील कंपन्यांत वेगाने वाढ होण्याची क्षमता आहे. या संकल्पनेला या घटकांद्वारे गती दिली जाईल आणि ते आहेत: अ) भारतमाला, सागरमाला, डीएफसी, मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क इत्यादीसारख्या उपक्रमांद्वारे सरकारचे लक्ष ब) डिझेल इंजिनसारख्या तंत्रज्ञानाचे हायब्रीड/ईव्हीत अद्ययावतीकरण क) असंघटितकडून संघटित क्षेत्राकडे वाटचाल ड) भारतातील उत्पादन क्षेत्रात वाढ. केएमएएमसीचे व्यवस्थापकीय संचालक नीलेश शहा म्हणाले, कोटक ट्रान्सपोर्टेशन आणि लॉजिस्टिक फंडचा शुभारंभ करत आम्ही गुंतवणूकदारांना भारताच्या वेगाने बदलणाऱ्या वाहतूक आणि मालवाहतूक संकल्पनेमध्ये सहभागी होण्याची संधी प्रदान करत आहे. वाहनांची वाढती मालकी आणि दरडोई जीडीपी वाढल्याने जीवाश्म इंधनावर आधारित इंजिनकडून इलेक्ट्रिक वाहनांकडे सुरु झालेली वाटचाल आदी कारणे या क्षेत्राच्या वाढीमागे आहेत. भारतमाला आणि गतिशक्तीसारखे प्रमुख सरकारी उपक्रम, कार्यक्षमतेत अधिकाधिक सुधारणा हे घटक मालवाहतूक क्षेत्रातील व्यवसायाच्या संधींचा आणखी विस्तार करतील. भारताच्या विस्तारत चाललेल्या उत्पादन क्षेत्रासह वाहतूक आणि मालवाहतूक उद्योगसुध्दा लक्षणीय विस्तारासाठी सज्ज आहे. केएमएएमसीच्या इक्विटी आणि फंड मॅनेजरच्या मुख्य गुंतवणूक अधिकारी हर्षा उपाध्याय या फंडाबाबत टिप्पणी करताना म्हणाले, उपभोगाची वाढती पातळी, दरडोई जीडीपीत वाढ, ई-कॉमर्समधील वाढ, ऑटो आणि ऑटो-अनुषंगिक व्यवसाय इत्यादीसारख्या अनेक सहाय्यकारी घटकांचा लाभ वाहतूक आणि मालवाहतूक संकल्पनेला लाभत आहे. एक कार्यक्षम मालवाहतूक साखळी तयार करून वाहतुकीशी संबंधित खर्च कमी करण्यावर सरकारने आपले लक्ष केंद्रित केल्याने क्षेत्राच्या वाढीस मदत होईलच, शिवाय नवीन कंपन्यांना प्रवेश करण्यास प्रोत्साहन मिळेल. गेल्या ५ वर्षांत, या विश्वातील सूचीबद्ध कंपन्यांच्या संख्येत ४४% वाढ झाली आहे. द इंडिया स्टोरी अर्थात भारताच्या वाढीची कथा येत्या काही वर्षांत प्रकाशझोतात येत असताना वाहतूक आणि मालवाहतूक सेवांची मागणी लक्षणीय वाढू शकते. फंडाचे व्यवस्थापन नलिन भट्ट यांच्याद्वारे केले जाणार आहे.

## आजचे राशिभविष्य

**मेष :** तुमचे धैर्य आणि शौर्य वाढेल. नोकरीच्या ठिकाणी कोणत्याही जोखमीच्या कामात यश मिळेल. नोकरीत बढतीचे योग येतील. व्यवसायात केलेले बदल फायदेशीर ठरतील.

**वृषभ :** प्रियजनांसोबत देवदर्शनासाठी जाता येईल. अध्यात्मिक कार्यात तुम्हाला रस जाणवेल. कामाच्या ठिकाणी तुमची प्रामाणिक कार्यशैली लोकांना प्रभावित करेल.

**मिथुन :** कोणत्याही जोखमीच्या कामात यश मिळेल. एखाद्या आजाराच्या भीतीने तुमची झोप उडेल. घसा किंवा कानाशी संबंधित समस्यांमुळे अधिक त्रास होईल. आरोग्याची बिघडलेली स्थिती सुधारेल.

**कर्क:** नोकरीत बढतीचे योग येतील. सरकारमधील लोकांना विशेष अधिकार मिळणार आहेत. प्रेम प्रस्ताव मिळाल्याने अपार आनंद मिळेल. अविवाहित लोकांना त्यांच्या चांगली बातमी मिळेल.

**सिंह :** अधूनमधून संघर्षाचे प्रसंग येतील. तुमचा आत्मविश्वास कमी होऊ देऊ नका. परिस्थिती अनुकूल राहील. धमार्दाय कार्यात तुमची आवड वाढेल. महत्त्वाच्या कामात हुशारीने निर्णय घ्या.

**कन्या :** जमिनीशी संबंधित कामात यश मिळेल. आठवड्याच्या मध्यात आईची तब्येत अचानक बिघडल्याने तुम्हाला उदास वाटेल. जिव्हाळ्याच्या साथीने गोडवा वाढेल.

**तुळ :** आठवड्याच्या मध्यात तुमचे विरोधक तुमच्या प्रगतीचा हेवा करतील. जुन्या वादातून आराम मिळेल. कोर्टाच्या कामात यश मिळेल. शत्रू किंवा प्रतिस्पर्ध्याशी परस्पर संवाद होऊ शकतो.

**वृश्चिक :** ग्रहांच्या संक्रमणानुसार आठवड्याच्या सुरुवातीला विशेष लाभ आणि प्रगतीचा काळ नसेल. तुमच्या कामात संयम ठेवा. कोणाचीही दिशाभूल करू नका. तुमची बुद्धी आणि विवेक वापरून विचारपूर्वक निर्णय घ्या.

**धनु :** वैवाहिक जीवनात तुमच्या जोडीदारासोबत परस्पर आनंद आणि सुसंवाद वाढेल. घरी चांगले मित्र येतील. क्रीडा स्पर्धांमध्ये तुम्हाला उच्च यश मिळेल. नोकरीत बढतीचे योग येतील.

**मकर :** तुमच्या प्रिय व्यक्तीकडून चांगली बातमी मिळाल्याने तुम्हाला अधिक आनंद होईल. प्रेमसंबंधातील तणाव दूर होईल. प्रेमविवाहाची योजना आखत असलेल्यांनी कुटुंबात बोलले पाहिजे.

**कुंभ :** काही महत्त्वाच्या कामात यश मिळेल. कर्ज घेण्याचे प्रयत्न यशस्वी होतील. तुमची गुप्त धोरणे विरोधी पक्षासमोर उघड करू नका.

**मीन :** व्यापार क्षेत्रात काम करणा-यांना विस्तारासाठी जास्त मेहनत करावी लागेल. सप्ताहाच्या सुरुवातीला प्रेमसंबंधांमध्ये सकारात्मक परिस्थिती राहील. मनावर नियंत्रण ठेवा.


## आज का अंदाज

मंगळवार २६ नोव्हेंबर २०२४

पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| १४५ | २४५ | ५९० | १३३ | २३८ | २४९ | १७८ | १८० |
| ३८९ | ३८० | ६८० | ३४० | ५८० | ४५६ | ३५८ | ३७९ |
| २९९ | ४७० | ७७० | २७८ | ४९० | ३५७ | २४० | २८९ |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३२ | ५२ | ६१ | ९१ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३४ | ५४ | ६७ | ९७ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३० | ५० | ६८ | ९८ |

२६ नोव्हेंबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६८ | ९८ |
| २३ | ५३ | ६७ | ९७ |
| २० | ५० | ६४ | ९३ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी ६० पानांचा चार्ट मिळेल. १०० टक्के खात्रीशीर. फक्त सोमवारी मिळेल.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# एसयूडी लाइफने पॉलिसीधारकांच्या विकसित भारत आणि न्यू इंडिया लीडर्स फंडचे अनावरण (लाँच) केले

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. २५ : स्टार यूनियन दाई-इची लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड (एसयूडी लाइफ- ) ने आपल्या युनिट लिंक्ड इन्शुरन्स प्लॅन (यूएलआयपी -)योजनेचा एक भाग म्हणून दोन नवीन फंड्स विकसित भारत फंड आणि न्यू इंडिया लीडर्स फंड चे अनावरण (लाँच) केले आहे

विकसित भारत फंड अशा व्यवसायांमध्ये गुंतवणूक करणार आहे, जे आजच्या भारताचे विकसित भारतामध्ये रूपांतर करण्यावर लक्ष केंद्रित करेल. विकसित भारत फंडचे मल्टी-कॅप्र सेक्टर-ॲग्नॉस्टिक पोर्टफोलिओ उदयोन्मुख तसेच स्थिर कंपन्यांमध्ये गुंतवणूक करेल, जे दीर्घकालीन विकास आणि मूल्यनिर्मितीला चालना देईल. हा फंड दीर्घकालीन दृष्टिकोन असलेल्या आणि भारताच्या एकूणच विकासकथेवर विश्वास असलेल्या गुंतवणूकदारांसाठी आदर्श आहे. दुसरीकडे, न्यू इंडिया लीडर्स फंड भारतातील नव्या आणि उदयोन्मुख व्यवसायांमध्ये गुंतवणूक करेल, भारतासाठी आणि संपूर्ण जगासाठी जे तंत्रज्ञान-आधारित नाविन्य आणि विघटनावर लक्ष केंद्रित करतात. या फंडच्या काही महत्त्वाच्या उदयोन्मुख थीम्ससह, डिजिटायझेशन, क्लाउड आणि एआय आधारित व्यवसाय, आरोग्य आणि कल्याण तसेच तंत्रज्ञान-आधारितउत्पादने आणि सेवा यांचा समावेश असेल, इतर. हा फंड दीर्घकालीन दृष्टिकोन असलेल्या आणि वाढीव व्यवसायांसाठी काही प्रमाणात आवड असलेल्या गुंतवणूकदारांसाठी तयार केलेला आहे. सध्या, हे फंड्स एसयूडी लाईफ स्टार ट्युलिप एसयूडी लाईफ वेल्थ क्रियेटर एसयूडी लाईफ वेल्थ बिल्डर ,एसयूडी लाईफ ई- वेल्थ रॉयल या उत्पादनांमध्ये उपलब्ध आहेत. कंपनी भविष्यात आपल्या सर्व युलिप योजनांमध्ये हे फंड्स उपलब्ध करणार आहे.

प्रशांत शर्मा, एसयूडी लाईफ चे मुख्य गुंतवणूक अधिकारी, म्हणाले, आम्ही आमच्या पॉलिसी धारकांसाठी दोन अत्याधुनिक फंड्स विकसित भारत फंड आणि न्यू इंडिया लीडर्स फंड सादर करण्यास खूप उत्साहित आहोत. दोन्ही फंड्स देशात सध्या सुरू असलेल्या परिवर्तनात्मक विकासातून संपत्ती निर्माण करण्याची संधी देतात, परंतु दोन्ही फंड्समधील फरक समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. विकसित भारत फंड पोर्टफोलिओ निर्माण करण्यासाठी एक सेक्टर-आग्नॉस्टिक,मल्टी-कॅप दृष्टिकोन घेईल, ज्याचा उद्देश त्या सर्व व्यवसायांचा फायदा घेणे आहे जे परिवर्तनात्मक बदल घडवत आहेत. दुसरीकडे, न्यू इंडिया लीडर्स फंड हा फंड तंत्रज्ञान आणि आयपी आधारित नाविन्य आणि विघटनातून होणाऱ्या पिढीजात मूल्यनिर्मितीला टिपण्यावर लक्ष केंद्रित करत आहे. आम्हाला विश्वास आहे की, या दोन्ही फंड्स आमच्या पॉलिसीधारकांसाठी भारताच्या रूपांतरामध्ये सहभागी होण्याची आणि त्यासाठीच संपत्ती निर्माण करण्याची अत्यंत मोठी संधी निर्माण करतात.

विकसित भारत फंड ०३९ २८/१०/२४ --१४२) हा एसयूडी लाईफ इन्शुरन्स कंपनीने त्यांच्या युनिट-लिंक्ड जीवन विमा उत्पादने अंतर्गत ऑफर केलेला गुंतवणूक निधी आहे. हा फंड एसयूडी लाईफद्वारे स्वतंत्रपणे व्यवस्थापित केला जातो आणि भारत सरकारच्या कोणत्याही कार्यक्रम किंवा उपक्रमाशी मान्यता दिलेली नाही किंवा संबंधित नाही.

एसयूडी लाईफ स्टार ट्यूलिप १४२०९१०१), एसयूडी लाईफ वेल्थ बिल्डर (: १४२०४२०३), एसयूडी लाईफ ई-वेल्थरोयाल (: १४२०८२०३) आणि एसयूडी लाईफ वेल्थ क्रिएटर १४२०७७०१).

युनिट लिंक्ड जीवन विमा उत्पादने पारंपरिक विमा उत्पादनांपेक्षा वेगळी असतात आणि जोखीम घटकांवर अवलंबून असतात. युनिट लिंक्ड जीवन विमा पॉलिसीमध्ये भरलेले प्रीमियम भांडवली बाजाराशी संबंधित गुंतवणुकीच्या जोखमींवर अवलंबून असतात. फंडाच्या कामगिरीवर आणि भांडवली बाजाराला प्रभावित करणाऱ्या घटकांवर आधारित युनिट्सच्या एनएव्ही वाढू किंवा घटू शकतात. या जोखमीसाठी विमाधारक स्वतः जबाबदार असतो. तुमच्या निर्णयांसाठी तुम्ही स्वतः जबाबदार असाल. कृपया संबंधित जोखीम आणि लागू शुल्कांची माहिती तुमच्या विमा प्रतिनिधीकडून, मध्यस्थामार्फत किंवा विमा कंपनीने जारी केलेल्या पॉलिसी दस्तऐवजातून मिळवा. या उत्पादनांतर्गत ऑफर केलेले विविध फंड हे फक्त फंडांची नावे आहेत आणि त्यांच्या गुणवत्तेचा, संभाव्यतेचा किंवा परताव्याचा काहीही दाखला देत नाहीत. फंडांची मागील कामगिरी ही पॉलिसीअंतर्गत उपलब्ध कोणत्याही फंडाच्या भविष्यातील कामगिरीचा सूचक असणार नाही. या पॉलिसीमध्ये कोणताही हमीदार किंवा निश्चित परतावा दिला.

जात नाही, वगळता बंद केलेल्या पॉलिसी फंडांतर्गत जिथे -वेळोवेळी निर्देशित करेल तसा किमान हमी व्याज दिले जाईल.

# जागृती एक नयी सुबहबद्दल आर्य बब्बरचे भाष्य ह्या मालिकेचा हिस्सा असल्याचा मला अभिमान आहे

■ महासागर प्रतिनिधी,
मुंबई, दि. २५ : आजच्या जगात शिक्षण हा विशेषाधिकार नसून एक मुलभूत हक्क आहे आणि सामाजिक किंवा आर्थिक पार्श्वभूमी काहीही असली तरी तो सर्वांना मिळायलाच हवा. दुर्दैवाने आजही अनेक वंचित समुदायांना प्रणालीगत अडथळ्यांना सामोरे जावे लागते आणि त्यामुळे त्यांना दर्जेदार शिक्षण मिळू शकत नाही. असेच एक उदाहरण आहे जागृतीएक नयी सुबहमधील आपल्या जागृतीचे अस्मी देव, जिला काहीही करून हा अडथळा पार करायचाच आहे. समाजातर्फे गुन्हेगाराचा ठप्पा लावलेल्या समुदायातून असलेल्या जागृतीचा संघर्ष हा केवळ तिच्या स्वतःच्या शिक्षणासाठीचा नसून तिच्या चित्ता समुदायातील प्रत्येक सदस्याच्या हक्कासाठीचा आहे.

ह्या मालिकेत आर्य बब्बर कलिकांत ठाकूरची खलनायकी भूमिका साकारत आहे, कलिकांत आपल्या शक्तीचा पूर्ण वापर करत मुद्दाम जागृतीला



शिक्षणाचा हक्क मिळू देत नाहीये. वास्तविक आयुष्यात तो ह्या संकल्पनेमुळे आणि ज्यापद्धतीने ही मालिका हा शक्तीशाली संदेश प्रदान करत आहे त्यामुळे अतिशय प्रभावित आहे.

आर्य बब्बर म्हणाला, जागृतीएक नयी सुबहमध्ये कलिकांत साकारणे हा माझ्यासाठी एक गहन अनुभव ठरला आहे, कारण ही कथा अशा समुदायाबद्दल आहे ज्यांना जन्मतःच गुन्हेगार ठरवले जाते आणि मुलभूत हक्कांपासून वंचित ठेवले जाते. मी ह्या मालिकेत खलनायकी भूमिका साकारत असलो तरी ह्या मालिकेचा संदेश मला आपलासा वाटतो. ही कथा ह्या वंचित समाजाच्या संघर्षावर प्रकाश टाकते आणि ह्या मालिकेचा हिस्सा बनल्याचा मला अभिमान आहे. जागृतीचा प्रवास प्रेरणादायी आहे आणि मला आशा आहे की त्यामुळे बदलाबद्दल संवाद घडून येईल.

ह्या चळवळीचा हिस्सा बनण्यासाठी आर्य आभारी आहे, प्रेक्षकांसाठी हे पाहणे रोचक ठरेल की काय होईल जेव्हा गीताला तितिक्षा श्रीवास्तव कळेल की जागृती ही तिची मुलगी आहे. त्यांच्यात मतभेद असले तरी काय ती तिला स्वीकारू शकेल? अधिक जाणून घेण्यासाठी पहा जागृतीएक नयी सुबह दररोज रात्री ८.३० वाजता फक्त झी टीव्हीवर

# अमरावतीचा क्रिकेटपटू जितेश शर्माला ११ कोटी

## आरसीबीने लिलावात केले खरेदी



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २५ :
अमरावतीचा धडाकेबाज यष्टिरक्षक फलंदाज जितेश शर्माला २०२५ मध्ये होणाऱ्या आयपीएल क्रिकेट मोसमासाठी रविवारी झालेल्या लिलावात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने (आरसीबी) ११ कोटी रुपयांमध्ये खरेदी केले. त्यामुळे अमरावतीच्या क्रिकेट वर्तुळात आनंदाची लाट पसरली असून, यामुळे इतर उदयोन्मुख क्रिकेटपटूंना प्रोत्साहन मिळाल्याशिवाय राहणार नाही.

जितेश शर्मा आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताला सुवर्णपदक जिंकून देणाऱ्या संघात होता. त्याचप्रमाणे त्याने भारताकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटसह घरगुती क्रिकेटमध्येही आक्रमक फटकेबाजी केली आहे. सोबतच यष्टिरक्षक म्हणूनही त्याची कामगिरी ही देखणी राहिली आहे. त्याने घेतलेले झेल हे उत्तम ठरले आहेत. याआधी तीन आयपीएल मोसमांमध्ये पंजाब किंगने त्याला लाख रुपयांमध्ये खरेदी केले होते. परंतु, त्याची आंतरराष्ट्रीय तसेच राष्ट्रीय क्रिकेटमधील उत्तम कामगिरी बघता त्याला अचानक कोटी रुपये भाव मिळाला आहे. याआधी अन्य कोणत्याही अमरावतीकर क्रिकेटपटूला अशाप्रकारे आयपीएलमध्ये भाव मिळाला नव्हता, हे विशेष.

एचव्हीपीएम क्रिकेट स्टेडियमवर घडलेल्या जितेशने मागील तीन ते चार वर्षांमध्ये उत्तम फलंदाजी व क्षेत्ररक्षणामुळे सतत भारतीय क्रिकेट संघाची दारे ठोठावली असून, आयपीएलमध्येही त्याने दमदार कामगिरी केली आहे. वेगवान फलंदाजी हे त्याचे वैशिष्ट्य असल्याचे मत त्याचे प्रशिक्षक डॉ. दीनानाथ नवाथे यांनी व्यक्त केले. जितेशला मिळालेल्या यशाबद्दल एचव्हीपीएमचे प्रधान सचिव प्रभाकरराव वैद्य, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव डॉ. माधुरी चेंडके व सर्वच पदाधिकाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले आहे.

जिल्ह्यात आणखी उत्तम खेळाडू घडतील आरसीबीने जितेश शर्माला ११ कोटीत खरेदी करणे हा अमरावतीसाठी गौरवाचा क्षण आहे. यामुळे जिल्ह्यात आणखी उत्तम खेळाडू घडतील. मी त्याचे अभिनंदन करतो. जितेशने अमरावती जिल्हा हौशी क्रिकेट संघटनेचा मान वाढवला आहे. -ॲड. प्रशांत देशपांडे, कार्यकारी अध्यक्ष, अमरावती जिल्हा



# सुलभाताई खोडके यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून सत्कार

■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २५ :
नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत अमरावतीतून विजयी झालेल्या आमदार सुलभाताई खोडके यांचे मुंबईत पोहोचल्यानंतर राष्ट्रवादी भवनात जोरदार स्वागत करण्यात आले. राकाँतर्फे विजयी झालेल्या त्या विदर्भातील एकमेव महिला आमदार आहेत. २०२४ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडून विजयी झालेल्या ४१ आमदारांची बैठक आज, रविवार, २४ नोव्हेंबर रोजी मुंबई स्थित पक्षाच्या कार्यालयात पार पडली. या बैठकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मावळते उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची विधीमंडळ गटनेतापदी एकमताने निवड करण्यात आली. या बैठकीला इतर आमदारांसमवेत सुलभाताई खोडकेदेखील उपस्थित होत्या. त्यांचे यावेळी जोरदार स्वागत करण्यात आले. यावेळी प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, राष्ट्रीय कार्याध्यक्ष खासदार प्रफुल्लभाई पटेल, जेष्ठ नेते छगनराव भुजबळ, विधानसभेचे माजी अध्यक्ष दिलीप वळसे पाटील, मावळते कृषी मंत्री धनंजय मुंडे, हसन मुश्रीफ, संजय खोडके आदींसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची वरिष्ठ नेते मंडळी व महाराष्ट्रातून विजयी झालेले सर्व आमदार उपस्थित होते. महायुतीसोबत निवडणूक लढविताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वाट्याला ५५ जागा आल्या होत्या. त्यापैकी पक्षाने ४१ जागांवर विजय मिळविला आहे. अमरावती विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सुलभाताई खोडके यांना ६००८७ मते मिळाली. या विजयासह त्या तिसऱ्यांदा विधानसभेत पोहोचल्या आहेत. विदर्भात राकॉतर्फे विजयी झालेल्या त्या एकमेव महिला आमदार आहेत.

# जीएमसी पाठोपाठ आता मराठी विद्यापीठाचाही प्रारंभ



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २५ :
महानुभाव पंथीयांची काशी असलेल्या रिद्धपुर (ता. मोर्शी) येथे यावर्षीपासून एम. ए. (अभिजात मराठी) हा विषय सुरु केला जाणार आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयानंतर (जीएमसी) अमरावती जिल्ह्यात यावर्षी सुरु होणारे हे दुसरे महाविद्यालय असेल. त्यासाठी आगामी नोव्हेंबरपर्यंत प्रवेश प्रक्रिया राबविली जाणार आहे. गेल्या महिन्यात प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे यावर्षीपासून अमरावतीच्या जिल्हा स्त्री रुग्णालयाच्या परिसरात जीएमसी सुरु झाले. त्यानंतर आता विद्यापीठाच्या अभिजात भाषा व मराठी वाड्मय विभागातर्फे हा अभ्यासक्रम सुरु केला जात आहे. चार सत्रात पूर्णत्वास जाणारा हा अभ्यासक्रम दोन वर्षे कालावधीचा आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार असल्याचे विद्यापीठ प्रशासनाने कळविले आहे. कुलगुरु डॉ. अविनाश आवलगावकर व कुलसचिव डॉ. केशव तुपे यांनी त्यासाठी योग्य ती आखणी केली आहे. महानुभाव पंथीयांची काशी असलेल्या रिद्धपुर येथे मराठीचा आद्य ग्रंथ लीळाचरित्र लिहला गेला होता. त्यासाठी खुद्द चक्रधर स्वामी त्याठिकाणी काही काळ वास्तव्यास होते, अशी इतिहासात नोंद आहे, किंबहूना त्यामुळेच देशातील पहिल्या मराठी विद्यापीठाची स्थापना रिद्धपुरात करण्यात आली आहे. या स्थापनेमुळे रिद्धपुरच्या ऐतिहासिक महत्वामध्ये भर पडली असून मुंबई-नरखेडमार्गावर असलेल्या या ठिकाणी रेल्वे विभागानेही स्वतंत्र थांबा दिला आहे. त्यासाठी महानुभाव पंथाचे कंवरनगर येथील पिठाधीश्वर मोहन महाराज अमृते (कारंजेकर), रिद्धपुर येथील राजेगुरु वाइंदेशकर आदींनी विशेष प्रयत्न केले.

# नवरगावात तरुणीने घेतला गळफास



■ महासागर प्रतिनिधी,
मारेगाव, दि. २५ :
तालुक्यातील नवरगाव येथील २१ वर्षीय तरुणीने घरीच गळफास घेत आत्महत्या केली. ही दुर्देवी घटना मारेगाव तालुक्यात नवरगाव (धरण) येथे शनिवारी सायंकाळी उघडकीस आली. खुशबू सुभाष मोहुर्ले असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे.

खुशबूच्या वडिलांचा १० वर्षांपूर्वी मृत्यू झाला. आई काबाडकष्ट करून जीवन जगत आहे. आई सकाळी कापूस वेचणीसाठी गेली होती. सायंकाळी घरी परतली असता मुलगी गळफास घेतलेल्या अवस्थेत दिसताच आईने हंबरडा फोडला. शेजाऱ्यांनी धाव घेवून मुलीला रुग्णालयात हलवले. परंतु, डॉक्टरांनी तिला तपासून मृत घोषित केले. मुलगी व आई दोघीच घरी राहायच्या. आई मजुरीला आणि खुशी वणी येथील अकॅडमी प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षणार्थी होती. तिला दोन बहीणी विवाहित आणि वडिलांचे निधन झालेले आहे. आज खुशी प्रशिक्षणाला गेली नाही.

# मंत्रिपदासाठी आमदारांची लॉबिंग

## राठोड पाचव्यांदा, तर उईके तिसऱ्यांदा विधानसभेत

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २५ :
विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील भाजपच्या तीन, शिवसेना शिंदे गटाची एक आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची एक अशा पाच जागा कायम ठेवण्यात महायुतीच्या नेत्यांना यश आले. आता राज्यात सत्ता स्थापन करण्यासाठी महायुतीच्या हालचाली आहेत. त्यात मंत्रिपदासाठी इच्छूक जिल्ह्यातील महायुतीच्या आमदारांनी आपल्या गॉडफादरकडे निकाल लागताच लॉबिंग सुरू केली आहे. हे सर्व आमदार निकाल जाहीर होताच मुंबईला रवाना झाले आहेत. जिल्ह्यातील यवतमाळ, राळेगाव, वणी, आर्णी, पुसद, दिग्रस आणि उमरखेड या सात विधानसभा मतदारसंघात विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक झाली. भाजप, शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी अजित पवार गट महायुती म्हणून एकत्र लढले. त्यात यापूर्वी भाजपचे आमदार असलेले राळेगाव, आर्णी आणि उमरखेड हे विधानसभा मतदारसंघ भाजपने अबाधित राखत या विधानसभा मतदारसंघावर ताबा मिळवला. मात्र, यवतमाळ व वणी येथे भाजप उमेदवारांचा पराभव झाला. याचप्रमाणे पूर्वीपासून शिवसेनेचा गढ असलेला दिग्रस मतदारसंघ शिवसेनेने कायम राखला. पुसद विधानसभा मतदारसंघ नाईक घराण्याने आपला बालेकिल्ला शाबूत राखला. जिल्ह्यातील सातपैकी पाच मतदारसंघात विजय संपादन करुन युतीच्या आकड्यांमध्ये भर घालण्याचे काम जिल्ह्यातील महायुतीच्या नेत्यांनी केले. त्यामुळे सत्तास्थापनेनंतर यवतमाळ जिल्ह्यातून मंत्रिपदासाठी अनेकांची वर्णी लागेल असे भाकीत करण्यात येत आहे. गत महाविकास आघाडीच्या सरकारमध्ये संजय राठोड यांची मंत्रिपदी वर्णी लागली होती. त्यानंतर महायुतीच्या सरकारमध्येही संजय राठोड यांना मंत्रिपद मिळाले. मात्र, पाच वर्षांत भाजपच्या एकाही आमदाराला मंत्रिपद मिळाले नाही. अशा स्थितीत गेल्या काही पंचवार्षिकमध्ये जिल्ह्यात मंत्रिपदी वर्णी लागलेले भाजपचे अशोक उईके, तर शिवसेना शिंदे गटाचे संजय राठोड यांना मात्र मंत्रिपदासाठी हुरहुर लागली आहे. राळेगावचे आमदार डॉ. अशोक उईके यांची उर्वरित, पान वर नवख्या आमदारांचा लागणार कस जिल्ह्यातील यवतमाळ विधानसभा मतदारसंघात बाळासाहेब मांगुळकर, वणी विधानसभा मतदारसंघात संजय देरकर, उमरखेडमध्ये किसनराव वानखेडे यांना पहिल्यांदा आमदार म्हणून संधी मिळाली आहे. आता लवकरच हिवाळी अधिवेशनाला सुरवात होणार आहे. यामध्ये विविध मंडळांच्या कामकाजासंदर्भातील माहिती व मतदारसंघातील प्रश्न सोडवण्यासाठी त्यांचा कस लागणार आहे.

कार्यकर्त्यांमध्ये उत्साह यवतमाळ विधानसभेत दहा वर्षानंतर काँग्रेसचे आमदार निवडून आले आहे. तसेच वणी येथे दहा वर्षानंतर उबाठा गटाचे उमेदवार निवडून आले.

# रब्बी हंगामात शेतकऱ्यांच्या ८० टक्के पेरण्या आटोपल्या

## शेतकऱ्यांना दिलासा



■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २५ :
यावर्षीच्या रब्बी हंगामासाठी सव्वा दोन लाख व हेक्टरचे नियोजन करण्यात आले आहे. प्रत्यक्षात नोव्हेंबर मध्यापर्यंत ८० हजार हेक्टरवरील पेरणी पूर्ण झाली आहे. यात हरभऱ्याचे पेरणी क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढले आहे. त्या पाठोपाठ गहू पिकाचीही पेरणी अधिक झालेली आहे. मक्याची पेरणीही झालेली आहे.


सोयाबीनच्या काढणीनंतर रब्बी हंगामातील पेरणी केली जाते. सोयाबीनच्या एकूण क्षेत्रापैकी सव्वा दोन लाख हेक्टर क्षेत्रामध्ये रब्बीची पेरणी करण्यात येणार आहे. त्यादृष्टीने कृषी विभागाने संपूर्ण नियोजन तयार केले आहे. सिंचनाची सुविधा असणारे शेतकरी रब्बीची पेरणी करण्यासाठी पुढे आले आहेत. त्यांनी रब्बी हंगामातील पेरणीसाठी रान तयार करण्याची प्रक्रिया सुरू केली. मात्र, भारनियमनामुळे अनेक शेतकऱ्यांना सिंचनासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यातूनच सिंचन खोळंबले आहे. जिल्ह्यात आतापर्यंत ८६ हजार हेक्टरवर हरभऱ्याची पेरणी झाली आहे. तर ७२०० हेक्टरवर गव्हाची पेरणी झाली आहे. २७६ हेक्टरवर ज्वारीची पेरणी झाली. तर हेक्टरवर शेतकऱ्यांकडून मका पिकाची पेरणी करण्यात आली आहे.

जल प्रकल्पामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. सततच्या पावसाने जिल्ह्यातील जलाशय तुडुंब भरलेले आहेत. यातून सिंचन क्षेत्रात वाढ होणार आहे. अनेक कॅनॉलचे पाणी १५ नोव्हेंबरनंतर सुटणार आहे. यामुळे डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत संपूर्ण पेरणीचे चित्र स्पष्ट होणार आहे.



ताडोबातील झीनत सिमिलीपालच्या जंगलात पोहोचली

# आठ महिन्यांच्या वाघाचा मृतदेह आढळल्याने खळबळ



**चंद्रपूर :** मध्यचांदा वनविभागाचे चिवंडा वनपरिक्षेत्रात कक्ष क्र.१३८ मध्ये वाघाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली आहे. मृत वाघ मादी असून तिचे वय सात ते आठ महिने असल्याचा अंदाज वनविभागाने वर्तविला आहे. वाघिणीच्या शरीरावर ओरखडल्याचे निशाण आढळले आहेत. मृतक वाघिणीचे सर्व अवयव शाबूत आहेत. प्रौढ नर वाघाचे लढाईत या सात ते आठ महिन्यांच्या मादीला मारल्याचा अंदाज वनविभागाने वर्तविला आहे.

पुढील तपास उपवनसंरक्षक मध्य चांदा वनविभाग श्वेता बोड्डू, सहाय्यक वनसंरक्षक शेंडगे यांचा मार्गदर्शनात वनपरीक्षेत्र अधिकारी एस. व्ही. मुरकुटे करीत आहे.

शव विच्छेदन अहवाल प्राप्त झाल्यानंतर मृत्यूचे खरे कारण पुढे येणार आहे.



# किमान तापमानाचा पारा १६ अंशावर

■ महासागर प्रतिनिधी,
यवतमाळ, दि. २५ :

दिवसा चटका, तर सायंकाळी थंडी; रब्बी हंगामात शेतीसाठी वातावरण लाभदायक ठरणार

यंदा सरासरीपेक्षा पर्जन्यमान जास्त झाल्याने हिवाळ्यात कडाक्याची थंडी जाणवणार, असे जाणवत होते. त्यानुसार नोव्हेंबरच्या उत्तरार्धापासून वातावरणातील गारवा वाढण्यास सुरवात झाली आहे. सध्या किमान अंश सेल्सिअस तापमानाची नोंद केली आहे. जिल्ह्यात किमान तापमानाचा पारा घसरला असून रविवारी नोव्हेंबर रोजी किमान तापमान अंश सेल्सिअसवर आले. थंडीचा जोर चांगलाच वाढल्याने वातावरणात गारठा निर्माण झाला आहे. यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाल्यामुळे मुबलक प्रमाणात पाणीसाठा आहे. त्यामुळे थंडीदेखील जोरदार येणार असल्याचे संकेत आधीच मिळाले होते. दिवाळीपासून थंडीची चाहूल लागली. आता वातावरण चांगलेच थंड होत आहे. दिवसा वातावरणातील गारवा कमी असला तरी रात्री तो वाढतो. त्यामुळे शहरातील नागरिक उबदार कपड्यांचा आधार घेत आहे. शेतातील ओलावा, झाडे आदींमुळे शहरापेक्षा ग्रामीण भागात गारवा जास्त जाणवत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिक शेकोट्यांचा आधार घेताना दिसून येत आहे. वाढत्या थंडीमुळे शेतकऱ्यांतून समाधान व्यक्त होत आहे. यंदा सरासरीपेक्षा जास्त झालेले पर्जन्यमान व अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांना खरिपात शेतीपिकांचे मोठे नुकसान सोसावे लागले. मात्र, खरिपातील नुकसान रब्बी हंगामात भरुन काढण्याकडे शेतकऱ्यांचा कल आहे. वातावरणातील वाढता गारवा हा रब्बी पिकांना पोषक असतो. त्यानुसार, शेतकरी जोमाने कामाला लागला असून हरभरा, गहू आदी पिके घेण्यात शेतकरी व्यस्त आहे. स्वेटर घालून मॉर्निंग वॉक थंडीचे आगमन होताच व्यायाम, मॉर्निंग वॉक करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होऊ लागली आहे. आरोग्यासाठी उपयुक्त असलेला हिवाळा कॅच करण्यासाठी बालकांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वांनीच सकाळी मॉर्निंग वॉक करण्यावर भर दिला आहे.

# अलीम पटेल यांना ५४ हजार मते



■ महासागर प्रतिनिधी,
अमरावती, दि. २५ :
मतदारसंघातील उत्कंठावर्धक ठरलेल्या लढतीत आझाद समाज पार्टीचे डॉ. अलीम पटेल यांनी मिळवलेल्या ५४ हजार ५९१ म्हणजे एकूण मतदानाच्या २५.३६ टक्के मतांची चर्चा रंगली आहे.

तब्बल दहा फेऱ्यांमध्ये मताधिक्य टिकवून ठेवत राष्ट्रवादी काँग्रेसच्या समर्थकांची धडधड वाढविणाऱ्या अलीम पटेल यांना शहरातील मुस्लीमबहुल भागातून मिळालेले मतांचे भरभरून दान हे ५४ हजार ५९१ मतांपर्यंत पोहचेल, याचा अंदाज कुणाला आला नव्हता. राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुलभा खोडके या ५ हजार ४१३ मतांनी निवडून आल्या, त्यांना २५.३६ टक्के मते मिळाली. त्यांचे निकटचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे उमेदवार डॉ. सुनील देशमुख यांना २५.४ टक्के मते मिळाली. अलीम पटेल यांना २५.३६ टक्के मतांचा वाटा मिळाला. तर भाजपचे बंडखोर उमेदवार जगदीश गुप्ता यांना १५.८३टक्के मते प्राप्त झाली.

लोकसभा निवडणुकीत काँग्रेसचे खासदार बळवंत वानखडे यांना अमरावती विधानसभा मतदारसंघातून सर्वाधिक हजार इतके मताधिक्य मिळाले होते. काँग्रेसने हे मताधिक्य गृहित धरून यावेळी विजयाची अपेक्षा केली होती. पण, लोकसभेच्या विजयानंतर लगेच मुस्लीमबहुल भागात अबकी बार, मुस्लीम आमदार हा नारा ऐकायला आला. लोकसभेत मुस्लीम मतांच्या बळावर खासदार निवडून येऊ शकतो, मग मुस्लीम आमदार का होऊ शकत नाही, याची चर्चा सुरू झाली. यावेळी निवडणूक रिंगणात अलीम पटेल यांच्यासह प्रहारचे डॉ. अबरार, मुस्लीम लिगचे इरफान खान यांच्यासह एकूण सात उमेदवार होते. डॉ. अबरार यांनी प्रचार सुरू होताच माघार घेत डॉ. सुनील देशमुख यांना पाठिंबा जाहीर केला. त्यामुळे डॉ. देशमुख यंची बाजू बळकट झाल्याचा दावा देशमुख समर्थकांकडून केला जात असताना पडद्यामागे अनेक घडामोडी सुरू होत्या.

यावेळी काँग्रेसची भिस्त ही मुस्लीम समुदायाच्या मतदानावर होती. ही एकगठ्ठा मते आपल्याला मिळतील, अशी अपेक्षा काँग्रेसचे नेते बाळगून होते. पण, एकीचे बळ दाखवून देण्याचा संदेश मुस्लीमबहुल भागात पसरला आणि डॉ. देशमुख यांच्या हातून बाजी निसटत गेली. राष्ट्रवादीचे संजय खोडके यांची व्यूहनीती मात्र यशस्वी ठरली.

# निकालाच्या एक दिवसाआधी राजकीय संन्यास



■ महासागर प्रतिनिधी,
वर्धा, दि. २५ : आर्वीतील भाजपच्या राजकारणाचा सावळा गोंधळ संपण्याचे नाव घेत नाही. दादाराव केचे हे यातील घडामोडींच्या केंद्रस्थानी राहिले. त्यांनी बंडखोरीचा अर्ज दाखल केला, तो नंतर परत घेतला, पुढे फडणवीस यांच्या सभेत हजेरी, विरोधात काम केल्याचा ठपका, त्याने नाराज होत मग राजकीय संन्यास घेण्याचा निर्णय घेतला व आज पुन्हा भूमिका बदलली.

कार्यकर्त्यांनी सभा बोलावली म्हणून येथे हजर झालो, असे स्पष्ट करीत दादाराव केचे या सभेत म्हणाले की, कार्यकर्त्यांच्या आग्रहास्तव मी राजकीय संन्यास घेण्याचा निर्णय मागे घेत आहे. मतदान झाल्यावर मी पक्षाचे उमेदवार सुमित वानखेडे यांच्या विरोधात काम केल्याचा आरोप करण्यात आला. काही दारू, मटणपार्टी झोडणाऱ्या लोकांचे हे कारस्थान होते. तसा खोटा प्रचार करण्यात आला. बदनामी केली. त्याने मी उद्विग्न झालो. त्याच निराशेत मी पत्रकार परिषदेत संन्यास घेत असल्याची घोषणा केली. पण पुढील दिवसात मला असंख्य कार्यकर्ते, हितचिंतक, पक्षनिष्ठ यांचे फोन आले. तुम्ही संन्यास घेणार तर आमचे कसे होणार, असा सवाल हे कार्यकर्ते विचारू लागले. मी विचारात पडलो. त्याच लोकांनी आज मला न विचारता ही सभा घेतली. पण या ठिकाणी सांगतो की, पक्षाच्या नेत्यांचे, सुमित वानखेडे यांचे मन कलुषित करणारे काही आहेत. दारू, मटण यापलीकडे त्यांना काही दिसत नाही. अशा लोकांना सुमित वानखेडे यांनी दूर करावे. त्यांनीच घात केला आहे. अमित शहा, चंद्रशेखर बावनकुळे, देवेंद्र फडणवीस यांनी मला जो शब्द दिला आहे तो ते पाळतीलच. या भागात मी पक्ष उभा केला आहे. सहा महिन्यांत पक्ष उभा होत नाही. त्याच पक्षासाठी मी राजकीय संन्यास घेण्याचा निर्णय मागे घेत आहे, अशी घोषणा केचे यांनी केली.

या सभेत त्यांचे शेकडो समर्थक उपस्थित होते. त्यांनी आपल्या भाषणातून केचे यांनी राजीनामा परत घ्यावा म्हणून आग्रह धरला. केचे यांनी आपल्या भाषणातून फडणवीस व बावनकुळे यांनी मलाच तिकीट देणार अशी हमी दिली होती, असे आवर्जुन नमूद केले. पण इथल्या काही लोकांनी त्यांना भेटून माझी बदनामी केली. माझ्याविषयी मन कलुषित केल्याचे केचे म्हणाले. पण नेत्यांच्या आग्रहास्तव मी अर्ज परत घेतला. वानखेडे यांच्या प्रचारात झोकून दिले. पण काही लोकांनी मी विरोधात काम केल्याचा अपप्रचार केला. केचेंच्या समर्थनार्थ माजी जि. प. सदस्य नीता गजाम, कारंजा येथील गौरीशंकर अग्रवाल, राजू राठी, विनय डोळे व अन्य ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

RNINo-20789/71 महासागर नागपूर मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# महासागर वृत्तसागर
नागपूर

■ मंगळवार, दि. २६ नोव्हेंबर २०२४ ■


## रुग्णालयातून १.७० लाखांचा माल चोरी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :
अज्ञात आरोपीने रुग्णालयाच्या दुसऱ्या माळ्यावर सुरू असलेल्या बांधकाम स्थळावरील 1 लाख 69 हजार 979 रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना धंतोलीच्या काँग्रेसनगर परिसरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी बांधकामावरील मजूर दिगंबर खाटिक (31) च्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

काँग्रेसनगर परिसरात डॉ. शिल्पी सूद यांच्या सफल रुग्णालयाचे बांधकाम सुरू आहे. त्यासाठी दुसऱ्या माळ्यावरील एका खोलीमध्ये इलेक्ट्रिक आणि हार्डवेअरचे साहित्य ठेवले होते.

शनिवारी पहाटे 4.30 वाजताच्या सुमारास दोन आरोपींनी खोलीच्या दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. तेथे ठेवलेले 1,69,979 रुपयांचा माल चोरी करून पसार झाले. सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर पोलिसात तक्रार करण्यात आली. सीसीटीव्ही फुटेज तपासली असता दोन आरोपी दिसले. पोलिसांनी अज्ञात आरोपींवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

नागपूर शहराच्या विविध भागात चोरी आणि घरफोडीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे .विधानसभा निवडणूक काळात पोलीस यंत्रणा प्रचारात व्यस्त असताना चोरट्यांचे चांगलेच फावले . आता लग्नसराईचा हंगाम सुरू झाला असून, बंद असलेल्या घरांची रेकी करून चोरटे अशा घरात चोरी करीत असल्याचे दिसून येते.

## गुणवत्ता आणि उत्पादकतेशी तडजोड नको

### केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचा शेतकऱ्यांना सल्ला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
संत्रा उत्पादन वाढविण्यासाठी शेतकऱ्यांनी यशस्वी शेतकऱ्यांकडून योग्य मार्गदर्शन घ्यावे आणि आपल्या उत्पादनात वाढ करावी. येणाऱ्या काळात आपल्या संत्र्याचे उत्पादन वाढवायचे आहे.

याकरिता आवश्यक गोष्टींचा अभ्यास करून जसे माती परीक्षण, खते याबाबत माहिती घ्यावी. ज्यामुळे संत्रा उत्पादनात वाढ होऊ शकेल. गुणवत्ता अणि उत्पादकतेशी तडजोड करू नका, असा संदेश यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी संत्रा उत्पादक शेतकऱ्यांना दिला.

दाभा येथील पीडीकेव्ही ग्राऊंडवर सुरू असलेल्या ॲग्रो व्हिजनच्या आज शेवटच्या दिवशी संत्रा उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान या विषयावर विशेष कार्यशाळा आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यासह प्रमुख पाहुणे केंद्रीय निंबूवर्गीय संस्थानचे संचालक डॉ. दिलीप घोष, कृषी परिषद पुणेचे कार्यकारी परिषद सदस्य, तसेच डॉ. पं.दे.कृ.वि. अकोलाचे मोरेश्वर वानखेडे, कृषी सहसंचालक उमेश घाडगे, प्रमोद लाहाडे, सुधीर दिवे, डॉ. उंदिरवाडे, यांच्यासह प्रमुख मार्गदर्शक म्हणून उद्यानविद्या पं.दे.कृ.वि.चे अधिष्ठाता डॉ. डी.एम. पंचभाई, अ.भा.स.सं.प्र. पं.दे.कृ.वि. अकोलाचे वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. योगेश इंगळे, वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. डी.टी. मेश्राम उपस्थित होते.




संत्रा उत्पादन वाढीचे तंत्रज्ञान या विषयावर विशेष कार्यशाळा

गडकरी पुढे म्हणाले, एक एकरामध्ये कमीत कमी 40 टन संत्रा झाला पाहिजे. त्यात 80 टक्के हा चांगला असला पाहिजे. रोगमुक्त झाड असावा, आपला बार टिकला पाहिजे आणि उत्पादन टिकले पाहिजे.

यासाठी आपल्या भागामध्ये उत्तम बाग आणि उत्तम नर्सरी तयार करायला हवी. जेणेकरून संत्र्याची उत्तम रोपे उपलब्ध होऊ शकतील. उत्तम 50 नर्सरी तयार करून संत्र्याच्या, मोसंबी, लिंबाच्या कलमा तयार झाल्या तर फायद्याचे ठरेल. मातीचे परीक्षण चांगले होणे आवश्यक आहे.

फार्मर प्रोड्युस कंपन्या तयार केल्या तर शेतकऱ्यांना फायद्याचे ठरेल. आपल्याला आपला संत्रा टेबलफ्रूट म्हणून विकायचा आहे. उत्पादन आणि क्वॉलिटी याबाबत मार्गदर्शन व्हायला हवे. खतांपासून तर ड्रोणपर्यंत या सर्व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आपण आपले उत्पादन वाढवू शकतो. लवकरच एअर कंडिशन्ड ऑर्गेनिक फ्रूट बाजार सुरू करणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

संत्रा पिकाबाबत तज्ज्ञ मार्गदर्शकांनी मार्गदर्शन केले. इंडो इझ्राइल संत्रा उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर बोलताना डॉ. पंचभाई यांनी, संत्र्याची बेडवर लागवड करताना उत्पादकता कशी वाढवायची याबाबत माहिती सांगितली

डॉ. मेश्राम यांनी संत्रा सिंचन व्यय व्यवस्थापन या विषयावर बोलताना संत्रा फळबागावर पाण्याचे व्यवस्थापन महत्त्वाचे असल्याचे सांगितले. यानंतर डॉ. इंगळे यांनी, संत्रा फळपिकातील बुरशीजन्य फळ पिकातील बुरशीजन्य फळगळ व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शन केले.

यावेळी उत्कृष्ट आणि जास्तीत जास्त संत्रा उत्पादन घेणारे शेतकरी केशव भक्ते, अरविंद मिझोरकर, प्रमोद तिजारे, धीरज कावळे, गुलाबराव नेवाण, आशिष सदाफळे, गौरव राऊत यांचा गडकरी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संचालन मनोज जवंजाळ यांनी केले.

## हे जनतेने निवडून दिलेले सरकार आहे का?

### वडेट्टीवार यांचा सवाल

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :
2014 मध्ये मोदींची जशी लाट होती, तशी आता सरकारची कुठलीही लाट नव्हती. जनतेमध्ये सरकारविरोधात आक्रोश होता. त्यामुळे हे सरकार जनतेने निवडून दिले आहे का? असा सवाल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. नाना पटोले यांच्याबाबत मला पूर्ण माहिती नाही. त्यांनी हायकमांड समोर काय भूमिका पाडली याची माहिती घेतो, असेही वडेट्टीवार यांनी सांगितले. तसेच आम्ही विरोधक म्हणून आमची भूमिका पार पाडू, असेही ते म्हणाले.

विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी संवाद साधताना देवेंद्र फडणवीस यांना मुख्यमंत्रीपदासाठी शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्रापुढे असलेल्या अनेक प्रश्नांना घेऊन लढणे हे आमचे कर्तव्य आहे. आम्ही विरोधक म्हणून आमची भूमिका पार पाडू, असेही विजय वडेट्टीवार म्हणाले. हे सरकार जनतेने निवडून दिले आहे का? असा प्रश्न महाराष्ट्रातील जनता टाहो फोडून विचारत आहे. त्याचे उत्तरही देणे अपेक्षित आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली.

मोदी लाटेतही आम्ही 42 जागा जिंकल्या 2014 मध्ये मोदींची लाट होती. त्यावेळी काँग्रेसने 42 जागा जिंकल्या होत्या. 2019 मध्ये पुलवामा सारख्या घटना घडल्या होत्या. तेव्हा काँग्रेस दोन आकडी संख्याही गाठू शकणार नाही, असे वातावरण होते. तशा वातावरणातही आम्ही 44 जागांवर विजय मिळवला होता. पण आता आम्ही 16 जिंकल्या. सध्या राज्यात कुठलीही लाट नव्हती. सरकारविरोधात आक्रोश होता. जनमत हे सरकारच्या विरोधात असतानाही असा निकाल कसा लागू



शकतो, असा प्रश्न लोकांनाच पडला आहे. याचे विश्लेषण आम्ही करू, असे वडेट्टीवार म्हणाले.

लाडकी बहीण पुढे करून काही खेला झाला का?

लाडकी बहीणच्या नावाने पाच टक्के मते फिरली असतील. पण लाडकी बहीण पुढे करून दुसरा खेला, प्रयोग झाला का? अशी चर्चा लोकांमध्ये आहे. तसेच महाराष्ट्रात असे शक्य नाही, असे जनता म्हणत असल्याचे विजय वडेट्टीवार म्हणाले.

मोदी-शहांना विरोधकच ठेवायचा नाही

शरद पवारांच्या पक्षाचे निवडून आलेले 10 आमदार अजित पवार गटाच्या संपर्कात असल्याची चर्चा आहे. यावर बोलताना विजय वडेट्टीवार यांनी आता मोदी आणि शहा जे म्हणतील तेच होईल. राजा बोले और दल हले, याप्रमाणे राजे जे करतील ते होईल. मोदी आणि शहा यांना विरोधक ठेवायचा नाही. त्या भूमिकेतून सर्व सुरू आहे, अशी टीका केली.

## अनिल देशमुखांच्या घरासमोर होर्डिंग लावत डिवचले




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
राज्याचे माजी गृहमंत्री आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांचे चिरंजीव सलील देशमुख पराभूत झाले आहेत.

अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते आणि नागपूर शहर प्रमुख प्रशांत पवार व जिल्हा प्रमुख बाबा गुजर यांनी देशमुखांच्या घरासमोरच भले मोठे होर्डिंग लावून त्यांना डिवचले आहे. महाराष्ट्राने ठरवले राष्ट्रवादी काँग्रेसचे खरे वारसदार अजित दादाच आणि तुतारीचे निवडून आलेले दहा आमदारांचे दादा हेच वाली असा ठळक उल्लेख त्यावर करण्यात आला आहे.

सध्या नागपूरमध्ये देशमुखांच्या घरासमोर लावण्यात आलेल्या होर्डिंगची मोठी चर्चा आहे. अजित पवार चाळीस आमदार घेऊन महायुतीत सहभागी झाले होते. अनिल देशमुख आणि शहर अध्यक्ष दुनेश्वर पेठे यांनी दादा सोबत येण्यास नकार दिला होता. त्यामुळे जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये दोन गट पडले होते. पवार आणि बाबा गुजर यांना अनुक्रमे शहर व जिल्हाध्यक्ष करण्यात आले होते. लोकसभेत महाविकास आघाडीने मुसंडी मारली होती. वर्धा लोकसभा मतदारसंघाततून तुतारीचे अमर काळे निवडून आले होते. त्यामुळे शरद पवार यांच्यासोबत असलेल्या कार्यकर्त्यांचा उत्साह चांगलाच वाढला होता. यातच नागपूर जिल्ह्यात अजित पवार गटाला एकही जागा सोडण्यात आली नव्हती तर दुसरीकडे शरद पवार यांनी कधी नव्हे तरी नागपूर शहरातील पूर्व नागपूर विधानसभा मतदारसंघ काँग्रेसकडून खेचून आणला. नागपूर ग्रामीणमध्ये काटोल आणि हिंगणा हे दोन विधानसभा मतदारसंघसुद्धा आपल्याकडे कायम ठेवले होते. यामुळे अजित पवार यांच्या कार्यकर्ते चांगलेच अस्वस्थ झाले होते. अनेकांना अजित दादांसोबत गेल्याचा पश्चातापसुद्धा होत होता.

मात्र विधानसभेच्या निकालाने सर्व चित्रच बदलले. तुतारीच्या तीनही उमेदवारांचा दारुण पराभव झाला. दुनेश्वर पेठे यांच्या विरोधात असलेले भाजपचे कृष्णा खोपडे यांनी एक लाखाच्यावर मताधिक्य घेऊन विक्रमांची नोंद केली. एवढेच नव्हे तर तुतारीचे फक्त १० आमदार निवडून आले आहेत. शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसची विदर्भाची जबाबदारी अनिल देशमुख यांच्यावर सोपवली होती.

मात्र आता विदर्भातील सर्वच उमेदवार पराभूत झाल्याने अजित पवार यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांना चिडवणे सुरू केले आहे. त्याचाच भाग म्हणून अनिल देशमुख यांच्या घरासमोर अजित पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी होर्डिंग लावून पुन्हा डिवचले आहे.

## रेल्वेमंत्री अचानक पोहोचले दीक्षाभूमीवर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :
रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी ऑल इंडिया एससी, एसटी, रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशनच्या वार्षिक संमेलनाला नागपुरात हजेरी लावली. रेल्वे स्टेडियममध्ये आयोजित या कार्यक्रमासाठी ते विशेष विमानाने दिल्लीहून नागपुरात आज सकाळी दाखल झाले.

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हे २० नोव्हेंबरला नागपूर आणि रायपूरच्या दौऱ्यावर येणार होते. परंतु अचानक हा दौरा रद्द करण्यात आला होता. अलिकडेच महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक पार पडली. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव हे या निवडणुकीसाठी भाजपचे सहप्रभारी होते.

लोकसभा निवडणुकीसाठी पक्षाने पर्यावरणमंत्री भूपेंद्र यादव यांना प्रभारी आणि वैष्णव यांना सहप्रभारी नियुक्त केले होते. ऐन निवडणुकीच्या काळात त्यांचा नागपूर आणि रायपूर दौरा होणार होता. परंतु तो रद्द करण्यात आला. त्यानंतर दोन दिवसांपूर्वी पुन्हा त्यांचा नागपूर दौरा ठरला. वैष्णव हे इंडिया एससी, एसटी, रेल्वे एम्प्लॉईज असोसिएशनच्या वार्षिक संमेलनात उपस्थित होते. आज सकाळी नागपुरात दाखल झाले. संमेलनानंतर त्यांनी दीक्षाभूमीला भेट दिली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमी, नागपूरच्या सदस्यांनी वैष्णव यांचे स्वागत केले.



रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, रेल्वेच्या खासगीकरणाचा प्रश्नच उद्भवत नाही. या अफवा पसरवणाऱ्या लोकांना मी सांगू इच्छितो की, रेल्वे व संरक्षण विभाग भारताचा कणा आहेत. राजकारणापासून या दोन विभागांना दूर ठेवायला हवे.

## विदर्भ गौरव २०२४ पुरस्काराचा १ डिसेंबर रोजी वितरण सोहळा

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :
कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने मागील २५ वर्षांपासून स्व, माणिकलाल गांधी यांच्या स्मृतिप्रित्यर्थ 'विदर्भ गौरव पुरस्कार' देण्यात येत असतो.



विदर्भातील ज्या मान्यवराने विविध क्षेत्रात देदीप्यमान काम केले असेल किंवा विदर्भाचा लौकिक बृहत्‌विदर्भात वाढविला असेल अशा मान्यवर व्यक्तीचा सन्मान करण्यात येत असतो. रोख १ लाख रुपये, शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

२०२४ चा विदर्भ गौरव पुरस्कार प्रसिद्ध शेफ विष्णु गनोदर यांना देऊन गौरविण्यात येणार आहे.

विष्णु मनोहर यांच्या जावावर आजवर २५ विश्वविक्रम असून, त्यांच्या विष्णुजी की रसोईची संपूर्ण जगात एकूण ७ ठिकाणी व्यावसायिक केंद्रे आहेत. यासोबतच महाराष्ट्र शासनाच्या शालेय पोषण आहार समितीचे अध्यक्ष व प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण बोर्ड नवी दिल्लीचे सदस्य आहेत.

हा कार्यक्रम रविवार १ डिसेंबर, २०२४ रोजी सायंकाळी ७ वाजता इन्स्टिट्युशन ऑफ इंजिनिअर्स सभागृह, अंबाझरी रोड, रामदासपेठ, नागपूर येथे संपन्न होईल..

पुरस्कार वितरण समारंभ भारत सरकारचे रस्ते, महामार्ग व वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते व सुप्रसिद्ध मेंदू विकार तज्ज्ञ, वर्ल्ड फेडरेशन ऑफ न्यूरोलॉजीचे विश्वस्त, पद्मश्री डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होईल . या प्रसंगी राष्ट्रीय पातळीवरील ज्येष्ठ पत्रकार अशोक वानखडे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहतील. या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

## नोमानींनी मागितली विनाअट जाहीर माफी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :
विधानसभा निवडणुकीत भाजपाला मतदान करणाऱ्या मुस्लिमांवर सामाजिक बहिष्कार घालण्याचे आवाहन करणारे मुस्लिम पर्सनल लॉ बोडार्चे प्रवक्ते सज्जाद नोमानी यांनी जाहीर माफी मागितली आहे.



जारी केलेल्या माफीनाम्यात आपण केलेले वक्तव्य एका विशिष्ट संदर्भात तेही सप्टेंबर २०२४ मध्ये केले होते असे नोमानी याने म्हटले आहे. काही लोकांना लोकसभा निवडणुकीत मतदान करण्यापासून रोखण्यात आले होते. त्या संदर्भात केलेले वक्तव्य होते असे नोमानी यांनी म्हटले आहे.

माझे वक्तव्य कोणत्याही समाजा विरोधात नव्हते. माझा तसा उद्देशही नव्हता. आणि कोणत्याही प्रकारचा हा फतवा नव्हता. तरीही माज्या या वक्तव्यामुळे कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी माझे शब्द परत घेतो आणि विनाशर्त माफी मागतो असे नोमानीने माफीनाम्यात म्हटले आहे.

ऑल इंडिया पर्सनल लॉ बोर्डाचे प्रवक्ते सज्जाद नोमानी यांनी महाविकास आघाडीला १७ मागण्यांचे एक निवेदन दिले होते. या मागण्या मुस्लिम समाजाच्या हिताच्या आहेत असा दावा नोमानी यांनी केला होता.

## आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्याहस्ते आज होणार घर घर संविधान कार्यक्रमाचा शुभारंभ

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :
भारतीय संविधानास 75 वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त घर घर संविधान कार्यक्रमाचा संविधान दिनाचे औचित्य साधून आज दिनांक 26 नोव्हेंबर रोजी विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्याहस्ते होत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सकाळी 7.30 वाजता होणाऱ्या या कार्यक्रमास जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले, अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे, निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

भारतीय राज्यघटनेबाबत जागरुकता, राष्ट्रीय एकात्मतेची भावन, उपेक्षित घटकातील समुदायांमध्ये त्यांच्या घटनात्मक अधिकारी व कर्तव्याबाबत साक्षरता आदीबाबत संविधान अमृत महोत्सवी वर्षानिमित्त घर घर संविधान




उपक्रम 26 नोव्हेंबर पासून पुढील प्रत्येक वर्षी साजरा करण्यात येणार आहे.

नागपूर येथे हा शुभारंभ आज होत असून या समारंभाला समाजकल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाबासाहेब देशमुख, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे उप संचालक विजय वाकुलकर, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे उपायुक्त डॉ. मंगेश वानखेडे, संशोधन अधिकारी आशा कवाडे, जिल्हा समाजकल्याण अधिकारी किशोर भोयर, नागपूर विभागातील विविध कार्यालयातील अधिकारी, सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत विविध महामंडळातील अधिकारी व कर्मचारी, सामाजिक न्याय विभागातील सेवानिवृत्त झालेले अधिकारी, शासकीय वसतिगृहातील गृहपाल व विद्यार्थी, शासकीय निवासी शाळेतील शिक्षक व विद्यार्थी, जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक तसेच सामाजिक न्याय विभागांतर्गत विविध पुरस्कार प्राप्त पुरस्कार्थी, तृतीयपंथी आदी उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

# देशभरातील २ लाखाहून अधिक शेतकरी ठरले लाभार्थी : नितीन गडकरी

## ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाचा थाटात समारोप

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. २५ नोव्हेंबर : ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात नागपूर महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, तेलंगणा अशा अनेक राज्यातील शेतक-यांनी भेट दिली. दोन लाखापेक्षा अधिक शेतक-यांनी भेट देत नवनवीन तंत्रज्ञान, विविध कार्यशाळांच्या माध्यमातून मिळालेल्या उपयोगी माहितीचा लाभ घेतल्याबद्दल ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय मंत्री मा. श्री. नितीन गडकरी यांनी आनंद व्यक्त केला.

शेतकरी, उत्पादक, ग्राहक, कृषी विद्यार्थी आणि कृषीप्रेमींनी भरभरून प्रतिसाद दिल्यानंतर चार दिवसांपासून पीडीकेव्ही मैदान, दाभा येथे सुरू असलेल्या भारतातील सर्वात मोठे कृषी प्रदर्शन ॲग्रोव्हिजन चा सोमवारी थाटात समारोप झाला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲग्रोव्हिजनचे मुख्य प्रवर्तक केंद्रीय मंत्री मा. श्री. नितीन गडकरी होते तर अरुणाचल प्रदेशचे कृषी, फलोत्पादन, पशुसंवर्धन, पशुवैद्यकीय, दुग्धविकास, मत्स्यपालन, अन्न व नागरी पुरवठा मंत्री गॅब्रिएल डी. वांगसू यांची प्रमुख उपस्थिती होती. मंचावर ज्येष्ठ नेते रामदास तडस, केंद्रीय निंबूवर्गीय संस्थानचे संचालक डॉ. दिलीप घोष, आयोजन सचिव रवी बोरटकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थति होते. मान्यवरांच्या हस्ते ॲग्रोस्पेक्ट्रम या ॲग्रीइंडस्ट्रीवर आधारित मासिकाचे प्रकाशन करण्यात आले. ॲग्रोव्हिजनच्या आयोजनात सहभागी व्यक्तींचा तसेच, प्रगतिशील शेतकरी पुरस्कार व निबंध स्पर्धांच्या विजेत्यांचा सत्कार करण्यात आला.

नितीन गडकरी यांनी शेतक-यांचे जीवनमान उंचावण्यासाठी घेण्यात आलेल्या विविध विषयांवरील कार्यशाळांचा उल्लेख केला. प्रदर्शनात प्रदर्शित करण्यात आलेले इलेक्ट्रीक ट्रॅक्टर, ड्रोन, कृषी उपकरणे आदींची तरुणांनी माहिती जाणून घेतली. शेतक-यांमध्ये अभ्यासूवृत्ती व जिज्ञासा बघायला मिळाली. शेतक-यांच्या आत्महत्या होऊ नये व स्मार्ट शहरांसारखी स्मार्ट खेडी व्हावी, असा प्रयत्न ॲग्रोव्हिजनच्या माध्यमातून केला जात असल्याचे ते म्हणाले.

# संविधानीक मुल्यांच्या जागरांसाठी आज पासून वर्षभर होणार विविध उपक्रम : डॉ. इटनकर

## हरघर संविधान उपक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरावर समिती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. २५ नोव्हेंबर : भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्याच्या औचित्याने २६ नोव्हेंबर, अर्थात संविधान दिनापासून वर्षभर हरघर संविधान साजरा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. भारतीय संविधानातील मूल्य प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचावेत, स्वातंत्र्याच्या मुल्यांसह राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला बहाल केलेल्या अधिकारासह राष्ट्रासाठी कर्तव्याची जाणीव अधिक व्यापक व्हावी यासाठी नागपूर जिल्ह्यात विविध उपक्रमांच्या माध्यमातून संविधानाचा अमृत महोत्सव साजरा करू, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर यांनी सांगितले. दिनांक २६ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या संविधान दिनाच्या निमित्ताने आयोजित बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अनुप खांडे, सहायक आयुक्त समाज कल्याण सुकेशनी तेलगोटे व अधिकारी उपस्थित होते.



दिनांक १० ऑक्टोबर रोजी शासनाने हरघर संविधान साजरा करण्याबाबत शासन निर्णय जाहीर करून यात मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत. यात संविधानाचे महत्त्व व त्यातील मूल्य शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये रूजविणे, नागरिकांमध्ये जागरूकता वाढविणे, संविधानातील मुलभूत हक्क, कर्तव्ये आणि विविध तरतुदींबाबत जागरुकता वाढविणे, सामाजिक न्यायाची भावना रुजविणे, राष्ट्रीय एकात्मता व समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही मुल्यांचा प्रचार व प्रसार करणे, विद्यार्थ्यांमध्ये त्यांच्या सहभागातील चर्चोद्वारे उपक्रमांचे नियोजन करणे, एकता व बंधुता याबाबत जनजागृती करण्याचा उद्देश या उपक्रमा पाठीमागे निश्चित करण्यात आला आहे. दिनांक २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिनानिमित्त नागपूर येथे अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांचे शासकीय अधिकारी कर्मचाऱ्यांसाठी संविधानाबाबत विशेष व्याख्यान ठेवण्यात आले आहे. हे व्याख्यान सायंकाळी ४ वाजता नियोजन भवन येथे होईल. याचबरोबर सामाजिक न्यायभवन येथे संविधान दिन सकाळी ८ वाजता विविध वरिष्ठ अधिकारी, समितीतील सदस्य हे संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करणार आहेत.

नागपूर जिल्ह्यात अमृत महोत्सवी वर्षाच्या निमित्ताने विविध उपक्रमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी एक विशेष समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती आहे. यात सदस्य म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, नगर पंचायत/नगरपरिषद / नगरपालिका यांचे मुख्याधिकारी, शिक्षणाधिकारी, क्रीडा व सांस्कृतिक अधिकारी (मनपा), जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, शासकीय कला व अभिकल्प महाविद्यालयाचे अधिष्ठाता, आदिवासी विभागाचे प्रकल्प अधिकारी हे सदस्य आहेत. निवासी उपजिल्हाधिकारी हे या समितीचे सदस्य सचिव, सहायक आयुक्त समाज कल्याण हे सहसदस्य सचिव म्हणून काम पाहतील.

# चरणसिंग ठाकूर मंत्री बनल्यास होईल राज्यात सर्वांगीण विकास

## ईच्छाशक्ती ध्येयप्राप्ती राजकीय व्यक्तिमत्व

■ महासागर प्रतिनिधी
काटोल,दि. २५ नोव्हेंबर : काटोल-नरखेड विधानसभेत सन २०१४ ला चढून आलेले परंतू विचारधारेपेक्षा राजकारणाला बळ मिळाल्याने लवकरच २०१९ मध्ये पुन्हा विधानसभेत कांग्रेसला विजय मिळाला परंतू २०१४ नंतर कायम भारतीय जनता पार्टीच्या विचारधारेला जुळून प्रचार,प्रसार करण्याचे काम जर प्रामुख्याने कोणी केले असेल तर ते म्हणजे नवनिर्वाचित आमदार आदरणीय चरणसिंग ठाकूर यांनी केले आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहून भाजपा महामंत्री दिनेश ठाकरे यांनी दिली.

आता विधानसभेत आमूलाग्र परिवर्तन घडून आलेले आहे आणि आता हीच वेळ आहे या कांग्रेस बालेकिल्ल्यावर भविष्यात भारतीय जनता पार्टीच्या विचारधारेला नवीन पिढी जुळून राहावी् यासाठी परंतू या मतदारसंघात घराघरांत नेते आहेत आणि या मातब्बर राजकीय मंडळींना सोबत घेऊन चालण्याची जबाबदारी सांभाळाची असेल तर या मतदारसंघात जनतेला मंत्रीपदाची सवय लागलेली आहे् कारण कांग्रेस राजवटीत या मतदारसंघातील नेत्यांनी मोठमोठे पद भुषविले आहे आणि त्या जोरावर कायम २५ वर्ष राज्य



केले.परंतू विकासकामांचा फार मोठा बँकलाग असल्याने या मुद्द्यावर चरणसिंगा ठाकूर यांची लोकाभिमुख विकास कामांची शैली पाहून एकदा संधी दिली. त्या संधीचं सोनं जर करायचे असेल तर भारतीय जनता पार्टीचे विधानसभेतील नेतृत्व कुठेही कमी पडता कामा नये म्हणून या विधानसभेतील आमदाराला मंत्रीपद असणे् भविष्याचा विचार करता आवश्यक ठरतं.किमान प्रमुख महामंडळ जसे औद्योगिक विकास महामंडळ,कृषि पणन महामंडळ यासारख्या माध्यमातून बहूसंख्य संत्रा बागायतदारांचे् आजवरचे प्रश्न सूटतील किंवा कापूस पिकाचे क्षेत्र दिवसेंदिवस वाढत असल्याने आणि बेरोजगारांची संख्या वाढत असल्याने निवडणूक काळात जी आश्वासने केंद्रीय कृषिमंत्री, रस्ते, वाहतूक परिवहन मंत्री, माजी मुख्यमंत्री यांनी दिली होती त्यावर 'बोले तैसा चाले' अशी प्रथमच ओळख या मतदारसंघात भारतीय जनता पार्टीची होईल आणि नंतर विचारधारेत कायम परिवर्तन घडवून आणण्यासाठी मदत होईल आणि जनतेने सुद्धा आदरणीय चरणसिंगाची आजवरची विकासकामांची शैली जी लोकांनी पाहून यावेळी भरघोस मतदान केलेलं पाहता या मतदारसंघाला मंत्रीपद म्हणजे खरा न्याय होईल.कारण या मतदारसंघात मंत्रीपदाची जनतेला सवय झाली आहे. शेतकरी, शेतमजूर, महिला, बेरोजगारी असे अनेक मुख्य प्रश्न सोडविण्यासाठी या मतदारसंघात कौतुकास्पद सुरुवात होईल आणि भविष्यात या मतदारसंघात राजकारणाला एक अनोखी सुरुवात होईल.तेव्हा या मतदारसंघातील मतदारांची प्रथम मागणी भारतीय जनता पार्टीने पुर्ण करावी अशी अपेक्षा कार्यकर्त्यांकडून व्यक्त करण्यात येत असल्याचे माजी कृ उ बा स सभापती दिनेश ठाकरे यांनी सांगितले.

# श्री पंचमुखी हनुमान मंदिर, बेल्लोरी, नागपूर येथे बालसंस्कार वर्गाचे आयोजन




■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. २५ नोव्हेंबर : हिंदु जनजागृती समितीच्या वतीने बेल्लोरी, नागपूर येथील श्री पंचमुखी हनुमान मंदिरात बालसंस्कार वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे. या वर्गात यावेळी ३५ बालकांनी उत्साहाने सहभाग घेतला. या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे बालकांमध्ये बालवयात साधनेची गोडी निर्माण होणे, तसेच राष्ट्रप्रेम, भारतीय संस्कृतीचे ज्ञान आणि नैतिकता रुजवणे. त्यांच्यात चांगले गुण विकसित होऊन सर्वांगीण विकास साधणे हा आहे.

बालसंस्कार वर्गाची सुरुवात प्रार्थनेने झाली. यानंतर मुलांना बोधकथा, श्लोक, आध्यात्मिक खेळ आणि आदर्श कृतीच्या माध्यमातून चांगल्या सवयी आणि धर्माचरण यांचे महत्त्व पटवून दिले. हिंदु जनजागृती समितीचे श्री. अतुल अर्वेनला यांनी मुलांना मार्गदर्शन केले. मंदिर विश्वस्तांनी यावेळी सनातन संस्थेच्या सात्विक वह्यांचे वाटप केले. या वह्या मुलांच्या अध्ययन प्रक्रियेत उपयोगी ठरतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

पालक व ग्रामस्थांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून, पुढील पिढी संस्कारक्षम बनवण्यासाठी असे वर्ग नियमित आयोजित करावेत, असे मत व्यक्त केले. संस्कार वर्गातील चैतन्य आणि उत्साह बघून मंदिरात येणाऱ्या भक्तांनी, वर्गासाठी सहाय्य करणाऱ्या धर्मप्रेमिंनी देखील साधना समजून घेतली.

# आयटी क्षेत्रात विद्यार्थ्यांना क्वालिटी बेस जॉब मिळावा म्हणून झटत आहेत शिंदे दाम्पत्य

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. २५ नोव्हेंबर : लाखो रुपये खर्च करून चार वर्षे अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्या-नंतरही आयटी सेक्टर मध्ये रोजगाराची संधी मिळण्यासाठी मुंबई, पुणे सारख्या शहरात पुन्हा लाखाच्या घरात सुसंगत असे जॉब ओरिएंटेड कोर्सेस करूनही नोकरीसाठी भटकंती करणारे किंवा टेक्नॉलॉजी बेस जॉब न मिळता कॉल सेंटरवर शिक्षणाच्या तुलनेने नगण्य पगारावर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे पाहून हा प्रश्न नक्कीच उद्भवतो की कुठेतरी महाविद्यालयीन शिक्षण व्यवस्था व दोनशे ते तीनशे विद्यार्थ्यांच्या बॅचेस चालवणारे कोचिंग क्लासेसच्या व्यवस्थापनात काहीतरी घोळ आहे आणि नेमक्या याच मुद्द्यावर बोट ठेवत कोणत्याही शाखेमधून ग्रॅज्युएशन झालेल्या विद्यार्थ्यांना एक्सपिरीयन्स बेस ट्रेनिंग देऊन आयटीसाठी लागणारे विधिवत कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त करूवून देऊन विद्यार्थ्यांना क्वालिटी जॉब मिळवून देण्यासाठी धडपडणारे सुहास शिंदे व स्नेहल शिंदे दांपत्य गेल्या तेरा वर्षांपासून सि.टी.पी.एल. ही कंपनी चालवित आहेत.

मेकॅनिकल इंजिनीयर असलेले व टेक्निकल फिल्ड मध्ये विविध नामांकित कंपनीमध्ये २१ वर्षांचा अनुभव असलेले सुहास शिंदे यांनी लाखो रुपये खर्चून अभियांत्रिकेचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या रोजगाराविषयीची अनास्था बघितली, आयटी सेक्टर मधील विविध नामांकित कंपन्यांमध्ये क्वालिटी बेस जॉब न मिळता कॉल सेंटरवर त्यांना जेव्हा काम करावे लागते किंवा अक्षरशः पंधरा ते वीस हजार महिनावारी कमवावे लागते तेव्हा ही परिस्थिती बघून शिक्षण व्यवस्थित कुठेतरी चुकते आहे यावर त्यांनी लक्ष वेधले असता त्यांना कळून चुकले की मोठमोठ्या नामांकित महाविद्यालयांमध्ये व १००% जॉब गॅरंटी देणाऱ्या कोचिंग क्लासेस मध्ये प्रॅक्टिकल बेस शिक्षण न देता केवळ थेअरी अप्लाय केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आयटीमध्ये काय काम केल्या जाते यासारख्या बेसिक प्रश्नाचेही उत्तर देता येत नाही. मग अशा विद्यार्थ्यांना कंपनी कशी उचलणार? याचाच परिणाम त्यांच्या रोजगारावर होतो. तेव्हा केवळ अभियांत्रिकीचेच नाही तर आर्ट्स, कॉमर्स, सायन्स यासारख्या प्रत्येक शाखेतून आलेल्या विद्यार्थ्यांना आयटी सेक्टर मध्ये क्वालिटी बेस जॉब्स मिळवून देण्याच्या प्रयत्नातून एक्सपिरीयन्स बेस ट्रेनिंग देण्यासाठी त्यांनी क्लियरिक सॉफ्टटेक प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी १३ जुलै २०११ ला नागपूर येथे स्थापित केली. सामाजिक बांधिलकी जोपासणारे व समाजाचं देणं म्हणून कार्यप्रवण असलेले सुहास शिंदे व एलएलएम झालेल्या त्यांच्या पत्नी स्नेहल शिंदे हे समर्पितपणे सी.टी.पी. एल. ही कंपनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी गेल्या १३ वर्षांपासून चालवत आहेत. या संस्थेमध्ये ओरॅकल टेक्नॉलॉजी व त्यासंबंधीत इ.आर.पी. व एस. ए. पी. या सॉफ्टवेअर संबंधी कौशल्य विद्यार्थ्यांना अवगत करून दिली जातात. त्यासाठी दिवसाला नऊ तास याप्रमाणे आठवड्याला ५४ तास संपूर्ण शिस्तीमध्ये त्यांना एक्सपिरीयन्स बेस ट्रेनिंग दिल्या जाते. यामध्ये टेक्निकल भाग सुहास शिंदे तर ॲडमिनिस्ट्रेशन व एच आर स्नेहल शिंदे या सांभाळतात. जे आम्ही नऊ तासात शिकवितो ते दोन तासाच्या शंभर टक्के जॉब ग्यारंटी देणाऱ्या कोचिंग इन्स्टिट्यूट मध्ये काय शिकविल्या जात असेल हा एक चिंतेचा विषय आहे. आतापर्यंत २७८५ विद्यार्थी या संस्थेतून, भारतातच नाही तर परदेशात सुद्धा मोठमोठ्या पॅकेजवर काम करीत आहेत असे मोठ्या अभिमानाने स्नेहल शिंदे सांगतात.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ९७ प्रकरणांची नोंद

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. २५ नोव्हेंबर : नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ५१ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. सोमवार (२५) रोजी शोध पथकाने ९७ प्रकरणांची नोंद करून १,२९,९००/-रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत ३० प्रकरणांची नोंद करून १२,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे (रु. १००/-दंड) या अंतर्गत ५ प्रकरणांची नोंद करून ५००/-रुपयांची वसुली करण्यात आली. दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १४ प्रकरणांची नोंद करून ५,६००/ रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डींग हॉटेल, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, कॅटरर्स सर्व्हीस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता या अंतर्गत २ प्रकरणांची नोंद करून ४,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत ११ प्रकरणांची नोंद करून २२,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. वैघकिय व्यवसायिकांनी बॉयोमेडीकल वेस्ट सर्वसाधरण कचऱ्यात टाकणे या अंतर्गत १




प्रकरणांची नोंद करून ७५,०००/- रुपयांची वसुली करण्यात आली. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास २९ प्रकरणांची नोंद करून ५,८००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास ५ प्रकरणांची नोंद करून ५,०००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे. घरकुल इन्फ्रा यांनी बांधकामाचे साहित्य रस्त्यावर टाकल्याबद्दल रू. १०,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. तसेच मे. अशियान किडनी क्लिनीक यांनी बायो-मेड कचरा हा इतर सामान्य कचऱ्यासह कचरा टाकल्याबद्दल रू. ७५,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. बास्किन रॉबिन कॅफे यांनी जवळच्या रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. तसेच मे. बाबु फुड प्लाझा यांनी जवळच्या रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात कचरा टाकल्याबद्दल रू. ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसुल केला. धंतोली झोन अंतर्गत श्री. राम शेंडे यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. यादव स्वीट्स यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल रू. ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला.

# आयर्न लेडी इंदिरा गांधी यांना महावितरणचे अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर,दि. २५ नोव्हेंबर : भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान, आयर्न लेडी ऑफ़ इंडीया इंदिरा गांधी यांची जयंती व राष्ट्रीय एकात्मता दिनानिमित्त महावितरण तर्फे त्यांना अभिवादन करण्यात येऊन राष्ट्रीय एकत्मता दिनाची सामूहिक शपथ घेण्यात आली.

महावितरणच्या काटोल मार्गावरील विद्युत भवन कार्यालयात नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके इंदीरा गांधी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. तद्नंतर राष्ट्रीय एकात्मता दिनाची सामूहिक शपथ घेण्यात आली. यावेळी अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य, मधुकर घुमे, संजय वाकडे, नारायण लोखंडे, सहायक महाव्यवस्थापक (मानव संसाधन) महेश जाधव, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, उपविधी अधिकारी सुनिल उपाध्ये, कार्यकारी अभियंता राजेश घाटोळे यांच्यासह महावितरणचे अनेक अधिकारी आणि कर्मचा-यांनीइंदिरा गांधी यांच्या प्रतिमेला अभिवादन केले.

# वाडी मंडळातील मतदारांनी केले समीर मेघे यांना केले भरभरुन मतदान

■ महासागर प्रतिनिधी
वाडी,दि. २५ नोव्हेंबर : वाडी मंडळातील गावांमध्ये भरभरून मतदान केल्यामुळे वाडी शहरामध्ये समीर मेघे यांना ८५७२ मताधिक्य मिळाले. त्याचबरोबर दवलामेटी १०७५ ,लाव्हा २२०२ , सोनेंगाव ( निपाणी ) ५०३ ,गोधनी ( रेल्वे )२९३,बोखारा १६८७ ,ग्रामीण ३३२५ असे एकुण १८०९८ मताधिक्य मिळाले आहे.



आमदार समीर मेघे यांना प्रचंड मताधिक्याने निवडून दिल्याबद्धल मतदारांचे, विविध जाती व भाषीकांचे, लाडकी बहीनींचे, भावांचे, शेतकऱ्यांचे व रात्रंदिवस परीश्रम करणाऱ्या भाजपा कार्यकर्ता या सर्वांचे वाडी मंडळाचे वतीने मनःपुर्वक आभार मानण्यात आले.

# येरल्यात समीर मेघे यांच्या विजयाचा जल्लोष

■ महासागर प्रतिनिधी
वाडी,दि. २५ नोव्हेंबर : नागपूर तालुक्यातील येरला येथे आमदार समीर मेघे यांच्या विजयाचा जल्लोष विजय रॅलीद्वारे करण्यात आली. रॅलीत गुलाल उधळून, फटाक्याची अतिशबाजी करुन ,मिठाई वाटून मतदारांचे आभार मानले. यावेळी माजी उपसरपंच प्रमोद गमे ,छत्रपती झाडे ,तेजराज बोढे ,भारती खोब्रागडे ,गोदाबाई नेरेठीया, मुरली पंधरे, कुंजीलाल परतेकी, राजू गमे, सुधाकर ठाकरे ,सुभाष जुनघरे ,युवराज जुनघरे, मंगेश जुनघरे ,तुकाराम इवनाथे, सतपाल उईके, बबलू टांगले ,घनश्याम लोखंडे, कुलदीप फुलझले ,राजू झाडे, मनोहर जुनघरे, पांडुरंग वाघ, विजय ठाकूर ,लक्ष्मण मोहनिया, कमलेश चंद्रवंशी, आत्मराम चंद्रवंशी, संतोष बनकर ,संजय तायडे ,बबन इंगोले, योगेश टांगले ,सखाराम इवनाथे ,भीमराव शेवाळे, दिनेश जुनघरे, प्रदीप फुलझेले ,अनिल मेश्राम, शोभा झाडे, प्रतीक्षा जुनघरे ,यमुना परतेकी, रंजना परतेकी, छाया गमे ,राधा दाऊस्कर ,मीरा लांडे, शुभांगी इवनाथे ,अंकित ठाकरे ,अंकित लोखंडे, अभिलाष जुनघरे, पुष्कर राजपूत ,यश जुनघरे ,ओम शेळके, गौरव गमे ,अतुल भलावी, राज इवनाथे ,महेश उईके ,नकुल मोहनिया ,तेजस जुनघरे, रजत यादव ,रोशन गमे ,अनिकेत धुर्वे उपस्थित होते.




## जाहिरनामा / सायटेशन नोटीस

कोर्ट विद्यमान सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांचे न्यायालय, कामठी, जि. नागपूर

एम.जे.सी.नं : ९३/२०२४
पे.ता. : ०६/०१/२०२५
प्रोसेस नं. १७७२ /२०२४

Applicants : Praveen S/o Ramkisan Bhagat, Aged 43 Years, Occu. Private, R/o. Lala Oli, Lihiya Marg, Kamptee, Tah. Kamptee, Dist. Nagpur.
2. Manisha D/o Ramkisan Bhagat, (After Marriage) Manish W/o Sanjay Joshi, Aged 49 Years, Occu. Housewife, R/o. Near Post Office, Gandhi Ward, Hinganghat, Wardha, Dist. Wardha.
3. Sonam D/o Ramkisan Bhagat, (After Marriage) Sonam W/o Sandeep Mishra, Aged 40 Years, Occu. Household, R/o. Ramla Garden road, Achaleshwar Ward, C/o/ P.H. Nagar, Wing No. 3, Flat No. 6 Bhagad Khidki, Chandrapur, Dist. Chandrapur.
----- V/S -----
Non applicant :- NIL

मयतः-Ramkishan S/o Harishankar Bhagat, मयत दि. १२/०७/२०१५, मयत ठिकाण - लाला ओळी कामठी

सदरहु अर्जदारांनी वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये मयत Ramkishan S/o Harishankar Bhagat, मयत दि. १२/०७/२०१५, यांचे वारसान प्रमाणपत्र मिळण्याकरीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान सहदिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांनी दि. ०६/०१/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व संबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारस नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदारांना Ramkishan S/o Harishankar Bhagat, यांचे वारसान प्रमाणपत्र मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १८/१०/२०२४ रोजी माझ्या सहीने न्यायालयाचा शिक्यानिशी दिला.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## जाहिर नोटीस

कोर्ट विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यांचे न्यायालय
एम.जे.सी. केस नं. १०१/२०२४
पे.ता.: १७/१२/२०२४
प्रोसेस नं. : १८१६

अर्जदार : इंदुबाई गुणाजी गोरे रा. वार्ड नं. २ गुमथी ता. कामठी जि. नागपूर
---- विरुध्द ----
गैरअर्जदार : श्रीमती लता गजानन मोरे रा. प्लॉट नं १०२७, प्रेमनगर, हनुमान मंदिर जवळ, नागपूर

सदरहु अर्जदारानी वारतान सर्टीफिकेट ॲक्टचे १८२७ कलम २ अन्वये अर्जदारानी श्री गजानन गुणाजी मोरे, मयत दि. १५/०८/२०१७ रा. वार्ड नं. २ गुमथी ता. कामठी जि. नागपूर यांचे वारसान सर्टीफिकेट मिळण्या-करीता या न्यायालयात अर्ज सादर केला आहे. त्या अर्जाच्या सुनवाणीची तारीख कोर्ट विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, कामठी यानी दिनांक १७/१२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता ठरविली आहे. या जाहीर नोटीसद्वारे सर्व सबंधिताना नातेवाईकांना व आम जनतेस कळविण्यात येते की, जर अर्जदार मयतदाराचे वारसान नव्हे असे कोणास समझविण्याचे असेल तर पेशी तारखेवर हया कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखा वरुन असे कळविण्यात येते की जर सदरहु मुददतीत कोणी योग्य ती कोणतीही हरकत वा उजर न्यायालयात उपस्थित न झाल्यास अर्जदाराला श्री गजानन गुणाजी मोरे, मयत दि. १५/०८/२०१७ रा. वार्ड नं. २ गुमथी ता. कामठी जि. नागपूर यांचे वारसान सर्टिफिकेट मंजुर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/११/२०२४ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिला

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, कामठी

## क्राईम कॉर्नर

### ३ लाखांच्या मालावर डल्ला

**नागपूर,दि. २५ नोव्हेंबर :** कुटुंब बाहेरगावी गेल्याची संधी साधून अज्ञात आरोपीने घरफोडी करीत रोकड आणि दागिन्यांसह जवळपास ३ लाख रुपयांच्या मालावर डल्ला मारला. ही घटना पारडी पोलिस ठाण्यांतर्गत घडली. पोलिसांनी विकास यज्ञनारायण गुप्ता (२४) रा. पोवारीनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

गुप्ता कुटुंब मुळचे मध्यप्रदेशातील रिवा येथील रहिवासी आहे. गत २१ नोव्हेंबरच्या सायंकाळी सर्वजण घराला कुलूप लावून रिवा येथे गेले होते. या दरम्यान अज्ञात आरोपीने मुख्य दाराचे कुलूप तोडून त्यांच्या घरात प्रवेश केला. कपाटातील रोख १ लाख आणि सोन्याचांदीचे दागिने असा ३ लाख रुपयांचा माल चोरी करून पसार झाला. रविवारी सकाळी १० वाजताच्या सुमारास गुप्ता कुटुंब घरी परतले असता चोरी झाल्याचे समजले. घटनेची तक्रार पोलिसात करण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीवर गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

### रेल्वेच्या धडकेत एकाचा मृत्यू

**नागपूर,दि.२५ नोव्हेंबर :** रेल्वेच्या धडकेत एका व्यक्तीचा गंभीर जखमी होऊन मृत्यू झाला. ही घटना मानकापूर पोलिस ठाण्यांतर्गत नागपूर-दिल्ली रेल्वे लाईनवर घडली. मृताची ओळख अद्याप पटलेली नाही.

मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी पहाटे ४ वाजताच्या सुमारास इंदिरा मातानगरजवळील नागपूर-दिल्लीरेल्वे लाईनवर एक व्यक्ती बेशुद्धावस्थेत पडून असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर मानकापूर पोलिस घटनास्थळी पोहोचले. एक ३५ ते ४० वर्षे वयोगटातील व्यक्ती रूळावर जखमी अवस्थेत पडून होता. त्याला उपचारार्थ मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

### बोलार्ड लाईट चोर पोलिसांच्या जाळ्यात

**गत १ वर्षात व्हीआयपी मार्गावरील अनेक लाईट चोरी**

**नागपूर,दि.२५ नोव्हेंबर :** एका मद्यपीने दारूच्या पैशांची व्यवस्था करण्यासाठी चक्क व्हीआयपी मार्गावरील महागडे बोलार्ड लाईटची चोरी करण्यास सुरूवात केली. गत एक वर्षामध्ये त्याने या मार्गावरील अनेक लाईट चोरी केल्या. सीताबर्डी पोलिस अनेक दिवसांपासून त्याच्यावर मागावर होते. अखेर गस्ती दरम्यान तो पोलिसांच्या हाती लागला. झडतीमध्ये त्याच्याजवळ काही लाईट ही मिळाले. सर्व लाईट जप्त करून त्याला अटक करण्यात आली. राजेश ज्ञानीराम बोहरे (३२) रा. फुटाळा असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

आरोपी राजेश हा मिस्त्री काम करतो. त्याला दारूचे व्यसन असून तो त्याच्या आहारी गेला आहे. दारूच्या पैशांची व्यवस्था करण्यासाठी त्याने चोरीचा मार्ग निवडला. प्रशासनाकडून जी-२० समिट दरम्यान जीपीओ चौक ते अलंकार चौकापर्यंत व्हीआयपी मार्गावर जवळपास १३४ बोलार्ड लाईट लावले होते. एक-एक करून हे लाईट चोरी होऊ लागले. महानगर पालिकेच्या कर्मचाऱ्याने या संबंधात सीताबर्डी पोलिसात तक्रार केली होती. काही दिवसांपूर्वीच एक सायकलस्वार व्यक्ती लाथ मारून फुटपाथवर लागलेले बोलार्ड लाईट चोरी करून नेतानाचा व्हिडिओ व्हायरल झाला होता. पोलिसांनी तपासाला गती दिली. गस्ती दरम्यान पोलिसांना राजेश सायकलवर प्लॅस्टिकचे पोते घेऊन जाताना दिसला. संशयाच्या आधारावर त्याला अडवून पोत्याची झडती घेतली असता त्यात ५०० एमएमचे ४ बोलार्ड लाईन आणि हातोडी मिळाली.चौकशीत सुरूवातीला त्याने पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी बाजीराव दाखवताच त्याने गत एक वर्षामध्ये अनेक बोलार्ड लाईट चोरी केल्याची कबुली दिली. तो लाईट भंगारवाल्याला विकून दारूसाठी पैशांची व्यवस्था करीत होता. ही कारवाई पोउपनि जगन्नाथ शेरकर, विनोद तिवारी, पोहवा अमित त्रिपाठी, उमेश कसलीकर, आत्माराम मांडवकर, शरदचंद्र मून आणि गणेश बसू यांनी केली.

### महिला आरोपीस २० वर्षांचा कारावास

**अल्पवयीनला ढकलले होते देह व्यवसायात**

**नागपूर,दि.२५ नोव्हेंबर :** पैशांचे आमिष दाखवून गरीब कुटुंबातील अल्पवयीन मुलीला देह व्यवसायात ढकलणाऱ्या महिला आरोपीस पोक्सोच्या विशेष न्यायालयाचे न्यायाधीश आर. पी. पांडे यांनी दोषी ठरवून लैंगिक अत्याचार आणि पोक्सोमध्ये २०-२० वर्षे कारावासाची शिक्षा सुनावली आहे. मुन्नीबाई मकसूद पठाण (४५) रा. ताजनगर, अजनी असे दोषी महिलेचे नाव आहे.

गुन्हे शाखेच्या सामाजिक सुरक्षा विभाग (एसएसबी)ने मुन्नीविरुद्ध अजनी ठाण्यता अल्पवयीनवर अत्याचार, पोक्सो ॲक्ट आणि पिटा ॲक्टच्या विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला होता. १४ जुलै २०२१ च्या दुपारी एसएसबीच्या पथकाला माहिती मिळाली होती की, मुन्नी स्वत:च्या घरीच देह व्यवसायाचा अड्डा चालवत आहे. ती गरीब कुटुंबातील तरुणींनी पैशांचे आमिष दाखवून या नरकात ढकलत आहे. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी योजनाबद्धरित्या पंटरला ग्राहक बनवून तिच्या घरी पाठवले. सौदा ठरताच पंटरने पोलिसांना इशारा दिला आणि धाड टाकण्यात आली. तपासादरम्यान मुन्नी ज्या मुलीकडून देह व्यवसाय करून घेत होती तिचे वय केवळ १६ वर्षे असून ती गरीब कुटुंबातील आहे. मुन्नीने तिला पैशांचे आमिष दाखवून देहविक्रीच्या नरकात ढकलल्याचे समजले. पोलिसांनी विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून मुन्नीला अटक केली. एसएसबीचे तत्कालीन पोलिस निरीक्षक सार्थक नेहते यांनी प्रकरणाचा तपास करून न्यायालयात आरोप पत्र दाखल केले. सरकारी वकील आसावरी परसोडकर आरोप सिद्ध करण्यात यशस्वी झाल्या. न्यायालयाने लैंगिक अत्याचार, पोक्सो, पीटासह सर्व कलमान्वये मुन्नीला दोषी ठरवत २० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली. पैरवी अधिकारी म्हणून मपोशि कीर्ती फुकट आणि सुरेश लव्हाळे यांनी अभियोजन पक्षाला सहकार्य केले.

## केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी पारदर्शक पदभरती आणि रेल्वे सुधारणांचे दशक केले अधोरेखित







■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. २५ नोव्हेंबर :**
गेल्या दशकात पाच लाख रेल्वे कर्मचाऱ्यांची पारदर्शक पद्धतीने भरती केली असून या भरतीने २००४ ते २०१४ दरम्यानच्या ४.४ लाखांच्या भरतीला मागे टाकले आहे, असे रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले. ते नागपूरमध्ये अजनी रेल्वे मैदानात आयोजित केलेल्या अखिल भारतीय अनुसूचित जाती/जमाती रेल्वे कर्मचारी संघटनेच्या राष्ट्रीय अधिवेशनात बोलत होते. यावेळी त्यांनी भारतीय रेल्वेच्या इतिहासात पहिल्यांदाच वार्षिक पदभरती कॅलेंडर सादर करण्याला अधोरेखित केले.

या कार्यक्रमाला संघटनेचे अध्यक्ष बी. एल. भैरवा, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक धर्मवीर मीणा आणि दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापक नीनू यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

उद्याच्या संविधान दिनाच्या पार्श्वभूमीवर वैष्णव यांनी संविधानाविषयी मोदी सरकारला असलेल्या आदरावर भर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी, संसदेत प्रवेश करण्यापूर्वी यासमोर नतमस्तक झाले या कृतीचा दाखला दिला. संविधाना विषयीचा आदर प्रतीकात्मकतेच्या पलीकडे आहे, तो प्रत्येक कृतीतून प्रतिबिंबित होतो, असे त्यांनी नमूद केले.

यावेळी मंत्र्यांनी सध्या सामान्य श्रेणीचे १२,००० डब्यांचे उत्पादन सुरू असल्याची माहिती देत विशेष आणि सामान्य डब्यांच्या उत्पादनासह रेल्वेच्या महत्त्वाच्या सुधारणांवर प्रकाश टाकला. यावेळी त्यांनी कर्मचारी संघटनेच्या कार्याची माहिती देणाऱ्या एका स्मरणिकेचे देखील प्रकाशन केले.

त्यांच्या नागपूर भेटी दरम्यान वैष्णव यांनी दीक्षाभूमीवर सेंट्रल मेमोरियल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन केले. या दोन दिवसीय अधिवेशनाचा उद्या संविधान दिनी समारोप होणार आहे.

## लाव्हयात सांस्कृतिक कार्यक्रम



■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी,दि. २५ नोव्हेंबर :**
लाव्हा येथील सोनबा नगर मध्ये जय बिरसा आदीवासी विकास महीला बचत गटाच्या अध्यक्ष शारदा मरस्कोल्हे यांच्यातर्फे क्रांतिसुर्य ,भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंती निमित्त रविवारी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सर्वप्रथम ग्रा.पं. सदस्य शारदा मरस्कोल्हे व राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सचिव दिनेश उईके यांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याला हारार्पण करून उपस्थितांनी अभिवादन केले. यावेळी दुर्गा कुरसंगे,सीमा मडावी, दुर्गा भलावी,माला नेताम,रिना मंडारी,सुरेखा खंडाते, माधुरी गोडांगे,रेखलाल खंडाते,वासुदेव मरस्कोले,चेतन पुसाम, श्रीकांत चांदेवार,मोहीत अडमाची, मयुर भलावी , सचिन सलामे, महेश धुर्वे उपस्थित होते.

## पिपरीया येथे आदिवासी गोवारी बांधवांना श्रद्धांजली



■ **महासागर प्रतिनिधी**
**रामटेक ,दि. २५ नोव्हेंबर :**
रामटेक तालुक्यातील पिपरीया येथे नागपूर विधानभवनावर काढलेल्या मोर्चात लाठीचार्ज होऊन ११४ आदिवासी गोवारी बांधव शहीद झाले होते. आज त्या घटनेला तीस वर्ष झाले त्याची आठवण म्हणून पिपरीया येथे श्रद्धांजली कार्यक्रम गोवारी समाज बांधवांच्या वतीने आयोजित करण्यात आले होते.११४ आदिवासी गोवारी बांधवांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

श्रद्धांजली कार्यक्रमाला रामटेक पंचायत समितीचे सभापती चंद्रकांत कोडवते, माजी सभापती संजय नेवारे,कार्यक्रमाचे अध्यक्ष जीवन राऊत,आदिवासी गोवारी फाऊंडेशन चे सचिव नंदकिशोर कोहळे, भास्कर राऊत, रवींद्र कोहळे, मनोहर सोनवणे, विजय कोहळे, रवींद्र देव्हारे, सुनील नेवारे सह गोवारी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधानसभा मतदारसंघात विकासकामांना गती मिळाली आहे

**बावनकुळेंवर बसा, बहादूरा न.प. परिसरातून मतांचा पाऊस**

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा,दि. २५ नोव्हेंबर :**
शनिवारी सकाळी ७ वाजल्यापासूनच लोक टीव्हीसमोर उभे राहून निवडणूक जिंकण्याची आणि हरण्याची प्रक्रिया पाहत होते. बेसा नगर पंचायत क्षेत्रातील सर्व रस्ते सुनसान झाले होते. मानेवाडा-बेसा रोड, बेसा, पिपळा वेळ, बहादुरा, हुडकेश्वर खुर्द, विहीरगाव यासह अनेक ठिकाणी पक्षाचे कार्यकर्ते जल्लोष करताना दिसले. सायंकाळी ६ च्या सुमारास झालेल्या मतमोजणीत भाजप महायुतीचे चंद्रशेखर बावनकुळे यांना १,७३,५७६ तर काँग्रेस महाआघाडीचे सुरेश भोयर यांना १,३२,८३८ मते मिळाली. तोपर्यंत बावनकुळे ४० हजार मतांनी आघाडीवर होते. बेसा येथील चंद्रशेखर बावनकुळे यांचे कार्यकर्ते मुकेश काळे म्हणाले की, बेसा नगर पंचायत संकुल व बहादूरा न.प.संकुलातील जनतेच्या पाठिंब्यामुळे निवडणुकीत बावनकुळे यांच्यावर मतांचा चांगला पाऊस पडला. माहितीनुसार भाजपला बेसामधून ५,३०० आणि बहादुरा येथून ५,७०० मते मिळाली. बावकुळे ४०,८३४ मतांनी विजयी झाले. बावनकुळे यांना विजयी करण्यासाठी वेळ ग्रामपंचायतीचे माजी सरपंच सचिन इंगळे, पिपळा ५चे माजी सरपंच नरेश भोयर, हुडकेश्वर खुर्दचे कमलाकर शेंडे, विहीरगावच्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेतले.

## चातुर्मास नामजप समर्पण सोहळा संपन्न

**श्री गजानन महाराज उपासना केन्द्र, नागपूर चा उपक्रम**




■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. २५ नोव्हेंबर :**
मागील नऊ वर्षांपासून श्री गजानन महाराज उपासना केंद्र, नागपूरच्या माध्यमातून, दर चातुर्मासात विदर्भ, महाराष्ट्र, नव्हे तर देशाबाहेरही गजानन महाराज भक्त 'गणी गण गणांत बोते' या सिध्द मंत्राचा जप करून दरवर्षी जप समर्पण सोहळा साजरा होत असतो. यंदा गजानन महाराजांची पालखी निघाली, त्यात तीनशे भाविक सहभागी झालेत. पालखी समोर श्वेत अश्व आणि पालखीत हुबेहूब शेगांव सारखा रजत मुखवटा व शांत आणि भक्तीमय वातावरणात गजानन महाराजांचं भजन म्हणत चालणारे भाविक हे पालखीचं वैशिष्ट्य म्हणावे लागेल! तर दुसरे दिवशी स्थानिक माधवनगर हॉलमध्ये प्रथम तीनशे भाविकांनी, श्री गजानन विजय ग्रंथाचं साखळी पारायण केलं. व पुढे पिंपरी चिंचवड पुणे येथील, कुमारी सुरभी सुनील ढगे वय वर्ष केवळ नऊ हिने श्री गजानन विजय ग्रंथातील तीन अध्याय, क्रमांक एक, दहा व एकवीस मुखोद्गत म्हटले. सुरभी ला वयाच्या आठव्या वर्षीच तीन हजार सहाशे एकोणसत्तर ओव्या असणारा संत कवी श्री दासगणू महाराज विरचित श्री गजानन विजय ग्रंथ पूर्ण मुखोद्गत आहे. ही श्री गजानन महाराजांची लीलाच म्हणावी लागेल. सुरभी ला ऐकून श्रोते मंत्रमुग्ध झालेत. याप्रसंगी गजानन महाराज उपासना केंद्राचे जयंत वेलणकर यांनी सुरभीची प्रगट मुलाखत घेतली.त्यावेळी सुरभीची आई, भाग्यश्री व वडील सुनील ढगे मंचावर उपस्थित होते त्या मुलाखतीतून मिळालेल्या रंजक माहितीचा श्रोत्यांनी आनंद घेतला. गजानन महाराज उपासना केंद्र माधवनगर येथील नियमित उपासिका कुमारी रुवी ढवळे, वय वर्ष केवळ पाच जी मोठ्यांबरोबर उपस्थित राहून शांतपणे उपासना करते.

## ईसाच्या विदर्भ प्रदेश अध्यक्षपदी नाना सातपुते

■ **महासागर प्रतिनिधी**
**हिंगणा,दि. २५ नोव्हेंबर :**
इंडिपेंडन्ट इंग्लिश स्कुल असोसिएशनच्या विदर्भ प्रदेश अध्यक्षपदी वानाडोंगरी संगम येथील शांग्रीला इंग्लिश स्कुल व ज्यू कॉलेज चे संचालक नाना सातपुते यांची निवड करण्यात आली आहे.

अध्यक्षस्थानी ईसा संघटनेच्या प्रदेशाध्यक्ष जागृती धर्माधिकारी ,सचिव श्रीधर अय्यर यांनी त्यांची निवड केली असून राजेंद्र चोरगे, राजेंद्र सिंग , डॉ संजय रोडगे आदी मान्यवरांच्या उपस्थिती त त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले.

आरटीई २५% चा फी परतावा, जिल्हा स्तरीय शाळांना संघटीत होऊन शाळांना समर्थन करणे, ईसा संघटनेने सभासद जिल्हास्तरावर सहभागी करुन घेणे, आरटीई ताळेबंद तक्ता तयार करणे, प्रीस्कूलसमोरील आव्हाने आणि त्यावर आपण मात कशी करू शकतो तसेच नवीन शैक्षणिक धोरण आणि अध्यापनात करावयाचे बदल याबाबत यावर काम करणार असून शासनदरबारी प्रमुख मागण्या मांडणार असल्याचे त्यांनी सांगितले. नाना सातपुते यांच्या नियुक्तीबद्दल नागपूर जिल्ह्यातील पदाधिकारी नागोराव भांगे ,अमरीश दुबे, शैशकुमार जिंदल, तुपेकर, कोहळे आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

## सुख शांती समाधान संस्थेच्या वतीने योगदान दीन साजरा

**वृद्धाश्रम, शाळा आणि मंदिरांना समक्ष भेटून संस्थेच्या वतीने योगदान**

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. २५ नोव्हेंबर :**
नागपूर: सुख शांती समाधान संस्था नागपूर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष योगगुरू सचिन माथुरकर यांचा जन्म दिवस २नोव्हेंबर रोजी असतो. संस्थेतर्फे हा दिवस योग दान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. ज्या वृद्धाश्रम, शाळा, मंदिर यांना समक्ष भेटून, त्यांना हवे असलेले साहित्य संस्थेतर्फे दिल्या जाते. यावर्षी पंचमुखी हनुमान मंदिर बाबुळखेडा, मुक बधीर शाळा सावनेर, व्यंकटेश आश्रम पराशिवणी, साई सावली आश्रम बेलातरोडी, जिव्हाळा आश्रम नागपूर, स्नेहसदन आश्रम रामटेक, बोधी वृक्ष आश्रम नागपूर, कुर्वेज न्यू माडेल शाळा नागपूर, विजया परिवार वृद्धाश्रम कुही मांढळ असा हा दान विधी २४ नोव्हेंबर ला पूर्ण झाला. या सर्व ठिकाणी दिलेले दान संस्थेचे सर्व सभासद शिक्षक आणि शिबिरार्थी यांच्या सहयोगाने दिल्या गेले. सोबतच सर्वांना योगा शिकविणे, करवून घेणे, आणि रीतसर कार्यक्रमाचे आयोजन करणे, याही गोष्टींचा सहभाग असतो. संस्था हे कार्य गत १९ वर्षांपासून नि:शुल्क, निस्वार्थ आणि सेवाव्रती होऊन करीत आहे.याशिवाय शाळा कॉलेज हॉस्पिटल येथेही कार्य शाळेचे आयोजन आणि १५ दिवसांचे योगा शिबिरांचे आयोजन करून उत्तम आरोग्य प्रदान करणे आणि व्यक्तिमत्व विकास कसा करायचा ? त्याचे प्रगटीकरण कसे करायचे ? याचे सुद्धा मार्गदर्शन केले जाते. सचिन माथुरकर हे आपल्या गोड वानिने, शांत स्वभावाने, आसन सांगणे, करवून घेणे, यामुळे संस्था पूर्ण महाराष्ट्र भर कार्यरत आहेत. आणि प्रगती पथावर आहे.असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे सचिव शीलाताई केळापूरे यांनी कळविले आहे.

## कराटेत शिक्षा सूर्यवंशी , श्रावणी कावडे , खुशी गुप्ता प्रथम



■ **महासागर प्रतिनिधी**
**वाडी,दि. २५ नोव्हेंबर :**
क्रीड़ा व युवक संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने नागपूर विभागीय शालेय कराटे क्रीडा स्पर्धा वर्धा येथे नुकतीच पार पडली. या स्पर्धेत वाडी येथील १४ वर्षा खालील मुली मध्ये शिक्षा सूर्यवंशी ,सरोजिनी पब्लिक स्कूल, १७ वर्षा खालील मुली मध्ये श्रावणी कावडे ,केंद्रीय विद्यालय डिफेन्स, आणि १९ वर्षा खाली मुली मध्ये खुशी अमित गुप्ता यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. या सर्वांची धुळे येथे २९ आणि ३० नोव्हेंबर रोजी होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय कराटे स्पर्धेकरिता निवड करण्यात आली आहे.

या विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शाळेचे व्यवस्थापक, पालक, शिहान शाबिर शाह व वाडीचे मुख्य कराटे प्रशिक्षक मनीष येवले यांना दिले. सिको काई कराटे इंटरनॅशनल इंडिया या फेडरेशन च्या मार्गदर्शनात सर्व विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहे.

## 'संवेदना परिवार संस्थेचे कार्य कौतुकास्पदच' : श्रीधरराव गाडगे

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. २५ नोव्हेंबर :**
'संवेदना परिवार संस्था जे विविध उपक्रम राबवित असते तसेच आजच्या युवकांना प्रेरणादायी अशा स्वा सावरकर राष्ट्रभक्तीपर कीर्तन महोत्सवाचे आयोजन हे कौतुकास्पदच आहे' असे गौरवोद्गार विदर्भ प्रांत सहसंहचालक श्रीधरराव गाडगे यांनी संवेदना परिवार संस्थेतर्फे ४ ते ८ डिसेंबर २०२४ दरम्यान आयोजित स्वा सावरकर कीर्तन महोत्सव स्थळाचे भूमिपूजन प्रसंगी काढले आणि महोत्सवास शुभेच्छा दिल्या.



श्रीधरराव गाडगे तसेच युवा उद्योजक आणि कीर्तन महोत्सव कार्याध्यक्ष सारंग गडकरी यांचे हस्ते रामनगर राम मंदिराच्या बाजूच्या पटांगणात भूमिपूजन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. सारंग गडकरी यांनीही महोत्सवास भरभरून शुभेच्छा दिल्या.

कीर्तन महोत्सवात राष्ट्रीय कीर्तनकार चारुदत्त आफळे ४ डिसेंबर रोजी 'बंगाल क्रांतिकारकांची गाथा', ५ डिसेंबर रोजी 'उत्तर प्रांतातील अग्निरत्न', ६ डिसेंबर रोजी 'स्वातंत्र्य संग्रामातील अंतिम पर्व', ७ डिसेंबर रोजी 'त्या तिघी', ८ डिसेंबर रोजी ' स्वा वि दा सावरकर ', अशा राष्ट्रभक्तीपर विषयांवर पाचही दिवस कीर्तन सादर करणार आहेत.

## छोटे जलाशय मत्स्य उत्पादनासाठी उपयुक्त

**विदर्भातील मत्स्य व्यवसाय विषयावरील कार्यशाळेत तज्ञांचे मत**

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर,दि. २५ नोव्हेंबर :**
महाराष्ट्रातल्या गोड्या पाण्यातल्या मत्स्य उत्पादनांपैकी ५४ टक्के मत्स्य उत्पादने विदर्भातून येत असून जेवढे मोठे जलाशय तेवढी उत्पादन क्षमता कमी असते आणि छोट्या जलाशयामध्ये उत्पादकता अधिक असते. असे मत तज्ञांनी व्यक्त केले.

पीडीकेव्ही मैदानावर आयोजित ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनाच्या चौथ्या दिवशी विदर्भातील मत्स्य व्यवसाय या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. मंचावर माफसू नागपूरचे कुलगुरू डॉ. नितीन पाटील, अधिष्ठाता डॉ. मुकुंद आमले, दीप क्का फिशर प्रा.लि.चे डॉ. विवेक भूते, प्रा. डॉ. प्रशांत तेलवेकर, प्रभाकर मांडरे, सहा. आयुक्त मत्स्यपालन विभागाचे शुभम कोरेमेवार, डॉ. सचिन बेलसरे, तोमेश्वर गहरुले, लीला पाटील उपस्थित होते.

डॉ. नितीन पाटील यांनी मार्केटमध्ये झिंग्यांची अधिक मागणी असून मासे व झिंगे या दोन्ही प्रकारचे उत्पादन आपण करू शकतो पण त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. डॉ. नितीन पाटील यांनी मार्केटमध्ये झिंग्यांची अधिक मागणी असून मासे व झिंगे या दोन्ही प्रकारचे उत्पादन आपण करू शकतो पण त्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. डॉ. सचिन बेलसरे यांनी भारतात मत्स्य उत्पादन दुप्पट झाले असून नागपूर जिल्यात एकूण ३४१ प्रकल्प मंजूर झाले. त्यापैकी १७३ प्रकल्प पूर्ण झाल्याची माहिती दिली. इतर मान्यवरांनीदेखील आपले विचार मांडले. यावेळी यशस्वीरित्या मत्स्यव्यवसायात काम करणाऱ्या संस्थांचा सत्कार करण्यात आला. कार्यशाळेचे संचालन डॉ. सहापूरे यांनी केले आहे.

## निधन वार्ता



सावरगांव येथील प्रतिष्ठित नागरिक तथा सावरगांव येथील संताजी संस्थेचे अध्यक्ष श्री.जयंतजी दाढे यांचे वडील माजी सैनिक श्री.मुरलीधर पांडूरंगजी दाढे(८३) यांचे आज दि.२५ नोव्हेंबर २०२४ला दुपारी २:४५ ला निधन झाले. उद्या दि.२६ नोव्हेंबर २०२४ ला दुपारी १२:०० वाजता त्यांच्यावर सावरगांव येथे अंतिमसंस्कार करण्यात येईल त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले व तीन मुली आहेत.


### जाहीर सूचना

आम जनतेस सूचित करण्यात येत आहे की, मुळ मालक श्री मुर्तझा हमजाभाई कोठावाला, राहणार-७-ए, साई सेवाश्रम सोसायटी, मानकापूर रिंग रोड, गांधी लेआऊट, हकीमी विला, काटोल रोड, नागपुर-४४००१३ यांचे मालकी कब्ज्यातील तसेच सर्व सरकारी निमसरकारी रकॉर्डला त्यांचेच नावे दर्ज असलेली खालील वर्णीत स्थावर मालमत्ता आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

नागपुर सुधार प्रन्यास तथा नागपुर महानगरपालिका सिमेअंतर्गत खास मौजा-जरिपटका, सुराना लेआऊट, छावनी, राजनगर, नागपुर स्थित खसरा क्रमांक ८३/७, ८३/८, ८३/९, ८३/१० तथा ८३/११ (८३/६) या जमीनीमध्ये टाकण्यात आलेल्या लेआऊट स्थित प्लॉट क्रमांक ६, एकूण क्षेत्रफळ ५०१.६७ चौ.मी. (५४०० चौ. फुट) या जमीनवर सुदर्शन एन्क्लेव्ह या नावाने बांधण्यात आलेल्या इमारतीमधील पश्चिम मुखी अपार्टमेंट क्र. २०२, ज्याचे बांधकामाचे क्षेत्र ७५.८३ चौ.मी.+ बाल्कनी / लॉबी क्षेत्र २०.३२ चौ.मी. + कॉमन एरिया २६.८८ चौ.मी., अशाप्रकारे एकूण क्षेत्र १२३.०३ चौ.मी. तसेच संपुर्ण जागेमध्ये ११.६३ टक्के अविभक्त हिश्श्यासह याचा वार्ड क्र. ६१ (जुना ३५), सिटी सर्व्हे नं. २४३९/२, शिट नं. ६८/३७ आहे.

मुळ मालक यांनी घोषित केले की, त्यांचेजवळ सदर्ह वरील वर्णीत मालमत्ते संबंधातील लिव्हरेज बिल्डकॉन प्रा.लि. द्वारा संचालक श्री आदित्य उमेश गुप्ता द्वारा आममुखत्यार श्री सतिश बंसी गौर यांनी श्री मुर्तजा हमजा कोठावाला यांचे नावे दिनांक ११/०५/२०१६ (१७/०६/२०१६) रोजी दस्तक्रमांक ४१०५ अनुसार नोंदणीकृत करून दिलेल्या विक्रीपत्राची मुळ उपलब्ध नसून त्यांचेपासून गहाळ झालेली आहे.

तरी कुणाही व्यक्तीस सदरचे विक्रीपत्राची मुळ प्रत मिळाल्यास / आढळुन आल्यास त्वरील खालील पत्यावर संपर्क साधावा.

दिनांक : .../१०/२०२४

अॅड निशांत पोतदार
एफएस-१३१, श्रीमान पॅलेस, माऊंट कार्मेल शाळेजवळ, लोकमत चौक, नागपुर.
फोन-९३७३४९१५१३, ९३२५९६९६१६

### Change Of Name

MY OLD NAME WAS **MUKESH CHAMPALAL MALVIYA.** NOW MY NEW NAME IS **MUKESH CHAMPAKLAL MALVIYA.**
**ADD :** PLOT NO 04,KHAMLA ROAD, OPP. MINI MATA MANDIR, SURENDRA NAGAR, VIVEKANAND, NAGPUR-440015

MY OLD NAME WAS **IRFAN HAJI MAKKI.** NOW MY NEW NAME IS **IRFAN HAJIMAKKI BAWANI.**
**ADD :** PLOT NO 264, RAMSUMER BABA NAGAR, BEHIND, TELGHANI, KAWRAPETH, NAGPUR, 440002

MY OLD NAME WAS **MOHAMMAD FUAAD SIKANDAR PALA.** NOW MY NEW NAME IS **MOHD FUAAD SIKANDAR PALA.**
**ADD :** H. NO 1004/A, BEHIND GARDEN, SHANTINAGAR, NAGPUR, NAGPUR, MAHARASHTRA - 440002

MY OLD NAME WAS **SUNITA KANHAIYALAL BHAWNANI.** NOW MY NEW NAME IS **SIMRAN RAVI NARAYANI.**
**ADD :** 103, KHAMLA ROAD SINDHI COLONY NAGPUR

MY OLD NAME WAS **SUMESH THAKUR.** NOW MY NEW NAME IS **UMESH SINGH THAKUR.**
**ADD :** ARSH 2 APARTMENT, NEW NARSALA ROAD DOBI NAGAR NAGPUR

# पराभुताकडून विजेत्याचा सत्कार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे मुख्यालय असलेल्या मध्य नागपूर मतदारसंघात भाजपचे प्रवीण दटके यांनी काँग्रेस उमेदवार बंटी शेळकेंचा पराभव केला.

निवडणुकीत दोघांनीही एकमेकांवर टीका करण्याची एकही संधी सोडली नाही. परंतु निवडणुकीत दटके जिंकल्यावर काँग्रेस उमेदवार बंटी शेळके यांनी दटके यांची भेट घेत असे काही केले की संपूर्ण नागपूरकरांना मराठी संस्काराचे दर्शन घडले.

मध्य नागपुरातील निवडणुकीत भाजप- काँग्रेस कार्यकर्ते येथे अनेकदा सामोरासमोर आले. महालातील बडकस चौकातून प्रियंका गांधींचा रोड-शो सुरू असताना भाजपच्या कार्यकर्त्यांनी पक्षाचे झेंडे दाखवल्यावर गोंधळ उडाला. मतदानाच्या दिवशीही बंटी शेळके यांनी भाजपच्या मत चिठ्ठी मतदान केंद्रावर सापडल्यानंतर अधिकाऱ्यांना धारेवर धरले. त्यानंतर मोमीनपुरात पोलिसांनी नाकाबंदी केल्याचा आरोप करत एका समाजाला मतदानापासून रोखण्यात येत असल्याचा आरोप करत पोलिसांशी वाद घातला.

## तोंड गोड करीत मारली मिठी : संस्काराचे दर्शन



निवडणुकीच्या दिवशी बंटी शेळके यांच्या कार्यकर्त्यांना पैसे वाटप करीत असल्याच्या आरोपातून ताब्यात घेण्यात आले. मतदान संपल्यावर मध्य नागपुरातील बडकस चौकातच काँग्रेस आणि भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये वाद झाला. अतिरिक्त ईव्हीएम यंत्र घेऊन जात असलेली वाहने काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी गैरसमजातून अडवून त्याची काचे फोडली.

त्यानंतर काही कार्यकर्त्यांनी आमदार प्रवीण दटकेंना घेरले. धक्काबुक्कीही झाली. त्यामुळे पोलिसांनी बंटी शेळके यांच्यासह काही कार्यकर्त्यांविरुद्ध गुन्हा दाखल केला. या सगळ्या घटना बघता मतमोजणीनंतर दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये वाद वाढण्याची शक्यता होती. पण घडलं अगदी विपरीत.

निकाल लागल्यानंतर काँग्रेसचे बंटी शेळके आणि भाजपचे आमदार प्रवीण दटके यांचे मनोमिलन झाले. बंटी शेळके हार, श्रीफळ आणि पेढे घेऊन प्रवीण दटके यांच्याकडे पोहोचले. दोघांनी एकमेकांचा सत्कार केला. एकमेकांचे तोंड गोड केले. एकमेकांना मिठी मारली. त्यानंतर बंटी शेळके यांनी वयाने मोठे असल्याने प्रवीण दटके यांच्या पाया पडत त्यांना शुभेच्छा दिल्या व त्यांचे आशीर्वादही घेतले.

त्यामुळं मध्य नागपुरात खऱ्या अर्थाने आता निवडणूक संपली, नाते जोपासण्याची वेळ आली, हा संदेश दोन्ही नेत्यांनी दिला. तसे पाहिले तर बंटी शेळके आणि प्रवीण दटके हे नागपूर महापालिकेतील सहकारी. नगरसेवक दोघांनीही चांगले काम केल्याची नोंद आहे. त्यानंतर प्रवीण दटके विधान परिषदेचे आमदार झालेत. २०१८- १९ पासून बंटी शेळके मध्य नागपुरात निवडणुकीची तयारी करीत होते. गेल्यावेळीही पराभुत झाले होते.

# टॅक्सी बुकिंगच्या नावावर गंडा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

पचमडीला जाण्यासाठी टॅक्सी बुक करण्याच्या नावावर सायबर गुन्हेगारांनी एका व्यक्तीला 90,056 रुपयांचा गंडा घातला. ही घटना यशोधरानगर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. पोलिसांनी पीडित अमोल भोलानाथ चौरे (37) रा. बापू अणेनगरच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे.

अमोल यांनी कुटुंबासह पचमडीला फिरायला जाण्याची योजना आखली होती. त्यासाठी त्यांनी गुगलवर टॅक्सी कंपन्यांचे नंबर शोधले. या दरम्यान त्यांना शिवशक्ती कार रेंट्स ही वेबसाईट दिसली. त्यांनी वेबसाईटच्या लिंकवर क्लिक करून आपले नाव आणि मोबाईल नंबर नोंदविला.

त्यानंतर दोन वेगवेगळ्या नंबरवरून त्यांना फोन आला. फोन करणाऱ्यांनी शिवशक्ती कार रेंट्सच्या कार्यालयातून बोलत असल्याची बतावणी केली. बुकिंगसाठी अमोलला 150 रुपये ऑनलाईन पाठविण्यास सांगितले. त्यांनी बुकिंगसाठी आपल्या डेबिट कार्डची संपूर्ण माहिती भरून दीडशे रुपये पाठवले.

काही वेळातच त्यांच्या खात्यातून दीडशे रुपयांसह 89,906 रुपयेही डेबिट झाल्याचे समजले. त्यांनी आरोपींशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रतिसाद मिळाला नाही. बुकिंगच्या नावावर फसवणूक झाल्याचे समजताच अमोल यांनी पोलिसात तक्रार दाखल केली. प्राथमिक तपासानंतर पोलिसांनी फसवणूक आणि आयटी ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

अशा पद्धतीने फसवणूक करण्याचे प्रकार नागपूरसह जिल्ह्यातही वाढीस लागले आहेत.

## २७ नोव्हेंबर रोजी त्रृटी पुर्तता शिबिर

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

जिल्ह्यातील सत्र 2023-24 मध्ये स्वाधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी अर्ज केलेल्या सर्व अजार्ची तपासणी व छाननी करण्यात आली असून काही विद्यार्थ्यांच्या अर्जात त्रृट्या आढळून आलेल्या होत्या अशा अर्जदारांना या कार्यालयामार्फत अनेकदा भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करण्यात आलेले आहे.

पत्रव्यवहार करुनही अद्यापही त्रृटी पुर्तता केलेली नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी 27 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 ते दुपारी 4 वाजेपर्यंत एक दिवसाचे शिबीर ओयोजित करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांनी त्रृटी पुर्तता केलेली नाही अशा विद्याथ्यार्साठी त्रृटीपुर्तता करण्याकरीता अंतिम संधी देण्यात येत आहे, असे आवाहन समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त सुकेशिनी तेलगोटे यांनी केले आहे.

अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवगार्तील विद्यार्थ्यांकरीता शासनाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना लागू केली आहे. या योजनेंतर्गत मागासवर्गीय शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य, निर्वाह भत्ता व इतर आवश्यक सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेण्यासाठी रक्कम त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यावर थेट जमा करण्यात येते. अधिक माहिती साठी सहाय्यक आयुक्त समाजकल्याण कार्यालयाशी संपर्क साधावा.

# पुलाच्या भिंतीवर धडकली अनियंत्रित कार

## वृद्ध महिलेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

वर्धाकडे भरधाव जात असलेल्या चार वृद्ध महिलांची कार अनियंत्रित झाली. दुभाजकावर चढल्यानंतर कार थेट पुलाच्या भिंतीला धडकली. या अपघातात एका वृद्ध महिलेचा मृत्यू झाला, तर इतर तिघ्या गंभीर जखमी आहेत.

ही खळबळजनक घटना बेलतरोडी ठाण्यांतर्गत वर्धा मार्गावर घडली. वसुधा अनिल पाटील (75) रा. शिवाजीनगर, असे मृत वृद्धेचे नाव आहे. जखमी कल्पना अनिल पाध्ये (63) रा. टॅगोर मार्ग, सिव्हील लाईन्स, छाया मुळे (74) रा. बाजीप्रभूनगर आणि कार चालक मंजूषा पाटील (60) रा. शिवाजीनगर यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्पना, छाया आणि मंजूषा या तिघ्याही चुलत बहिणी आहेत, तर वसुधा त्यांची वहिनी होती. रविवारी दुपारी अचानक चौघींनी वर्धाच्या केळझर येथील गणपती मंदिरात दर्शनाची योजना बनवली. कल्पनाच्या घरून चौघ्याही एमएच-31/एफएक्स-4049 क्रमांकाच्या कारने वर्धाकडे निघाल्या. जामठाजवळ आऊटर रिंगरोडवर त्या रस्ता भटकून एनसीआयच्या दिशेने गेल्या. चुकीचा रस्ता असल्याचे लक्षात येताच मंजूषाने कार यू-टर्न घेतली आणि पुलावरून पुन्हा वर्धाकडे निघाल्या.

कारची गती अत्याधिक असल्याने मंजूषाचे नियंत्रण सुटले. कार उड्डाणपुलावरच दुभाजकावर चढली आणि दुसऱ्या बाजूच्या भिंतीला जाऊन धडकली. मंजूषाच्या शेजारी बसलेली वसुधा थेट डॅश बोर्डवर धडकल्याने डोक्याला गंभीर दुखापत झाली. मागच्या सीटवर बसलेल्या कल्पना आणि छायाही समोरच्या सीटवर धडकल्या. कल्पनाला मुका मार लागला मात्र छायाचे दोन्ही पाय फ्रॅक्चर झाले.

अपघातामुळे रस्त्याने ये-जा करणारे लोक मदतीसाठी धावले. काही लोकांनी पोलिसांना माहिती दिली, तर काहींनी रुग्णवाहिका बोलावली. चौघींनाही उपचारार्थ एम्स रुग्णालयात रवाना करण्यात आले. उपचारादरम्यान डॉक्टरांनी वसुधा यांना मृत घोषित केले. इतर तिघींवर उपचार सुरू आहेत. पोलिसांनी कल्पनाच्या तक्रारीवरून मंजूषाविरुद्ध गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

## होरपळल्याने वृद्धेचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

देवघरात दिवा लावताना एक वृद्धा गंभीररित्या होरपळली. रुग्णालयात उपचारादरम्यान वृद्धेचा मृत्यू झाला. ही दुदैवी घटना कोतवाली पोलिस ठाण्यांतर्गत घडली. कमला किसन मालखेडे (७५) असे मृत वृद्धेचे नाव आहे.

गत १५ नोव्हेंबरच्या रात्री ८.३० वाजताच्या सुमारास कमला घरी देवघरामध्ये दिवा लावत होत्या. या दरम्यान त्यांच्या लुगड्याला आग लागली. यात कमला गंभीररित्या होरपळल्या. कुटुंबीयांनी तत्काळ त्यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात भरती केले. शनिवारी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मिळालेल्या सूचनेवरून पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला आहे.

## हैदोस घालताना गुंडास अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. २५ :

यशोधरानगर पोलिसांनी ठाण्यांतर्गत गस्ती दरम्यान एका गुंडाला शस्त्राचा धाक दाखवून हैदोस घालताना अटक केली. समीर उर्फ येडा खान समशेर खान (34) रा. राजीव गांधीनगर झोपडपट्टी, असे अटकेतील गुंडाचे नाव आहे.

रविवारी सकाळी 10.30 वाजताच्या सुमारास यशोधरानगर पोलिसांचे पथक राजीव गांधीनगर झोपडपट्टीत गस्त घालत होते. या दरम्यान समीर त्याच्या जवळच तलवारीचा धाक दाखवून रस्त्याने ये-जा करणाऱ्यांना धमकावत असल्याची माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारावर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळ गाठले. पोलिसांना पाहताच समीरने पळून जाण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी घेराबंदी करून त्याला पकडले. त्याच्याजवळून तलवारही जप्त करण्यात आली. समीरविरुद्ध यशोधरानगर ठाण्यात आर्म्स ॲक्ट आणि मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदवून त्याला अटक करण्यात आली. समीर हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर यापूर्वीही गुन्हे दाखल झाले आहेत.

### निवडणुकीनंतर सोन्याच्या दरात काही तासातच घसरण

नागपूर : विधानसभा निवडणूक आटोपताच नागपुरातील सराफा बाजारात काही तासातच सोन्याच्या दरात घसरण झाली आहे. मागील काही दिवसांमध्ये सोने- चांदीच्या दरात सातत्याने वाढ होत असल्याने ग्राहक चिंतेत होते. परंतु सोमवारी सोन्याच्या दरात घसरण नोंदवण्यात आल्यावर ग्राहकांना किंचित दिलासा मिळाला आहे.

नागपुरसह राज्यात दिवाळीत सोन्याचे दर उच्चांकीवर होते. त्यानंतही ग्राहकांनी मोठ्या प्रमाणात दागिन्यांची खरेदी केली. त्यानंतर दरात प्रथम मोठी घसरण झाली. परंतु राज्यातील विधानसभा निवडणूकीदरम्यान पून्हा सोने- चांदीच्या दरात मोठी वाढ झाली. नागपुरातील सराफा बाजारत धनत्रयोदशीला (२९ ऑक्टोबर) बाजार उघडल्यावर सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७९ हजार २०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७३ हजार ७०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६१ हजार ८०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५१ हजार ५०० रुपये होते.

लक्ष्मीपूजनाला (१ नोव्हेंबर) वाढून २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७९ हजार ४०० रुपयेपर्यंत गेले. नागपुरात २५ नोव्हेंबरला बाजार उघडल्यावर सकाळी १०.३० वाजता सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७७ हजार ४०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७२ हजार रुपये, १८ कॅरेटसाठी ६० हजार ४०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५० हजार ३०० रुपये होते. हे दर काही तासानंतर दुपारी २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७७ हजार रुपये, २२ कॅरेटसाठी ७१ हजार ६०० रुपये, १८ कॅरेटसाठी ६० हजार १०० रुपये, १४ कॅरेटसाठी ५० हजार १०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे नागपुरात सकाळी बाजार उघडल्याच्या तुलनेत दुपारी सोन्याच्या दरात २४ कॅरेटमध्ये ४०० रुपये, २२ कॅरेटमध्ये ४०० रुपये, १८ कॅरेटमध्ये ३०० रुपये, १४ कॅरेटमध्ये २०० रुपये प्रति दहा ग्राम अशी घट नोंदवण्यात आली. दरम्यान भविष्यात सोन्याच्या दरात आणखी मोठी वाढ होण्याची शक्यता नागपुरातील सराफा व्यवसायिकांकडून वर्तवली जात आहे. त्यामुळे आता ग्राहकांना सोने- चांदीच्या दागिन्यात गुंतवणुकीसाठी चांगली संधी असल्याचाही सराफा व्यवसायिकांचा दावा आहे.

चांदीच्या दरातही घसरण

नागपुरातील सराफा बाजारात धनत्रयोदशीच्या दिवशी २९ ऑक्टोंबरला प्रति किलो चांदीचे दर ९८ हजार ८०० रुपये होते. हे दर २५ नोव्हेंबरला सकाळी बाजार उघडल्यावर ९० हजार ३०० रुपये प्रति किलो होते. हे दर सोमवारी (२५

# आयटी क्षेत्रात क्वालिटी बेस जॉब...

# विद्यार्थ्यांसाठी झटताहेत शिंदे दाम्पत्य

■ सुजाता बंडावार
नागपूर, दि. २५ :



लाखो रुपये खर्च करून चार वर्षे अभियांत्रिकीचे शिक्षण घेतल्यानंतरही आयटी सेक्टर मध्ये रोजगाराची संधी मिळण्यासाठी मुंबई, पुणे सारख्या शहरात पुन्हा लाखाच्या घरात सुसंगत असे जॉब ओरिएंटेड कोर्सेस करूनही नोकरीसाठी भटकंती करणारे किंवा टेक्नॉलॉजी बेस जॉब न मिळता कॉल सेंटरवर शिक्षणाच्या तुलनेने नगण्य पगारावर काम करणाऱ्या विद्यार्थ्यांकडे पाहून अनेक प्रश्न निर्माण होत आहेत.

महाविद्यालयीन शिक्षण व्यवस्था व दोनशे ते तीनशे विद्यार्थ्यांच्या बॅचेस चालवणारे कोचिंग क्लासेसच्या व्यवस्थापनात काहीतरी घोळ आहे का? अशीही शंका येवू लागली आहे. नेमक्या याच मुद्द्यावर बोट ठेवत कोणत्याही शाखेमधून ग्रॅज्युएशन झालेल्या विद्यार्थ्यांना एक्सपिरीयन्स बेस ट्रेनिंग देऊन आयटीसाठी लागणारे विधिवत कौशल्य विद्यार्थ्यांना प्राप्त करूवून देऊन विद्यार्थ्यांना क्वालिटी जॉब मिळवून देण्यासाठी धडपडणारे सुहास शिंदे व स्नेहल शिंदे दांपत्य गेल्या तेरा वर्षांपासून सि.टी.पी. एल. ही कंपनी चालवित आहेत.

मेकॅनिकल इंजिनीयर असलेले व टेक्निकल फिल्ड मध्ये विविध नामांकित कंपनीमध्ये २१ वर्षांचा अनुभव असलेले सुहास शिंदे यांनी लाखो रुपये खर्चून अभियांत्रिकेचे शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या रोजगाराविषयीची अनास्था बघितली, आयटी सेक्टर मधील विविध नामांकित कंपन्यांमध्ये क्वालिटी बेस जॉब न मिळता कॉल सेंटरवर त्यांना जेव्हा काम करावे लागते किंवा अक्षरशः पंधरा ते वीस हजार महिनावारी कमवावे लागते.

ही परिस्थिती बघून शिक्षण व्यवस्थित कुठेतरी चुकते आहे यावर त्यांनी लक्ष वेधले असता त्यांना कळून चुकले की मोठमोठ्या नामांकित महाविद्यालयांमध्ये व 100% जॉब गॅरंटी देणाऱ्या कोचिंग क्लासेस मध्ये प्रॅक्टिकल बेस शिक्षण न देता केवळ थेअरी अप्लाय केली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना आयटीमध्ये काय काम केल्या जाते यासारख्या बेसिक प्रश्नाचेही उत्तर देता येत नाही.

मग अशा विद्यार्थ्यांना कंपनी कशी उचलणार? याचाच परिणाम त्यांच्या रोजगारावर होतो. तेव्हा केवळ अभियांत्रिकीचेच नाही तर आट्र्स, कॉमर्स, सायन्स यासारख्या प्रत्येक शाखेतून आलेल्या विद्यार्थ्यांना आयटी सेक्टर मध्ये क्वालिटी बेस जॉब्स मिळवून देण्याच्या प्रयत्नातून एक्सपिरीयन्स बेस ट्रेनिंग देण्यासाठी त्यांनी क्लियरिक सॉफ्टटेक प्रायव्हेट लिमिटेड ही कंपनी १३ जुलै २०११ ला नागपूर येथे स्थापित केली.

सामाजिक बांधिलकी जोपासणारे व समाजाचं देणं म्हणून कार्यप्रवण असलेले सुहास शिंदे व एलएलएम झालेल्या त्यांच्या पत्नी स्नेहल शिंदे हे समर्पितपणे सी.टी.पी. एल. ही कंपनी विद्यार्थ्यांच्या उज्वल भविष्यासाठी गेल्या १३ वर्षांपासून चालवत आहेत. या संस्थेमध्ये ओरॅकल टेक्नॉलॉजी व त्यासंबंधीत इ.आर.पी. व एस. ए. पी. या सॉफ्टवेअर संबंधी कौशल्य विद्यार्थ्यांना अवगत करून दिली जातात. त्यासाठी दिवसाला नऊ तास याप्रमाणे आठवड्याला ५४ तास संपूर्ण शिस्तीमध्ये त्यांना एक्सपिरीयन्स बेस ट्रेनिंग दिल्या जाते.

यामध्ये टेक्निकल भाग सुहास शिंदे तर ॲडमिनिस्ट्रेशन व एच आर स्नेहल शिंदे या सांभाळतात. जे आम्ही नऊ तासात शिकवितो ते दोन तासाच्या शंभर टक्के जॉब ग्यारंटी देणाऱ्या कोचिंग इन्स्टिट्यूट मध्ये काय शिकविल्या जात असेल हा एक चिंतेचा विषय आहे. आतापर्यंत २७८५ विद्यार्थी या संस्थेतून, भारतातच नाही तर परदेशात सुद्धा मोठमोठ्या पॅकेजवर काम करीत आहेत असे स्नेहल शिंदे मोठ्या अभिमानाने सांगतात.

# जेईई परीक्षेत मोठा बदल

## अनेक विद्यार्थ्यांना फटका बसणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. २५ :

परीक्षा देण्यासाठी याआधी उमेदवारांना तीन संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, आता पुन्हा एकदा त्यात बदल होऊन परीक्षा देण्यासाठी तीन संधींवरून दोन संधी देण्यात येणार असल्यामुळे आधीच नाराज झालेल्या विद्यार्थ्यांसाठी आणखी एक निराशाजनक माहिती समोर आली आहे.

आयआयटी कानपूरच्या आयोजक संस्थेने घेतलेल्या निर्णयामुळे २०२३ मध्ये १२वी उत्तीर्ण झालेले विद्यार्थी जेईई ॲडव्हान्स्ड या परीक्षेला बसू शकणार नाहीत. यापूर्वी या विद्यार्थ्यांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

आयआयटी कानपूरने ही संधी दिल्यानंतर हजारो विद्यार्थ्यांनी जेईई-मेनसाठी अर्ज केले होते. पुन्हा एकदा आयआयटीमध्ये प्रवेशाची तयारी सुरू केली होती. मात्र, आता या विद्यार्थ्यांच्या पदरी निराशा आली आहे.

दरम्यान, आयआयटी कानपूरने अलीकडेच एक अधिसूचना प्रसिद्ध केली होती. ज्यामध्ये जेईई ॲडव्हान्स्डमध्ये बसण्याच्या संधींची संख्या दोनवरून तीन करण्यात आली होती, मात्र आता हा निर्णय संयुक्त प्रवेश मंडळाच्या बैठकीनंतर रद्द करण्यात आला आहे. संयुक्त प्रवेश मंडळाने (जेएबी) संयुक्त प्रवेश परीक्षा (जेईई) २०२५ साठी पात्रता नियम सुधारित केले आहेत. ५ नोव्हेंबर २०२४ रोजी जारी केलेल्या अधिसूचनेत, बोडार्ने असे म्हटले होते की जेईई मेन उत्तीर्ण उमेदवार जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेला तीन वेळा उपस्थित राहू शकतात, परंतु आता हा नियम मागे घेण्यात आला आहे.

आता उमेदवार प्रगत परीक्षेला फक्त दोनदा बसू शकतात. १५ नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत, विविध स्पर्धात्मक गरजा लक्षात घेऊन, जुना नियम पुन्हा लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता पूर्वीचे पात्रता नियम जे २०१३ पासून लागू होते, ते पुनर्संचयित केले गेले आहेत.

जेईई ॲडव्हान्स्ड २०२५ परीक्षेत बसण्यासाठी उमेदवाराचा जन्म १ ऑक्टोबर २००० रोजी किंवा त्यानंतर झालेला असावा. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि अपंग उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादेत ५ वर्षांची सूट देखील आहे.

या उमेदवारांचा जन्म १ ऑक्टोबर १९९५ किंवा त्यानंतर झालेला असावा. जेईई मेन्स परीक्षेत अव्वल क्रमांक मिळविणारे २.५० लाख उमेदवार प्रगत परीक्षेला बसले आहेत. नवीन नियमांनुसार ज्या विद्यार्थ्यांनी आयआयटीमध्ये प्रवेश घेतला आहे. ते जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षेला दोनदा बसू शकत नाहीत, परंतु एनआयटीमध्ये प्रवेश घेतलेले उमेदवार हे करू शकतात. ते परीक्षा देऊ शकतात.

# कृषी महोत्सवात पसंतीला उतरला इलेक्ट्रीक ट्रॅक्टर

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. २५ :

दाभा येथे ॲग्रोव्हिजन कृषी प्रदर्शनात ठेवण्यात आलेला ईलेक्ट्रीक टॅक्टर शेतकऱ्यांच्या पसंतीला पडलेला आहे. ॲग्रोव्हिजनच्या समाप्तीच्या दिवशी शेतकऱ्यांनी कृषी महोत्सव पाहण्यासाठी गर्दी केली होती.

येथे नवीन तंत्रज्ञानाच्या आविष्कारांची प्रात्यक्षिके दाखविण्यात आली. खेडेगावात डिझेलसाठी दहा ते पंधरा किलोमिटर जावे लागते. आज जवळपास सर्वच वाहने ईलेक्ट्रीक वाहने आले आहे. त्यात ईलेक्ट्रीक टॅक्टर म्हणजे शेतकऱ्यांच्या फायदयाचीच गोष्ट झाली आहे. घरीच टॅक्टर चार्ज होत असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थीक भुदंड कमीच बसणार आहे. इंधनाचा वेळ वाचेल आणि शेतकऱ्यांना कमी दरात चांगली मदत मिळेल.



ई-ट्रॅक्टरमुळे इंधनाची बचत पण होईल, सोबतच ध्वनी प्रदूषण होणार नाही.नवनवीन शोधातून शेतकऱ्यांना नवी ऊर्जा मिळत आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या वैविध्यपूर्ण विचारांनी प्रेरित होऊन तांत्रिक आविष्कारांवर आधारित संकल्प करून सुमारे ५००पेक्षा अधिक स्टॉल्स उभारण्यात आले होते.

शेतकऱ्यांना अनुदान योजनांची माहितीही दिली जात असून, नव्या पिढीला अनुसरून यंत्रांचा शोध लागला आहे. या प्रदर्शनात अहमदाबादच्या मॅक्सग्रीन कंपनीने जुन्या ट्रॅक्टरच्या तुलनेत १० पट इंधन वाचवण्याची जबाबदारी घेतली आहे.

ई ट्रॅक्टरची ऑपरेटिंग सिस्टीममध्ये कमी किंमत आहे त्याचप्रमाणे, इंजिनला जोडलेल्या पॉवरची माहिती आहे. या ट्रॅक्टरमध्ये रोटाव्हेटर, कल्टिव्हेटर तसेच संपूर्ण ट्रॉली ओढण्याची क्षमता आहे. ई - ट्रॅक्टर अवघ्या २०० रुपयांच्या वीजेत ६ तासापर्यंत पूर्ण क्षमतेने काम करू शकते, अशी माहिती मॅक्सग्रीन कंपनीच्यावतिने देण्यात आली आहे .